CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
आसमंतसह
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, १ सप्टेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ३९ वे अंक ३०२ । पाने ८+८ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## विनम्र अभिवादन



पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांची आज तिथीनुसार पुण्यतिथी

## महत्त्वाचे

### यूपीआयचा होणार आणखी काही देशांत विस्तार

**भुवनेश्वर :** आणखी काही देशांमध्ये युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस अर्थात् यूपीआयचा विस्तार करण्यासाठी उत्सुक असल्याचे भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितले. क्यूआर कोडच्या माध्यमातून यूपीआय अगोदरच अनेक देशांमध्ये उपस्थित आहे आणि ही सेवा उपलब्ध करून देण्याबाबत काही देशांसोबत चर्चा सुरू आहे. पुढे याचा विस्तार जागतिक पातळीवर होईल आणि याचे भविष्यात आंतरराष्ट्रीयीकरण होईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे, असे दास यांनी सांगितले. भूतान, नेपाळ, श्रीलंका, सिंगापूर, यूएई, मॉरिशस, नामिबिया, पेरू, फ्रान्स आणि इतर काही देशांनी यूपीआय नेटवर्कच्या माध्यमातून रुपे कार्ड्स आणि पेमेंट सेवा स्वीकारल्याने या दिशेने आपण दखल घेण्याइतकी प्रगती केली आहे.



पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये शनिवारी पॅरा नेमबाज रुबिना फ्रान्सिसने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल एसएच१ प्रकारात कांस्यपदक जिंकले. भारताचे हे पाचवे पदक ठरले

### राज ठाकरेंच्या विरोधात अटक वॉरंट

**लातूर, ३१ ऑगस्ट**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधात न्यायालयाने अटक वॉरंट जारी केला आहे. सोळा वर्षांपूर्वीच्या प्रकरणात राज ठाकरे यांना निलंगा न्यायालयाने हा वॉरंट जारी केला. एसटी महामंडळाच्या बसगाडीची तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आली होती. याबाबतचे प्रकरण आहे.

राज ठाकरे यांना निलंगा येथील दुसरे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी शुक्रवारी (अजामीनपात्र) अटक वॉरंट जारी केला. यामुळे राज ठाकरे यांना निलंगा न्यायालयात हजर राहावे लागणार आहे. काही वर्षांपूर्वी ते निलंगा न्यायालयात हजर झाले होते. सोळा वर्षांपूर्वी मनसे कार्यकर्त्यांकडून महामंडळाच्या बसगाडीची जाळपोळ तोडफोड केल्याप्रकरणी राज ठाकरे यांच्यावरही गुन्हा दाखल झाला होता. निलंगा येथील मनसे कार्यकर्त्यांनी २००८ मध्ये उदगीर वळणावर महामंडळाच्या बसगाडीची जाळपोळ केली होती. याप्रकरणी निलंगा पोलिस ठाण्यात आठ जणांवर गुन्हा दाखल झाला होता. त्यामध्ये राज ठाकरे यांचा समावेश होता.

# रा. स्व. संघाची अ. भा. समन्वय बैठक प्रारंभ



केरळच्या पलक्कड येथील रा. स्व. संघाच्या अ. भा. समन्वय बैठकीला उपस्थित सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे

◆ **पलक्कड, ३१ ऑगस्ट**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय समन्वय बैठक केरळमधील पलक्कड येथे आजपासून सुरू झाली. ही बैठक २ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांच्यासह सहाही सह-सरकार्यवाह आणि संघाचे इतर अखिल भारतीय पदाधिकारी या समन्वय बैठकीला प्रामुख्याने उपस्थित आहेत.

बैठकीत राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का, प्रमुख कार्यवाहिका सीता अन्नदानम्, वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष सत्येंद्र सिंह, माजी सैनिक सेवा परिषदेचे अध्यक्ष ले. जनरल (सेवानिवृत्त) व्ही. के. चतुर्वेदी, अ. भा. ग्राहक पंचायतचे अध्यक्ष नारायणभाई शाह, विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष आलोक कुमार, सरचिटणीस बजरंग बागडा, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे संघटन मंत्री आशिष चौहान, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, सरचिटणीस (संघटन) बी. एल. संतोष, विद्या भारतीचे अध्यक्ष रामकृष्ण राव, भारतीय मजदूर संघाचे अध्यक्ष हिरणम्य पंड्या, आरोग्य भारतीचे अध्यक्ष डॉ. राकेश पंडित यांच्यासह संघप्रेरित ३२ विविध संघटनांचे राष्ट्रीय अध्यक्ष, संघटन मंत्री, प्रमुख पदाधिकारी व संबंधित संघटनांच्या महिला प्रतिनिधींसह सुमारे ३०० कार्यकर्ते उपस्थित आहेत.

### विविध विषयांवर होणार चर्चा

ही तीन दिवसीय अखिल भारतीय बैठक साधारणपणे वर्षातून एकदा घेतली जाते. बैठकीच्या प्रारंभी वायनाडमध्ये नुकत्याच झालेल्या भूस्खलनाची आणि स्वयंसेवकांनी केलेल्या मदत आणि सेवा कार्याची माहिती सर्व प्रतिनिधींना देण्यात आली. बैठकीत विविध संघटनांचे कार्यकर्ते आपल्या कार्याच्या माहितीचे व अनुभवांचे आदानप्रदान करतील. याशिवाय राष्ट्रीय हिताचे विविध विषय, सद्यपरिस्थिती, अलिकडच्या काळात घडलेल्या महत्त्वाच्या घटना आणि सामाजिक बदलांचे इतर आयाम आणि योजना यावर बैठकीत चर्चा होणार आहे. सर्व संघटना विविध विषयांवर परस्पर सहकार्य आणि समन्वय वाढवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवरही चर्चा करतील. (वृत्तसंस्था)

# महिलांना जलद न्याय देण्याची गरज

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे न्यायमूर्तींना आवाहन

◆ **नवी दिल्ली, ३१ ऑगस्ट**

आज महिलांवरील अत्याचार, लहान मुलांची सुरक्षा, ही समाजाची गंभीर चिंता आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी देशात अनेक कठोर कायदे करण्यात आले आहेत; परंतु आपल्याला ते अधिक सक्रिय करण्याची गरज आहे. महिलांवरील गुन्ह्याच्या प्रकरणात न्याय जलदगतीने देण्याची गरज आहे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.



सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यासह सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ न्यायमूर्तींच्या उपस्थितीत सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेच्या ७५ वर्षांच्या स्मरणार्थ स्टॅम्प आणि नाण्यांच्या अनावरणप्रसंगी पंतप्रधान बोलत होते. आज महिलांवरील अत्याचार, लहान मुलांची सुरक्षा ही समाजापुढील गंभीर चिंता आहे. महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये जितक्या वेगाने निर्णय घेतले जातील, तितकी निम्म्या लोकसंख्येला सुरक्षिततेची खात्री दिली जाईल. न्यायातील दिरंगाई दूर करण्यासाठी गेल्या दशकांत अनेक पातळ्यांवर काम करण्यात आले. गेल्या दहा वर्षांत देशाने न्यायिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सुमारे आठ हजार कोटी रुपये खर्च केले आहेत.

गेल्या २५ वर्षांत न्यायलयीन पायाभूत सुविधांवर दरवर्षी होणाऱ्या रकमेपैकी ७५ टक्के रक्कम गेल्या १० वर्षांतच खर्च झाली असल्याचेही त्यांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)

### इसिसच्या खलिफत प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक

◆ **नवी दिल्ली, ३१ ऑगस्ट**

तरुणांना कट्टरवादी करून भारतात खलिफत आणण्याच्या आंतरराष्ट्रीय कटातील मुख्य आरोपीला राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने अटक केली.

विदेशात पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या अझिझ अहमद उर्फ जलील अहमदला शुक्रवारी बंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हिजबुल-तहरीरच्या कट्टरपंथी आणि मूलतत्त्ववादी विचारसरणीने प्रभावित असलेल्या सहा जणांविरुद्ध तपास यंत्रणेने दाखल केलेल्या खटल्यात ही अटक करण्यात आली. इस्लामिक खिलाफत आणि त्याचा संस्थापक तकी अल-दिन-अल-नभानीचे संविधान लागू करण्यासाठी कट रचण्यात आला होता.

आरोपींनी गुप्त बैठका आयोजित केल्या होत्या. यात भोळ्याभाबड्या तरुणांना हिजबुल-तहरीरच्या विचारसरणीसह कट्टरपंथी बनवले होते. (वृत्तसंस्था)

# ऑगस्टमध्ये विक्रमी बरसला

◆ **नवी दिल्ली, ३१ ऑगस्ट**

ऑगस्ट महिन्यात देशभरात जोरदार पाऊस झाला. या काळात सरासरीपेक्षा १५.७ टक्के जास्त पाऊस झाल्याची माहिती हवामान विभागाने शनिवारी दिली. ऑगस्टमध्ये वायव्य भारतात २५३.९ मिमी पाऊस झाला. २००१ नंतर म्हणजे २३ वर्षांनंतर विक्रमी जलधार कोसळल्या आहेत. या कालावधीत काही राज्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला.

ऑगस्टमध्ये भारतात सरासरी किमान तापमान २४.२९ अंश सेल्सियस नोंदवण्यात आले. हे १९०१ नंतरचे सर्वाधिक तापमान आहे. सप्टेंबर महिन्यातही सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. ऑगस्टमध्ये सरहसरीच्या ९४ ते १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता यापूर्वी हवामान विभागाने वर्तवली होती. ऑगस्टमध्ये २८७.१ मिमी पावसाची नोंद करण्यात आली. सामान्यपणे या महिन्यात २४८ मिमी पाऊस पडतो, असे हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### विदर्भात कमी पावसाची नोंद

हिमालयाच्या पायथ्याशी आणि ईशान्य भारतातील अनेक जिल्ह्यांत यंदा कमी पाऊस झाला. कमी दबावाचे पट्टे दक्षिणेकडे गेल्याने आणि मान्सूनने आपल्या सामान्य प्रवाहाची स्थिती दक्षिणेकडे ठेवल्याने हा प्रकार घडला. केरळ आणि महाराष्ट्रातील विदर्भात पाऊस कमी बरसला, असे मोहपात्रा यांनी सांगितले.



लाडकी बहीण योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ शनिवारी नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस व अजित पवार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केला त्याप्रसंगीचे दृश्य

# 'लाडकी बहीण' योजनेत खोडा घालणाऱ्यांना जोडा दाखवा

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन ● थाटात पार पडला मेळावा

◆ **नागपूर, ३१ ऑगस्ट**

'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना लागू झाली तेव्हापासून विरोधकांना पोटशूळ उठला आहे. काही जण या योजनेच्या विरोधात न्यायालयात गेले. या योजनेत खोडा घालणाऱ्या लोकांना जोडा दाखवा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी केले.

'मुख्यमंत्री लाडकी बहीण' मेळावा आज रेशीमबाग मैदानावर अतिशय थाटात पार पडला. त्यावेळी मुख्यमंत्री शिंदे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या मेळाव्याला उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे उपस्थित होते.

तुम्ही सरकारला ताकद दिली तर, आम्ही ही रक्कम वाढवत नेऊ. ये तो ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है. आम्ही हात आखडता घेणार नाही. आम्हाला या बहिणींना लखपती झालेले पाहायचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही 'लखपती दीदी योजना' सुरू केली. तीन कोटीतील ५० लाखापेंक्षा अधिक लाभार्थी महाराष्ट्रातील झाल्याशिवाय राहणार नाही. बहिणींवर अत्याचार केला तर, त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. आम्ही तुमच्या सुरक्षेची जबाबदारी घेऊ, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

लाडकी बहीण योजना फक्त रक्षाबंधनासाठी नाही, ती फक्त भाऊबिजेपुरती मर्यादित नाही. ती कायम राहणार आहे. आपण दोन वर्षांत जे काम केले, ते लक्षात ठेवा. महायुतीच्या पाठीशी आशीर्वाद असू द्या. आम्ही जे बोलतो, ते करून दाखवतो. त्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे, असा हल्लाबोल मुख्यमंत्री शिंदे यांनी केला. या योजनेमुळे आतापर्यंतच्या सर्व कार्यक्रमांचे रेकॉर्ड मोडले गेले आहेत. कितीही विरोध झाला तरी, महायुतीचे सरकार ही योजना बंद करणार नाही, अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली.या कार्यक्रमात नागपूरसह विदर्भातून हजारोंच्या संख्येने महिला, भगिनी उपस्थित होत्या. मंडपात बसायला देखील जागा शिल्लक नसल्याचे बघायला मिळाले. त्यामुळे शेजारच्या सुरेश भट सभागृहातही महिलांच्या बसण्याची व्यवस्था करावी लागली. (तभा वृत्तसेवा)

## मोफत शिक्षणाच्या आदेशाला केराची टोपली

**पुणे, ३१ ऑगस्ट**

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण देण्याचा आदेश राज्य शासनाकडून निर्गमित करण्यात आला. जीआर आमच्यापर्यंत अजून आला नाही, असे कारण सांगून मुलींना मोफत शिक्षणापासून शिक्षण संस्था वंचित ठेवत आहेत. मोफत शिक्षणाच्या आदेशाला केराची टोपली दाखविण्यात आल्याने पालकही चिंतेत पडले आहे.



आता शैक्षणिक वर्षाचे प्रवेश सुरू झाले आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत प्रवेश मिळणार का, याचे उत्तर संस्था चालकांकडे नाही. ते प्रवेश घेणाऱ्या मुलींना सांगतात की, शासन आदेश आमच्याकडे आलेला नाही. मुलींना मोफत शिक्षण देण्याचा आदेश आल्यास त्याची त्वरित अंमलबजावणी केली जाईल. परंतु, राज्य शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, सामाजिक व मागासवर्ग तसेच इतर मागास वर्ग याप्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्क्यांऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्याबाबतचा आदेश निर्गमित केला. पालकांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांना जीआर दाखविला. मात्र, आम्हाला कोणत्याही प्रकारचे निर्देश आले नाही. त्यामुळे अंमलबजावणी करू शकत नाही, असे उत्तर देण्यात येत आहे. ज्या शैक्षणिक संस्था विद्यार्थिनींना मोफत शिक्षणापासून वंचित ठेवत आहेत, अशा संस्थांवर कारवाई करण्यासाठी पावल उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

## लग्नात दिलेल्या भेटवस्तू हुंडा नाही; सुप्रीम कोर्टाचा निर्वाळा

**नवी दिल्ली :** लग्नात देण्यात आलेल्या पारंपारिक भेटवस्तू हुंडा नाही. यामुळे हुंडाबंदी कायदा १९६१ च्या कलम ६ च्या तरतुदींचे कोणतेही उल्लंघन होत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने आज स्पष्ट केले. लग्नात दिलेल्या भेटवस्तूंवर फक्त मुलीचा हक्क असतो, असेही न्यायालयाने म्हटले आहे.प न्या. संजय करोल आणि न्या. जे. के. माहेश्वरी यांच्या न्यायासनाने घटस्फोटाशी संबंधित एका प्रकरणावर हा निर्णय दिला, ज्यात पित्याने मुलीच्या घटस्फोटानंतर तिच्या सासरच्यांनी 'स्त्रीधन' परत न दिल्याने खटला दाखल केला होता.

१९९९ मध्ये त्यांच्या मुलीचे लग्न झाले होते. २०१६ मध्ये तिचा घटस्फोट झाला. घटस्फोटाची प्रक्रिया अमेरिकेत पार पडली होती. आर्थिक, वैवाहिक सर्व मुद्यावर तडजोड झाली होती. २०१८ मध्ये तिने दुसरे लग्न केले. यानंतर तीन वर्षांनी २०२१ मध्ये तिच्या वडिलांनी मुलीचे सोन्याचे दागिने परत न केल्याचा आरोप करून गुन्हा दाखल केला.

**स्त्रीधन मागण्याचा हक्क नाही**

न्यायालयाने स्पष्ट केले की, लग्नात मिळणाऱ्या स्त्रीधनावर फक्त महिलेचा अधिकार आहे. वडिलांचा किंवा पतीचा कोणताही अधिकार नाही. या प्रकरणात तक्रारदार त्यांच्या मुलीने तिचे स्त्रीधन सासरच्यांकडे सुपूर्द केल्याचा पुरावा देऊ शकले नाही. लग्नाच्या दोन दशकांनंतर आणि घटस्फोटाच्या अनेक वर्षांनी असा आरोप करण्यामागे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण देण्यात आले नाही.

### पोक्सो संबंधित विशेष जलद न्यायालये स्थापन करा

नवी दिल्ली : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) अंतर्गत नोंदवलेल्या खटल्यांच्या निकालासाठी समर्पित विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्याचे आवाहन केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी केले आहे.

अन्नपूर्णा देवी यांनी ३० ऑगस्ट रोजी लिहिलेल्या पत्रात राज्यातील विद्यमान जलदगती न्यायालयांबद्दल चिंता व्यक्त केली आणि जघन्य गुन्ह्यातील पीडितांना जलद आणि योग्य न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांना विनंती केली.

# पीओपी गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना अजिबात नाही

### सार्वजनिक मंडळांना अट घाला ● हायकोर्टाचा महापालिकांना निर्देश

### बंदीचा बॉल शासनाच्या कोर्टात

◆ **मुंबई, ३१ ऑगस्ट**

कोणत्याही पीओपी गणेशमूर्तींची प्राणप्रतिष्ठा करायची नाही अशी अट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना घाला, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईसह राज्यातील सर्व महापालिकांना दिले आहेत. पीओपी गणेशमूर्तींवरील बंदीच्या प्रश्नावर हायकोर्टात सुनावणी झाली.

मूर्तिकारांना आणि पीओपीने बनवलेल्या मूर्तींचा उपयोग करणाऱ्यांना जरब बसेल, अशा स्वरूपाच्या दंडाची तरतूद करणे आवश्यक आहे. जेणेकरून पुढच्या वेळेपासून पीओपी मूर्तीच बनवण्यात येणार नाहीत. त्यामुळे राज्य सरकारने याप्रश्नी योग्य तो धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी सूचना मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी केली आहे.

राज्य सरकारबरोबरच सर्व जनहित याचिकेतील मुद्यांबाबत प्रतिज्ञापत्रावर उत्तर दाखल करण्याचे निर्देश देऊन खंडपीठाने २१ ऑक्टोबर रोजी सुनावणी ठेवली. तसेच त्या सुनावणीनंतर पीओपी मूर्तीवरील बंदीसोबत सीपीसीबीच्या अन्य मार्गदर्शक तत्त्वांचे खऱ्या अर्थाने पालन होण्याबाबत योग्य ते आदेश देण्याचे स्पष्ट संकेतही खंडपीठाने दिले.



**पीओपी गणेशमूर्ती बंदी प्रकरण काय?**

पीओपी बंदीला अनेकदा राष्ट्रीय हरित लवादासह विविध राज्यातील उच्च न्यायालयांमध्ये आव्हान देण्यात आले आहे. तरी पीओपी मूर्तींच्या उत्पादकांना यश आले नव्हते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बंदीच्या आदेशाला अंतिम रूप आले आहे. त्या अनुषंगानेच सीपीसीबीने १२ मे २०२० रोजी प्रसिद्ध केलेल्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार देशभरात पीओपी मूर्तींवर पूर्ण बंदी घालण्यात आली. २०२० मध्ये बंदी जाहीर झाल्यानंतर गणेशोत्सवातील पीओपी मूर्तींबाबतची बंदी पुढील वर्षापासून लागू होईल, असे केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी सोशल मीडियावर जाहीर केले होते. म्हणजे किमान २०२१ पासून बंदी पूर्णपणे लागू व्हायला हवी होती. प्रत्यक्षात आजतागायत बंदीची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. (वृत्तसंस्था)

### हरयाणात १ ऐवजी ५ ऑक्टोबरला मतदान

**नवी दिल्ली :** निवडणूक आयोगाने हरयाणातील विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची तारीख शनिवारी बदलली. या राज्यात आता १ ऑक्टोबरऐवजी ५ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. हरयाणा आणि जम्मू-काश्मिरातील मतमोजणीची तारीखही बदलण्यात आली आहे. या राज्यांत आता ४ ऑक्टोबरऐवजी ८ ऑक्टोबरला मतमोजणी होईल. हरयाणातील आगामी सण लक्षात घेता मतदानाची तारीख बदलण्यात आली, असे निवडणूक आयोगाने निवेदनात म्हटले आहे. बिश्नोई समाज गुरू जम्बेश्वर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आसोज अमावास्येचा उत्सव साजरा करतात, हे लक्षात घेऊन बिश्नोईंच्या मतदानाचा अधिकार आणि परंपरेचा सन्मान राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

# क्रेडिट कार्डपासून एलपीजीपर्यंत... आजपासून बदलणार सात नियम

◆ **नवी दिल्ली, ३१ ऑगस्ट**

रविवार, १ सप्टेंबरपासून काही नियमांमध्ये मोठे बदल होणार आहेत. याचा थेट परिणाम आपल्या खिशावर होणार आहे. यात आधार कार्ड, क्रेडिट कार्ड, एलपीजी सिलेंडर आणि मुदत ठेवींचा समावेश आहे. सोबतच, केंद्र सरकार आपल्या कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्त्यात वाढ करण्याचीही घोषणा करू शकते.

**गॅस सिलेंडरच्या किमतीत होणार बदल**

प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला गॅस सिलेंडरच्या किमतीत बदल होत असतो. तेल कंपन्या कधी सिलेंडरच्या दरात वाढ तर कधी कपात करीत असतात. मागील महिन्यात व्यावसायिक सिलेंडरच्या दरात ८.५० रुपयांची वाढ करण्यात आली होती.

**बोगस कॉलशी संबंधित नियम**

रविवारपासून बोगस कॉल आणि मेसेजवर बंदी घातली जाऊ शकते. याबाबतचा आदेश ट्रायने अलिकडेच दूरसंचार कंपन्यांना दिला आहे. यासाठी ट्रायने कठोर नियमावली तयार केली आहे. १४० क्रमांकापासून सुरू होणाऱ्या क्रमांकाचे टेलिमार्केटिंग कॉल्स आणि व्यावसायिक मेसेज डिस्ट्रीब्युटेड लेजर टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्मवर वळते करण्याच्या आदेशाचा यात समावेश आहे.





**एटीएफ, सीएनजी, पीएनजीचे दर**

गॅस सिलेंडरसोबतच तेल कंपन्या प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला विमानाला लागणारे इंधन अर्थात् एटीएफ तसेच सीएनजी आणि पीएनजीच्या दरातही बदल करू शकते.

**क्रेडिट कार्डच्या नियमात होणार बदल**

एचडीएफसी बँकेने युटिलिटी व्यवहारांवर रिवॉर्ड पाईंटची मर्यादा निश्चित केली आहे. हा नियम रविवारपासून अंमलात येणार आहे. यानुसार, अशा व्यवहारांवर प्रत्येक महिन्यात फक्त २००० पॉईंट्स प्राप्त करता येणार आहे.

**महागाई भत्ता वाढणार**

रविवारी केंद्र सरकार आपल्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करू शकते. ही वाढ तीन टक्के इतकी असू शकते. सध्या कर्मचाऱ्यांना ५० टक्के महागाई भत्ता दिला जात आहे. आता तो ५३ टक्के होऊ शकतो.

**मोफत आधार अपडेट**

आधार कार्ड मोफत अपडेट करण्याची अंतिम तारीख १४ सप्टेंबर आहे. यानंतर कुणालाही ही मोफत सुविधा मिळणार नाही. त्यासाठी विशिष्ट शुल्क भरावे लागणार आहे.

**विशेष मुदत ठेवींचे नियम**

आयडीबीआय बँकेने त्यांच्या ३०० दिवस, ३७५ दिवस आणि ४४४ दिवसांच्या विशेष मुदत ठेवींची अंतिम तिथी आता ३० सप्टेंबर केली आहे. पंजाब अॅण्ड सिंध बँकेने त्यांची मुदत ३० सप्टेंबर केली. याचाच अर्थ, सप्टेंबरनंतर या मुदत ठेवींमध्ये गुंतवणूक करता येणार नाही. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, १ सप्टेंबर २०२४

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



# युक्रेन भेटीचा संदेश काय?

## विश्वसंचार

प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

**युद्ध हा कोणत्याही समस्येवरचा मार्ग नाही; संवादाचे दरवाजे खुले ठेवणे तसेच वाटाघाटी आणि शांततेच्या मार्गानेच युद्धातून मार्ग काढणे महत्त्वाचे आहे, हे नरेंद्र मोदी यांनी ताज्या युक्रेन दौऱ्यात पुन्हा बजावून सांगितले. त्याचा काही परिणाम होतो का, हे आता पाहायचे. दरम्यान, व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या युक्रेनबरोबर झालेल्या ताज्या करारांमुळे कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आदी क्षेत्रांमध्ये सहकार्य सुनिश्चित होईल.**



गेल्या अडीच वर्षांपासून रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू असून युद्धाच्या झळा या दोन देशांपुरत्याच मर्यादित राहिलेल्या नाहीत; अवघे जग त्यात होरपळत आहे. भारताने या युद्धाबद्दल थेट रशियाचा निषेध केला नसला, तरी युद्ध हा कोणत्याही समस्येवरचा मार्ग नाही. संवादाचे दरवाजे खुले ठेवणे हाच मार्ग असल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे. रशिया हा भारताचा जसा मित्र आहे, तसाच युक्रेनही व्यापारीदृष्ट्या भारतासाठी महत्त्वाचा देश आहे. त्यामुळे दोन्ही देशांशी भारताला चांगले संबंध ठेवायचे आहेत. त्यामुळे तर तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचा दौरा केला आणि त्यानंतर आता युक्रेनला भेट दिली. सोव्हिएत महासंघातून १९९२ मध्ये बाहेर पडल्यानंतर युक्रेन हा देश स्वतंत्र झाला. स्वतंत्र राष्ट्र झाल्यानंतर युक्रेनला भेट देणारे मोदी हे पहिलेच भारतीय पंतप्रधान आहेत. साहजिकच पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्याकडून सर्वांना मोठ्या अपेक्षा होत्या. तेथे रवाना होण्यापूर्वी खुद्द मोदी खूप उत्साहात होते. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांना भेटण्यास उत्सुक असल्याचे त्यांनी सांगितले होते. झेलेन्स्की यांनी त्यांचे अतिशय प्रेमाने स्वागत केले आणि तेथील युद्ध परिस्थितीची माहिती दिली. दोन्ही नेत्यांमधील चर्चेत युद्ध थांबविण्याचे मार्ग शोधण्यावर भर होता. वाटाघाटी आणि शांततेच्या मार्गानेच युद्धातून मार्ग निघू शकतो, असा कानमंत्र पुन्हा मोदी यांनी झेलेन्स्की यांना दिला आहे. दोन्ही देशांनी चार करारांवर स्वाक्षऱ्याही केल्या. या करारांमुळे कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आणि मानवतावादी सहाय्य या क्षेत्रात सहकार्य सुनिश्चित होईल.

पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्यावर जगाचे लक्ष होते. कारण रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध केवळ भारतच थांबवू शकतो, हे सुरुवातीपासूनच अधोरेखित केले जात होते; मात्र भारत सुरुवातीपासूनच दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांना युद्धाचा मार्ग सोडण्याचे आवाहन करत आहे. युक्रेनला रवाना होण्यापूर्वीच पंतप्रधान म्हणाले होते की, ही युद्धाची वेळ नाही. युद्ध कोणतीही समस्या सोडवू शकत नाही. युक्रेनपूर्वी पंतप्रधान रशियालाही गेले होते. तेव्हा झेलेन्स्की यांनी नाराजी व्यक्त केली होती. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे जगातील सर्वात मोठे गुन्हेगार असल्याचे सांगून मोदी यांनी त्यांना मिठी मारल्याबद्दल त्यांनी टीका केली होती; पण आता ते भारतासोबतचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी उत्सुक दिसत होते. पंतप्रधानांचा युक्रेन दौरा अशा वेळी झाला, जेव्हा युक्रेनने रशियन प्रदेशांवर हल्ले तीव्र केले आहेत. हे पाहता पंतप्रधानांच्या आवाहनाचा युक्रेन किंवा रशियावर कितपत परिणाम होईल, हे सांगणे कठीण आहे. यापूर्वी अनेक प्रसंगी मोदी यांनी पुतिन यांना फोनवर किंवा समोरासमोर बोलून युक्रेनवरील हल्ले थांबविण्याचे आवाहन केले आहे. नुकत्याच झालेल्या रशियाच्या दौऱ्यातही मोदी यांनी पुतिन यांना असेच आवाहन केले होते; पण आजपर्यंत असा एकही प्रसंग दिसला नाही, जेव्हा रशियाने भारताच्या आवाहनाबाबत गांभीर्य दाखवले असेल. शांघाय शिखर परिषदेदरम्यान समोरासमोर चर्चेनंतर पुतिन यांनी भारतीय पंतप्रधानांचे आवाहन गांभीर्याने घेतल्याचे दिसत होते; मात्र तेथून परतताच त्यांनी युक्रेनवरील हल्ले अधिक तीव्र केले.

रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम संपूर्ण जगावर झाला आहे. युक्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक मारले गेले आहेत, त्यांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. युक्रेनचा व्यापार विस्कळीत झाला आहे. त्याला युद्धबंदीचा करार हवा आहे, पण तो रशियाच्या अटी मान्य करायला तयार नाही. युक्रेनने 'नाटो'चे सदस्यत्व सोडावे, अशी रशियाची अट आहे. दोघांपैकी कोणीही कोणत्याही प्रकारे झुकायला तयार दिसत नाही. अशा स्थितीत आपण वाटाघाटीसाठी कसे बसू शकतो, हा सर्वात कठीण प्रश्न आहे. भारतालाही त्यांच्यासाठी संवादाचा मार्ग शोधणे सोपे नाही; पण पंतप्रधानांनी दोन्ही देशांचे एक एक करून केलेले दौरे आणि युद्धाचा मार्ग सोडण्याचे केलेले आवाहन यामुळे जागतिक बंधुतेचा मार्ग मोकळा झाला आहे. रशिया आणि युक्रेन काहीसा लवचीक दृष्टिकोन स्वीकारतील आणि करारासाठी मध्यम मार्ग अवलंबण्यास सहमत होतील, अशी अपेक्षा आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्या खांद्यावर हात ठेवून पंतप्रधान मोदींनी एक-दोन नव्हे तर तीन महत्त्वाची पावले उचलली आहेत. मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी अर्थपूर्ण चर्चा केली आणि रशियासोबत सुरू असलेले युद्ध संपविण्यासाठी वैयक्तिकरीत्या योगदान देण्याचे आश्वासन दिले. मोदी यांनी 'एक्स'वर लिहिले की, युक्रेन भेट ऐतिहासिक होती. भारत-युक्रेन मैत्री आणखी घट्ट करण्याच्या उद्देशाने मी या महान देशात आलो आहे. माझे झेलेन्स्की यांच्याशी फलदायी संभाषण झाले. शांतता कायम राहिली पाहिजे, यावर भारताचा ठाम विश्वास आहे.

मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी व्यापक चर्चा केली. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी रशियाने युक्रेनवर हल्ला केला. तेव्हापासून आजतागायत दोन्ही देशांमध्ये युद्ध सुरूच आहे. मोदी आणि झेलेन्स्की यांनी युक्रेनमधील शांतता आणि सुरक्षेबाबतही चर्चा केली. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान भारत तटस्थ किंवा उदासीन प्रेक्षक नव्हता आणि नेहमीच शांततेच्या बाजूने होता, असे मोदी म्हणाले. दोन्ही देशांच्या प्रमुख नेत्यांची भेट जगासाठी मोठा संदेश आहे. त्यांच्यातील द्विपक्षीय बैठकीमुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील. रशियासोबतच्या युद्धावर शांततापूर्ण वाटाघाटीतून तोडगा काढण्याच्या दिशेने दोन्ही देश वाटचाल करतील. मोदी यांच्या युक्रेन आणि पोलंड दौऱ्यानंतर अमेरिकेसह पाश्चात्त्य देशांना खात्री पटली आहे की, भारत युक्रेनसोबत एकत्र पुढे जात आहे. म्हणजे भारताचा कल ना रशियाकडे आहे ना पाश्चात्त्य देशांकडे. जागतिक राजकीय पटलावर भारत तोच मार्ग स्वीकारेल, जो भारत आणि जगासाठी चांगला असेल, हे सर्व देशांना कळून चुकले आहे. आज तीन आघाड्यांवर भारताची नजर आहे. पहिली गोष्ट म्हणजे युरोपच्या शांतता उपक्रमात भारताचा समावेश करणे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे युक्रेनवरील रशियन आक्रमणामुळे निर्माण झालेल्या जागतिक भू-राजकीय गोंधळात भारताचा सहभाग वाढविणे आणि तिसरा मुद्दा सोव्हिएत काळापासून थंडावलेले युक्रेनसोबतचे भारताचे राजनैतिक संबंध पुनरुज्जीवित करणे.

युक्रेनमधील युद्ध संपविण्याच्या प्रश्नावर पंतप्रधान मोदी यांच्याकडे कोणतीही भव्य योजना नाही, असे पूर्वी दिसत होते. युद्ध आणि शांतता या विषयावर झेलेन्स्की यांच्याशी दीर्घ आणि सखोल चर्चेसाठी मोदी यांचा वॉर्सा ते युक्रेन ते कीव असा लांब रेल्वे प्रवास हा एक महत्त्वाचा टप्पा मानला गेला. कीवला दुसरी शांतता योजना हवी होती. मोदी यांनी युक्रेनच्या चिंता समजून घेतल्या. राष्ट्र म्हणून अस्तित्वाच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या होत्या. युक्रेनला या मुद्द्यावर भारताकडून पाठिंबा मिळत नव्हता. झेलेन्स्की यांना आशा आहे की, युक्रेनचे प्रकरण ऐकण्यासाठी आणि शांतता प्रयत्नांना हातभार लावण्याची मोदी यांची इच्छा त्यांच्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करेल. कारण युद्धाचे प्रचंड आर्थिक परिणाम असूनही दक्षिणेतील मोठा भाग अलिप्त राहिला आहे. दुसरीकडे युक्रेनमधील युद्धाचे भू-राजकीय परिणाम समोर येत असताना, मोदी यांची कीव भेट हे जगाला नव्याने आकार देणाऱ्या संघर्षात भारत यापुढे मूक प्रेक्षक म्हणून राहणार नाही, याचे द्योतक आहे. मोदी वॉर्सा ते कीव असा प्रवास करत असताना चीनचे पंतप्रधान ली कियांग मॉस्कोला भेट देत होते. युक्रेनमधील युद्धाची रूपरेषा तयार करण्यात चीनच्या वाढत्या भूमिकेची ही झलक आहे. भारत आपल्या हिताला महत्त्व देत आहे. अमेरिकेत युरोपपासून दूर जाण्याच्या रिपब्लिकन कल्पनेला आता डेमोक्रॅट्सकडून आव्हान दिले जात आहे. त्या चर्चेच्या निकालाचा भारताच्या सुरक्षा धोरणावर मोठा परिणाम होईल.

सरत्या आठवड्यात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या वॉशिंग्टनमधील उपस्थितीने अमेरिकेशी भारताचे वाढणारे धोरणात्मक संबंध अधोरेखित केले, तर राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि झेलेन्स्की यांच्याशी मोदी यांच्या जलद भेटींनी त्यांच्या हितसंबंधांवर प्रकाश टाकला. भारत आणि युक्रेनमधील संबंध मजबूत करणे, भारत आणि युक्रेनमधील द्विपक्षीय संबंध पुनर्संचयित करण्याच्या दृष्टीनेही मोदी यांचा युक्रेन दौरा महत्त्वाचा होता. सोव्हिएत काळात, भारताला युक्रेनमध्ये प्रवेशाचा विशेषाधिकार होता; परंतु कीवला स्वातंत्र्यानंतर भारतासोबतच्या संबंधांमध्ये कोणतीही उबदारता लाभली नाही. युक्रेनमध्ये भारताप्रती असलेली विलक्षण सद्भावना मोदी यांच्या कीवमध्ये झालेल्या हार्दिक स्वागतातून दिसून आली. मोदी आणि झेलेन्स्की यांनी आपल्या संबंधांना धोरणात्मक भागीदारीमध्ये रूपांतरित करण्याची, त्यांच्या आर्थिक आणि संरक्षण संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची आणि सांस्कृतिक संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची दाखवलेली वचनबद्धता युक्रेन आणि भारत दोघांसाठीही महत्त्वाची आहे.

# परिवर्तनासाठी यावे गणेशा

## खास बात

आरती अंकलीकर

संगीताप्रमाणेच समाज आणि त्यात साजरे होणारे सणही परिवर्तनशील असतात. याचा अनुभव सगळेच घेत आहोत. गणेशोत्सवही याला अपवाद नाही. हा सण नेहमीच आनंद, सुख-सौख्य घेऊन येतो. या काळात होणारी सामाजिक घुसळण अनेक चांगले मापदंड प्रस्थापित करून जाते. यंदाही त्याचीच पुनरावृत्ती व्हावी आणि नकारात्मकतेची जळमटे झटकून समाज एकसंध करण्याची शक्ती गणेशाने प्रत्येकाला द्यावी.

गणेशाचे आगमन होत आहे. त्याचा आनंद सगळीकडे जाणवतोय्. यात आबालवृद्ध सहभागी होतात आणि पर्वणी साधत अनेकानेक उपक्रम राबवतात. या उत्सवाचे, खऱ्या अर्थाने लोकोत्सवाचे बदलते रंग, बदलते ढंग आपण पाहिले आहेत. पूर्वी गणेशोत्सवाचे स्वरूप, रूप वेगळे होते. आता आणखी वेगळे आहे. पण काळ नेहमी पुढेच जात असतो. संगीतासारखेच जीवन परिवर्तनशील असल्याचे सूत्र आपण सगळेच जाणतो आणि मानतो. वेळ बदलते तसे संगीत बदलत असते आणि त्याचप्रमाणे जीवनही कायम बदलताना दिसते. गणेशोत्सवासारख्या सणांच्या निमित्ताने याची तीव्रतेने जाणीव होते.



गणेशोत्सव म्हटला की डोळ्यासमोर येतो तो सासरी म्हणजेच मुंबईतील आमच्या शास्त्री हॉलमध्ये साजरा होणारा उत्सव. तिथे मंडप घालण्यापासून पुढील प्रत्येक काम सोसायटीतील सदस्यांकडून केले जाते. येथील रहिवासी हा उत्सव अतिशय भक्तिभावाने, पावित्र्य राखत, जुना बाज कायम ठेवून नवतेचे स्वागत करत साजरा करतात. त्यामुळेच हा एक सर्वांगसुंदर सोहळा होऊन जातो. उत्सवासाठी मोठा मांडव घातला जातो. सुंदर स्टेज असते. जाणकार मंडळी दरवर्षी त्याच आनंदाने हे काम करतात. अत्यंत परंपरागत पद्धतीने इथे गणपती बसवला जातो. सजावटही जुना बाज राखणारी आणि वैभव जपणारी असते. एकत्रित प्रयत्नांमध्ये उभ्या राहिलेल्या सुबक आणि सुंदर मंडपात गणरायाची प्रतिष्ठापना झाल्यापासून उत्सवाचा संपूर्ण काळ भारलेला होऊन जातो. पहिल्या दिवशी गणपतीची मंगलमय मूर्ती आणताना ढोलक, लेझीम आणि टाळांचा गजर सुरू असतो. पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेली इथली मुले-मुली पालखीच्या मागे-पुढे वादन करत गणपतीला मिरवून आणतात. गणरायाचा गजर होतो. गणेशाची मूर्ती अगदी छोटी, जवळपास एक फुटाचीच असते. त्याची सुंदरशी मिरवणूक आमच्या वाडीमध्ये येते तेव्हाची वातावरणनिर्मिती शब्दातीत म्हणावी लागेल. मग पुढचे दहा दिवस अनेक उपक्रम राबविले जातात. अभ्यासू लोक आपली मते मांडतात. चांगल्या वक्त्यांच्या भाषणांचा लाभ घेता येतो. कीर्तन-प्रवचनासारखे कार्यक्रमही होतात. रहिवाशांनी बसवलेले करमणुकीचे कार्यक्रम होतात, विनोदी नाटके होतात आणि आधी उल्लेख केल्याप्रमाणे वैचारिक, आध्यात्मिक, प्रबोधनपर कार्यक्रमांची रेलचेलही पाहायला मिळते. थोडक्यात, असा सुरेख संगम असणारा गणेशोत्सव मला मनापासून भावतो.

यंदा तर गणेशाचे आगमन माझ्यासाठी विशेष आनंददायी आहे. गणेश आगमनाच्या अगदी काही दिवस आधी भारतरत्न पं. भीमसेन जोशी जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित होणे, हा मी फार मोठा बहुमान समजते. त्या पुरस्काराने माझ्या जीवनाचा गौरव होत असल्याची भावना आणि महाराष्ट्र शासनाकडून सन्मानित झाल्याची बाब आत्यंतिक सुखावणारी आहे. स्वाभाविकच यंदाचा गणेशोत्सव माझ्यासाठी आगळा आहे, असे म्हणता येईल. सामाजिकदृष्ट्या विचार करायचा तर यंदा पावसानेही सगळीकडे चांगली हजेरी लावली आहे. पाण्याची चिंता दूर झाली आहे. साहजिकच या सुजलाम् सुफलाम् वातावरणाचा सकारात्मक प्रभाव यंदाच्या सणपर्वांवर दिसून येत आहे. अर्थात पुरामुळे जागोजागी झालेले नुकसानही विसरून चालणार नाही. पुराचा फटका बसून अनेकांचे संसार उद्ध्वस्त झालेले आपण पाहिले आहेत. त्यामुळेच पुढल्या वर्षी कोणावरही अशी वेळ येऊ नये, अशी मनोकामना व्यक्त करतच आपण गणेशाचे स्वागत करायला हवे.

अलिकडेच कोलकाता आणि बदलापूरमधील घटनांनी अनेक प्रश्न आणि शंका उपस्थित करून गेल्या. यानिमित्ताने एकत्र आलेला समाज आणि जागृत झालेल्या सामाजिक जाणिवांची अनुभूती आपण घेतली. या घटनांनी प्रत्येक जण हेलावून गेलेला दिसला. या समाजाचा भाग असल्याबद्दल खेद वाटावा, अशीही भावना काहींमध्ये दिसली. साहजिकच यंदाच्या गणेशोत्सवावरही या घटनांचा प्रभाव असणार आहे. विशेषत: या सणाचे औचित्य साधत समाजसुधारणेतील आपली जबाबदारी ओळखण्याची आणि ती पार पाडण्याची वेळ प्रत्येकाने ओळखायला हवी. कारण आज प्रत्येकाला त्यासाठी काही ना काही करायचे आहे. आवाज उठवायचा आहे. अन्यायाला वाचा फोडायची आहे. पण एकट्यादुकट्या माणसाकडे हे धैर्य, एवढा वेळ, एवढी शक्ती असतेच असे नाही. मात्र आता काही काळासाठी का होईना, आपण एकत्र येतोय. चर्चा घडणार आहे. या संधीचा फायदा करून घ्यायला हवा. या कामी गणेशाने आपल्याला सामर्थ्य द्यावे, हे माझे त्याच्याकडे आवाहन असेल.

आता स्त्री सशक्त झाली आहे. पण या सशक्त स्त्रीला कसे स्वीकारावे, तिला कसे सन्मानित करावे, तिचे उंचावलेले स्थान कसे जपावे हे आजही अनेकांना समजलेले दिसत नाही. पुरुषी वर्चस्वाखाली, नको त्या दंभाखाली ते आजही तिचे स्थान नाकारतात. तिला कह्यात ठेवू इच्छितात. त्या दृष्टीने आपल्या मुलांना, नातवंडांना काय शिकवावे, याचाही विचार या उत्सवानिमित्ताने व्हायला हवा. कारण सध्याची स्थिती, घटना प्रत्येकाला अंतर्मुख करणाऱ्या आहेत. सतत दुसऱ्यांकडे बोटे दाखवून आता चालणार नाही. परिस्थिती बदलायची तर तुम्ही-आम्ही, प्रत्येक घराने स्त्री सन्मानाची पताका फडकवत ठेवणे गरजेचे आहे आणि प्रथमपासून प्रबोधनाचे काम करणारा गणेशोत्सव ही संधी प्रत्येकाला नक्कीच देईल. या अर्थानेही मला हा गणेशोत्सव महत्त्वाचा वाटतो. हा संपूर्ण काळ आर्थिक उलाढालीचा असतो. या काळात अनेक व्यावसायिकांना, कारागिरांना, व्यापाऱ्यांना पैसे मिळतात. त्यांच्या व्यवहारांना चालना मिळते. मुख्य म्हणजे या सगळ्यामुळे बाजारात पैसा फिरतो. स्वाभाविकच असा उत्सव अनेकांची पोटे भरण्यास, त्यांच्या हाताला काम देण्यास कारक ठरतो. उत्सवाच्या जमेची ही बाजूही सध्या प्रकर्षाने जाणवत आहे. मात्र एकीकडे असे असले, तरी या सगळ्यात, वाढत्या बाजारुपणाच्या लाटेत आपली संस्कृती जपणेही मला तितकेच महत्त्वाचे वाटते. पैसा मिळवायला, व्यापार फुलवायला कोणी आक्षेप घेण्याचे कारण नाही; मात्र आता प्रत्येक माणसाने थोडे थांबून आज समाजाला कशाची गरज आहे, हे पाहावे असे वाटते. अगदी राजकारण्यांपासून सामान्यांपर्यंत सगळ्यांनीच एक क्षण तरी याचा विचार करावा आणि आपण करतो त्या कामातून समाजाला काय मिळणार आहे, याचे अवलोकन करावे. प्रत्येकाने नियुक्त केलेले काम या जाणिवेनिशी, विचारानिशी पार पाडले आणि पूर्ण क्षमतेने, पारदर्शकतेने, सचोटीने आणि संवेदनशीलतेने पूर्ण केले तरी समाजातील नकारात्मक चित्र बदलण्यास फार वेळ लागणार नाही, असे वाटते. प्रत्येकाने सर्वतोपरी उत्तम देण्याचा विचार केला तर सर्व प्रकारची कीड बघता बघता संपून जाईल. यंदा गणेशाने आपल्याला ही सम्यक दृष्टी द्यावी. कारण समाज खालपासून सुधारण्याची मोठी गरज आता निर्माण झाली आहे.

सध्या मन चाळवणाऱ्या अनेक गोष्टी अस्तित्वात आणि प्रत्येकाच्या आवाक्यात आहेत. त्यावर काहीही निर्बंध नाहीत. त्यासाठी काही पावले उचलण्याची गरज यानिमित्ताने व्यक्त करावीशी लागते. यासाठी सरकारकडूनही पावले उचलली जावीत आणि पालकांनीही योग्य ते संस्कार करत मुलांना यापासून दूर ठेवावे. आपल्या पाल्यालाच नव्हे तर सजग आणि सुजाण माणसाने आपल्या संपर्कात येणाऱ्या असमंजस माणसाला हे धडे देण्याची, संस्कारित करण्याची गरज आता ओळखायला हवी. कारण आज अनेकांची नैतिक मूल्ये हरपली आहेत. आपण काय करतो याचे भान हरपले आहे. त्यामुळेच ते परत एकदा रुजवण्याची गरज आहे. गणेशोत्सव त्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. शेवटी ही बुद्धीची देवता आहे. त्यामुळेच यंदा आपण त्याच्याकडे समाजाला चांगली बुद्धी देण्याचे वरदान मागू शकतो. प्रत्येक मतदार योग्य उमेदवाराला मत देण्याची शक्ती त्याच्याकडे मागू शकतो. केवळ बढाया मारणारे लोक आता समाजाला नको आहेत, हे त्याला विनवू शकतो. मुख्य म्हणजे वाढता बाजारुपणा कमी करण्यासाठी कार्यरत होण्याचा निर्धार आपण सगळेच करू शकतो. आज चालते तीच बातमी दिली जाते, छापली जाते आणि पुन्हा पुन्हा दाखवली जाते. पण या सगळ्यात सच्चेपणा आणि इमानाचा बळीही जाऊ शकतो. म्हणूनच रंजकतेचा अट्टहास, दुराग्रह आता तरी दूर होणे गरजेचे आहे. विकते आहे म्हणून नव्हे तर चांगले आहे म्हणून समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला तरच आपल्याला अपेक्षित आदर्श आणि खऱ्या अर्थाने प्रगत समाज निर्माण होईल. त्यामुळे गणरायाने आपल्या या सगळ्या भावनांचा विचार करावा आणि समाजाला हे दान देण्यासाठी शक्ती द्यावी हीच कामना.

*(लेखिका सुप्रसिद्ध गायिका आहेत)*

## रविवारची पत्रे

### काँग्रेसच्या अपयशाचा आढावा

भारतीय जनता पक्ष राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या सातत्यपूर्ण अपयशांची यादी मांडते. राहुल गांधी यांच्या निर्णयक्षमतेवर आणि राजकीय नेतृत्वावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**राजकीय वाटचाल** : राहुल गांधी यांनी २००४ साली अमेठी मतदारसंघातून पहिल्यांदा लोकसभा निवडणूक लढवली आणि विजयी झाले. मात्र, त्यानंतरच्या काळात त्यांच्या नेतृत्वाने काँग्रेसला कोणताही उल्लेखनीय फायदा झाला नाही. त्यांचे राजकीय निर्णय व रणनीती यांची परिणामकारकता प्रश्नचिन्हांत राहिली.

**भट्टा-परसोल घटना** : २०११ साली उत्तरप्रदेशातील भट्टा-पारसोल गावातील घटनांनंतर राहुल गांधी यांनी शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ भूमिका घेतली. तथापि, त्यांच्या या दौऱ्याचा शेतकऱ्यांच्या समस्यांवर कुठलाही ठोस परिणाम झाला नाही. त्यांची प्रतिमा एक प्रभावहीन नेता म्हणून उभी राहिली.

**अध्यादेश प्रकरण** : २०१३ मध्ये राहुल गांधी यांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तयार केलेल्या अध्यादेशाची प्रत पत्रकार परिषदेत फाडली. त्यांच्या या कृतीमुळे पक्षातील अंतर्गत असंतोष वाढला.

**दारुण पराभव** : २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला केवळ ४४ जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसला विरोधी पक्ष नेतेपदही मिळवता आले नाही; ज्यामुळे त्यांचे नेतृत्व अधिकच विवादास्पद ठरले. त्यांच्या असमर्थ नेतृत्वामुळे काँग्रेस पक्षाला ऐतिहासिक पराभवाला सामोरे जावे लागले.

**काँग्रेस अध्यक्षपदाचा स्वीकार** : २०१७ मध्ये सोनिया गांधी यांनी दीर्घकाळानंतर काँग्रेसच्या अध्यक्षपदाची धुरा राहुल गांधी यांच्याकडे सोपवली. मात्र, त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाला काहीच भरीव यश मिळाले नाही. काँग्रेसच्या जनाधारात घट झाली आणि पक्षाची स्थिती कमजोर झाली.

**आघाडीचे अपयश** : २०१७ मध्ये उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनी समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांच्यासोबत आघाडी केली. तथापि, या युतीमुळे काँग्रेसला अपेक्षित यश मिळाले नाही. युतीचा फायदा समाजवादी पक्षालाच झाला.

**चौकीदार चोर है आणि राफेल वाद** : २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर राफेल करारात भ्रष्टाचाराचे आरोप करत 'चौकीदार चोर है' हा नारा दिला. मात्र, काँग्रेसला कोणताही फायदा झाला नाही. उलट, काँग्रेसला फक्त ५२ जागा मिळाल्या; ज्यामुळे पुन्हा एकदा काँग्रेसला विरोधी पक्ष नेतेपद गमवावे लागले. २०१९ च्या लोकसभा अधिवेशनात राहुल गांधी यांचे गैरवर्तन अनेकदा चर्चेत आले.

**लोकसभेची उमेदवारी रद्द होण्याचे कारण** : २०२४ साली राहुल गांधी यांची लोकसभेची उमेदवारी एका मानहानीच्या खटल्यात दोषी ठरल्यामुळे रद्द करण्यात आली. गांधी यांनी काँग्रेसची आर्थिक परिस्थिती अत्यंत दयनीय असल्याचे सांगितले होते. प्रचारासाठी पुरेसा निधी नसल्याचे जाहीर केले होते. तरीही, काँग्रेसला केवळ ९६ जागा मिळाल्या; जे त्यांच्या अपयशी नेतृत्वाचे आणि कमजोर पक्ष संघटनेचे प्रतीक आहे.

**निष्कर्ष** : राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने सातत्याने अपयशाचा सामना केला आहे. त्यांच्या असमर्थ नेतृत्वामुळे काँग्रेस पक्षाच्या जनाधारात घट झाली आणि पक्षाच्या अंतर्गत संघटनेतही गंभीर असंतोष आहे. भाजपा राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर कठोर टीका करत आहे आणि भारतीय जनतेला काँग्रेसच्या अपयशाची जाणीव करून देत आहे.

**राजेंद्र सायरे**/नागपूर

### बेधुंद कारचालकांना वठणीवर आणा

नागपूरच्या रस्त्यांवर सध्या बेधुंद कारचालकांनी आतंक माजवून ठेवल्याचे दिसत आहे. कारचालकांनी दुचाकी किंवा इतर छोट्या वाहनांना धडक देण्याच्या घटना दररोज घडत आहेत. या अपघातांमध्ये कुणाचा जीव जातो तर कुणी आयुष्यभरासाठी अपंग होऊन बसतो, कोणाची रोजी-रोटी ठप्प होते. कशीही कार चालवणे, कुठेही थांबणे, सतत लेन बदलत राहणे, टपऱ्यांवरून काहीही खाण्यासाठी अगदी रस्त्यावरच कार थांबवून कारमध्ये बसून खाणे, सिग्नलवर झेब्रा क्रॉसिंगच्या पुढे जाऊन थांबणे, वर्दळीच्या रस्त्यावर अर्धाअधिक रस्ता घेरून कार पार्क करणे असा मनमानीपणा हे बेमुर्वत कारचालक करताना दिसून येतात. सिग्नलवर डावीकडे थोडी जागा दुचाकी आणि इतर लहान वाहनांसाठी सोडून कार उभी करायचा नियम आहे, परंतु हे कारचालक एका बाजूला एक अशा एका रांगेत चार-पाच कार उभ्या करतात. त्यामुळे दुचाकी चालकांनी आपले वाहन कुठे उभे करावे हा प्रश्न पडतो. सिग्नल सुरू होताच हे कारचालक आपले वाहन एकदम वेगात दामटतात आणि दुचाकींना कट मारून पुढे जायला पाहतात. दुचाकी आणि इतर लहान वाहनांना अगदी कचराच समजतात. आम्हालाच रस्त्यावरून जायचा हक्क आहे अशी यांची प्रवृत्ती असते. रात्रीच्या वेळेस तर या कारचालकांच्या अंगात कोणते भूत संचारते माहीत नाही. रात्रीला अनेक कॉलेजमध्ये शिकणारी पोरं आपल्या बा



ची कार घेऊन सोबत मित्रमंडळींना घेऊन मौजमजा करायला निघतात आणि बेधुंदपणे कार चालवतात. अशा रईसांच्या कार्ट्यांनी अनेक निरपराधी लोकांचा जीव घेण्याच्या अनेक घटना आतापर्यंत घडल्या आहेत. रात्रीच्या वेळेस अनेक कारचालक दारू ढोसून कार चालवतात. नशेत असल्यामुळे आपण कशी आणि किती वेगात कार चालवत आहोत, याचं त्यांना अजिबात भान राहात नाही. सद्यस्थितीत प्रत्येक घरी कार आहे आणि प्रत्येक घरातून दोन-चार ड्रायव्हर तयार होत आहेत. यांना फक्त कार चालवता येते; रहदारीचे नियम, कायदे याची माहिती नसते. कारचालकांमध्ये ट्राफिक सेन्स दिसून येत नाही. त्यामुळे आता अशा बेधुंद कारचालकांना वठणीवर आणणे गरजेचे असून वाहतूक विभागाने उपाययोजना कराव्यात. शहरात सीसीटीव्ही लागले आहेत; त्या माध्यमातून अशा वाहनचालकांवर लक्ष ठेवून त्यांना दंडित केले पाहिजे. प्रत्येक मुख्य रस्त्यावर स्पीडगनद्वारे गतीवर लक्ष ठेवले पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रात्री ८ ते पहाटे २ वाजेपर्यंत प्रत्येक मुख्य चौकात ड्रंकन ड्राईव्ह मोहीम सुरू ठेवली पाहिजे. याविषयी दोन महिन्यांपूर्वी मी डिसीपी ट्रॅफिक आणि पोलिस आयुक्तांना ई-मेल केले होते, परंतु त्यांनी काहीच पावले उचललेली दिसत नाही. परिवहन मंत्र्यांनी तरी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

**संजीव हरिदास हेडाऊ**/९३७०१६९५८२

### नेत्रदान जनजागरण : काही सूचना

दरवर्षी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबरदरम्यान नेत्रदान जनजागरण पंधरवडा साजरा करण्यात येतो. यंदा हे ३९ वे वर्ष आहे. इतक्या वर्षांपासून सुरू असणाऱ्या या मोहिमेची फलश्रुती म्हणावी तेवढी प्रभावी होताना दिसत नाही. दृष्टिबाधितांची संख्या (ज्यांना नेत्रदानामुळे दृष्टी प्राप्त होऊ शकण्याची शक्यता असते) आणि देशात दररोज मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या (ज्यांच्या मरणोत्तर नेत्रदानामुळे अशा दृष्टिबाधितांना दृष्टी मिळू शकते) यांची तफावत वाढतच जात आहे. याचे कारण मुख्यत्वे मरणोत्तर नेत्रदानाबद्दलची उदासीनता. सुज्ञ व्यक्तीला नेत्रदानाचे महत्त्व माहीत नाही असे नाही; परंतु पुढाकार घेऊन हे कार्य यशस्वी करण्याबद्दल त्यांची मानसिकता अजूनही तयार नाही. विविध संघटना, सरकारी, खाजगी, निमसरकारी, एनजीओ इ. जे दृष्टिबाधितांच्या कल्याणासाठी कार्यरत आहे, ते आपापल्या परीने दरवर्षी या पंधरवड्यादरम्यान जनजागरणासाठी विविध उपक्रमांद्वारे, शिबिरांद्वारे मोफत नेत्र तपासणी, नेत्रविकार व नेत्रदानासंबंधी सामान्य जनतेला प्रेरित करतात. परंतु त्याचा फारसा परिणाम होताना दिसत नाही. प्रोत्साहन, अनुदान किंवा प्रलोभन दिल्याशिवाय कोणी पुढे येत नाही. दृष्टिहिनांना दृष्टी मिळण्यास केवळ मरणोत्तर नेत्रदान केलेल्या व्यक्तीच्या मिळालेल्या कॉर्नियाशिवाय दुसरा उपाय नाहीच. त्यामुळे देशात दृष्टिबाधित लोकांची वाढती संख्या बघता सरकारने पुढाकार घेऊन विशेष योजना/उपाय करणे गरजेचे आहे. मरणोत्तर नेत्रदान प्रक्रिया अत्यंत सोपी व नि:शुल्क आहे. मरणोत्तर नेत्रदान केलेल्या व्यक्तीच्या परिवाराला सरकारतर्फे किंवा स्थानीय प्रशासनाद्वारे काही प्रोत्साहन राशी किंवा सवलती दिल्या तर काही प्रमाणात याला गती मिळेल, अशी आशा आहे. नागपुरात काही संस्था जसे 'सक्षम' (समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंधान मंडल) तसेच माधव नेत्रालय नेत्रदानासाठी प्रभावीपणे जनजागरण करीत आहेत. परंतु, या जनजागरणाची फलश्रुती प्रत्यक्ष नेत्रदानाची संख्या वाढेपर्यंत होणार नाही. नेत्रदान संकल्प करून स्वस्थ बसणे योग्य नाही. प्रत्येक परिवारांनी मृत व्यक्तीच्या संकल्पाचा आदर करावयास हवा व या पवित्र कार्यास हात भार लावावा. संकल्प केला नसल्यासदेखील मृत व्यक्तीच्या परिवाराच्या संमतीने नेत्रदान करता येते. चला तर या जनजागरण पंधरवड्याच्या निमित्ताने आपण या सर्वश्रेष्ठ दानाला एक चळवळीचे रूप देऊ व आपल्या परिवारात, परिसरात, नातेवाईक, आप्तेष्टांकडे कोणाचा मृत्यू झाल्यास त्या व्यक्तीचे नेत्रदान अवश्य करू, असा संकल्प करू या. बहुदा मृत व्यक्तीच्या नेत्रदानाकरिता कुठे व कसा संपर्क करावा याची माहिती नसणे, हे देखील या उदासीनतेचे कारण असू शकते. म्हणून संपर्क क्रमांक देत आहे. ०७१२-६७८५२०० व मोबाईल ९८२२२०८३८१ येथे संपर्क केल्यास सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येतील; ज्याला काहीही शुल्क लागत नाही. (मृत्यूनंतर सहा तासांच्या आणि डॉक्टरकडून मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक आहे.) ही जागरूकता निरंतर सुरू ठेवण्याचा संकल्प करूया व आपले सामाजिक दायित्व पार पाडूया!

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### आरक्षण वर्गवारीचा तिढा कायम?

'मोठा मासा लहान माश्यांना खातो' हे आरक्षणाचे मूळ आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय खंडपीठाने बहुमताने सर्व प्रकारच्या आरक्षणाला श्रेणी लावण्याचे सुचविले आहे. यावरून सधन आरक्षणार्थींनी आक्रमक भूमिका घेऊन केंद्र सरकार विरोधात दंड थोपटले. सुप्रीम कोर्टाने हा निर्णय अचानक घेतलेला नाही. यावर बरेच विचारमंथन झाले आहे. मग ओबीसींना असणाऱ्या आरक्षणाला का श्रेणी लावली गेली? कारण ओबीसी कायद्यातच तशी तरतूद केलेली आहे, असे सांगितले जाते आहे. असे असेल तर हा त्यांच्यावर अन्यायच नाही का? कुणी कितीही प्रयत्न केले तरीही भारतीय संविधान धोक्यात कधीच येऊ शकत नाही, हे सर्वजण जाणून आहेत. विरोधकांना केवळ आपली राजकीय पोळी शेकून घ्यायची असते. आरक्षणाची निर्मिती कशी झाली? दोन बैलांच्या झुंजीचे सोदाहरण यासाठी नेहमी पुढे केले जाते. यातील एक बैल हा बलवान असतो तर दुसरा हा कमजोर असतो. कमजोर बैलाचा स्पर्धेत कसा टिकाव लागणार; परंतु स्पर्धा ही नेहमीच दोन तुल्यबळ प्रतिस्पर्धींमध्ये होत असते. एक कमी एक जास्त असे नसते. मग तिथे भेदभाव केल्याचा आरोप करण्यास जागा असते. कुठल्याही स्पर्धेत डावपेचाला, कौशल्याला अधिक महत्त्व प्राप्त असते. हीच खरी वास्तविकता आहे. कमजोर प्रतिस्पर्ध्याला चांगली खुराक देऊन स्पर्धेचे नियम, डावपेच शिकविले गेले तर तो बलवान ठरू शकतो. मात्र, एखाद्याला संधी मिळूनही तो बलवान ठरत नसेल, त्याचा स्पर्धेत टिकाव लागत नसेल तर दोष कुणाचा? तसेच आरक्षणाचे आहे. आरक्षण हे कुणीही बंद करूच शकत नाही. आरक्षणाची विभागणी ही सामान्यत: तीन भागांत केली जाते. सामाजिकदृष्ट्या मागासलेले, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले. यात आणखी एकाची भर पडलेली आहे. ती म्हणजे वैचारिकदृष्ट्यांची. या गटात आपली सर्वांगीण प्रगती झाल्यानंतरही आपण मानसिकदृष्ट्या यातून बाहेर न पडल्या कारणाने स्वत:ला मागासलेलोच समजतो आहे. यात स्वत:चा व कुटुंबातील लोकांचा स्वार्थ हा दडलेला आहे, याची कबुली आपण देऊ शकत नाही. सोदाहरण द्यायचे झाल्यास एखाद्या कुटुंबातील बहुतांश लोक हे उच्चशिक्षित असून त्यांची वर्णी ही चांगल्या पगार व मानाच्या पदावर लागलेली आहे. मात्र त्यांच्याच कुटुंबातील इतर कुणाचीही परिस्थिती बेताचीच असेल; ते सर्वप्रकारची पात्रता अंगी असताना आरक्षणाचा लाभ उचलू पाहात असतील तर त्यांच्यासाठी कुणीतरी आरक्षणास पात्र असणाऱ्या शिक्षित व्यक्तीने आरक्षणाचा त्याग करणे अपेक्षित आहे. तेव्हाच खऱ्या गरजवंताला न्याय मिळू शकतो, असे सुप्रीम कोर्टाचे मत पडते आहे. याखातर तरी आपण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा मान ठेवून आपल्यापेक्षा कमजोर लोकांना संधी प्राप्त करून देण्याची भूमिका स्वीकारू या. ही आपल्याच समाजातील लोकांच्या हिताची बाब ठरणार आहे. सर्वांनाच समान संधी मिळाली पाहिजे याचा आग्रह धरला आहे. सुप्रीम कोर्ट अधिकार काढून घेऊ इच्छित नाही तर सबलांनी मोठ्या भावाची भूमिका स्वीकारावी, एवढेच मागणे केले आहे. तर मग पहा एकदा मोठ्या मनाने स्वार्थरहित विचार करून! पटते का ते?

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/




# विकास बँकेला ६ कोटींचा नफा, एनपीए शून्य टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

बँकेस रुपये ६ कोटी २४ लाख इतका ढोबळ नफा झाला आहे. तसेच महत्वाचे म्हणजे बँकेचे नेट एनपीए चे प्रमाण मागील सलग चार वर्षापासून सतत शून्य टक्के आहे. बँकेने ५५० कोटी चा व्यवसाय उद्दिष्ट पार केले असून CRR १९.३७ टक्के आहे. तसेच अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रास द्यायच्या कर्जाचे उद्दिष्टपण पूर्ण केले आहे, असे चेअरमन कमल राठी यांनी सांगितले.

विकास सहकारी बँक लिमिटेड सोलापूर या संस्थेची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण माहेश्वरी सांस्कृतिक भवन येथे झाली. त्यावेळी ते बोलत होते. आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी महाराष्ट्र राज्य अर्बन बँक फेडरेशनचा राज्यस्तरीय द्वितीय क्रमांकाचा उत्कृष्ट बँक पुरस्कार प्राप्त झाल्याचे चेअरमन राठी यांनी सांगितले. संचालक राजगोपाल मिणियार यांनी ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकांचे विश्लेषण सादर केले. यावेळी सभासदांना १२ टक्के लाभांशाची घोषणा करण्यात आली व विषय मंजूर झाल्यानंतर त्वरित सभासदांच्या खात्यावर लाभांश जमा देण्यात आला. आभार राजेंद्र कुमार आसावा यांनी केले. यावेळी संचालक राजगोपाल चंडक, हरीनिवास जाजू, ओमप्रकाश तिवाडी, मनीष बलदवा, नंदकिशोर मुंदडा, चंद्रशेखर स्वामी, रामकृष्ण पोरे,सुरेश बिटला, अनुराधा चांडक, व्यवस्थापक पांडुरंग मंत्री तसेच इतर सभासद उपस्थित होते.

# गणेश चिनवार यांचे निधन



**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

सोलापूर हनुमान नगर येथील रहिवासी गणेश प्रकाश चिनवार (वय ३५) यांचे शुक्रवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, आई, वडील, दोन बहिणी असा परिवार आहे.



# इको फ्रेंडली गणेशमूर्तींचा वाढला ट्रेंड

● गणेश युगच्या लाल मातींपासून बनवलेल्या मूर्तींची क्रेझ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट -**

सुखकर्ता दुखहर्ता वरदविनायक श्री गणेशाचे आगमन अवघ्या आठवड्यावर येऊन ठेपले आहे. यासाठी गणेश भक्तांमध्ये आतुरता आणि उत्कंठा लागलेली आहे. सध्या शहरात इको फ्रेंडली गणपतींचा मोठा ट्रेंड सुरू झाला आहे. कोरोना काळापासून घरामध्येच गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यासाठी अनेक गणेश भक्त इको फ्रेंडली गणेशमूर्तींकडे वळालेले दिसत आहेत. यामध्ये गणेश युग यांचे नाव सर्वप्रथम घेतले जात आहे. गणेश युग यांच्या लालमाती पासून बनवलेल्या गणेश मूर्तींची क्रेझ सध्या शहरात दिसून येत आहे. विविध आकारातील आणि मुद्रेतील गणपती बाप्पा भक्तांचे लक्ष वेधून घेत आहेत.

दरम्यान वरदविनायक गणपती बाप्पा सात सप्टेंबर रोजी घरोघरी विराजमान होणार आहेत. त्यासाठी सुमारे पंधरा दिवसांपासून गणपती बाप्पांचे शहरात स्टॉल थाटले गेले आहेत. या स्टॉलमध्ये असंख्य गणेश भक्तांनी आपला आवडता गणपती बाप्पा बुक केला आहे. लालमाती पासून बनवलेल्या गणपतीमध्ये सिद्धिविनायक, लालबाग, दगडूशेठ, टिटवाळा, नाना पाटेकर, शुर्पकर्ण आदिंसह विविध मुद्रेतील बाप्पा भक्तांचे लक्ष वेधून घेत आहेत. पाचशे रुपयांपासून ते पाच हजार रुपयापर्यंत या मूर्तींचे दर आहेत.

### नाविन्यपूर्ण गणपती बाप्पांच्या मूर्ती उपलब्ध

इको फ्रेंडली गणपती बाप्पांच्या स्वागतासाठी सज्ज झालो आहोत. गणेश युग यांच्याकडे नाविन्यपूर्ण गणपती बाप्पांच्या मूर्ती उपलब्ध आहेत. दरवर्षी गणेश युग यांच्याकडून गणेश मूर्तींची खरेदी करून घरांमध्ये प्रतिष्ठापना करतो. यातून आमच्या परिवाराला एक आत्मिक समाधान आणि आनंद मिळतो.

**- किरण सुरतवाला,** गणेशभक्त

### अवघ्या अर्ध्या तासांमध्ये इको फ्रेंडली गणपतीचे घरामध्येच विसर्जन करता येते

शाडू व लाल माती पासून बनवलेले इको फ्रेंडली गणपती भक्तांसाठी एक विशेष पर्वणी ठरत आहेत. सहा इंच ते अडीच फुटापर्यंतचे गणपती आमच्याकडे बनवले जातात. त्यामध्ये १२० प्रकारचे विविध मुद्रेतील गणपती बाप्पांचे मूर्ती उपलब्ध करण्यात आले आहेत. सुमारे एक गणपती बनवण्यासाठी तीन तासाचा कालावधी लागतो. अवघ्या अर्ध्या तासांमध्ये यागणपतीचे घरामध्येच विसर्जन करता येऊ शकते.

**- विकास गोसावी,** मूर्तिकार गणेश युग सोलापूर

# विषारी औषध प्राशन करून आईचा दोन मुलांसह आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट -**

विषारी औषध प्राशन करून आईने दोन्ही मुलांसह आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना शनिवारी सकाळी बाळे परिसरात घडली, धनश्री प्रविण डोलारे (वय ३०), आराध्या प्रविण डोलारे (वय ९) आणि अनिरूध्द प्रविण डोलारे (वय ६, तिघे रा. संतोष नगर, बाळे, सोलापूर) अशी उपचारासाठी दाखल झालेल्यांची नावे आहेत. धनश्री डोलारे या महिलेने शनिवारी दुपारी राहत्या घरी असताना अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन मुलगी आराध्या व मुलगा अनिरूध्द यांनादेखील विषारी औषध पाजून आत्महत्येचा प्रयत्न केला. यामध्ये तिघांनाही त्रास होऊ लागल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# सिध्देश्वर नगरातून मोबाईलची चोरी

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट -**

शहरातील नई जिंदगी परिसरातील सिध्देश्वर नगर भाग २ मधून चोरट्याने घरातून १८ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. याबाबत रशिद बशीर शेख (वय ६५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी शेख हे घरामध्ये मोबाईल ठेऊन बाहेर गेले असता चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश करून मोबाईल चोरून नेला. अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार पाटील पुढील तपास करीत आहेत.

## खरेदीपूर्व जाहिर नोटीस

**सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना विषेशतः** मोजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील लोकांना व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णनः** डि। व सब डि।। सोलापूर पैकी, तालुका दक्षिण सोलापूर पैकी, मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील भुमापन गट नं. ५४४/५४५ पैकी भावसार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या, कुंभारी या नावाने ओखळले जाणारे नगरामधील बिनशेती प्लॉट नंबर बी-१०२ याचे क्षेत्र ३२७७.९२ चौरस फूट इतकी जागा असून चतुःसिमा खालीलप्रमाणेः-

**पुर्वेस** :- रस्ता — **पश्चिमेसः**- रस्ता
**उत्तरेसः**- प्लॉट नं. बी १०१ व बी १०३ — **दक्षिणेसः**- रस्ता

सदर प्लॉट जागा सध्या विठठल दत्तात्रय पतंगे यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असून त्यांनी त्यांच्या वैयक्तिक अडचणीचे निरसन करण्याकरिता सदर प्लॉट जागा आमचे अशिलांना कायम खुषखरेदी करून देण्याचे ठरवून आमच्या अशिलांकडून कांही इसारा रक्कम स्विकारून तसा खुल्याजागेचे इसारापावती बनवून दिले आहेत. तसेच सदर खुली प्लॉट जागा निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे.

सबब, या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वर नमूद खुली प्लॉट जागेवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, पोटगी, टाच, सरकारी व निम सरकारी बँक कर्ज, पतसंस्था, फायनान्स, सोसायटी बोजा असल्यास किंवा दान, बक्षीस, वहिवाट, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, जप्ती, मृत्यूपत्र, वारसपत्र, अधिकारपत्र, करार मदार अगर इतर कोणत्याही प्रकारे हक्क दिल्यास किंवा हस्तांतरण केले असल्यास अथवा सदर जागेबाबत कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदोपत्रानिशी लेखी कळवावे, तसे न झाल्यास सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार चालणार नाही व ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द केली. सदरची खरेदीपूर्वजाहीर नोटीस दिली. तारीखः ३१/०८/२०२४

**श्री. अभिजीत नंदकिशोर ढगे**
**मो.नं.९३७१८०६७४६**

**सही/-**
**ॲड. नितीन ना. लोंढे**
**B.A.,MSW.LL.B**
प्लॉट नं. २८, राघवेंद्र नगर, माळी नगर,
एमआयडीसी, सोलापूर-४१३००६
मो.नं. ९७६४४१०९२१ । ७७२०८१८८५९
अशिलातर्फे ॲडव्होकेट

## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि व सब डि सोलापूर, पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी कसबे सोलापूर मधील वसंत विहार येथील मिळकत यांसी जुना सर्व्हे नं. ४८६, ४८५ व ४८३ नविन सर्व्हे नं. ५०८/१/२/३, ५०९/१/२,५११/१/२ पैकी बिनशेती प्लॉट नं. ५९-अ याचे एकूण क्षेत्र ४७५.९५ चौ.मि. यांसी चतुःसिमा पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस - ओपन स्पेस, दक्षिणेस - सब प्लॉट.नं. ६०, उत्तरेस - सब प्लॉट नं. ५९ सदर प्लॉट मिळकत ही श्री परशुराम विठोबा पांढरे यांच्या खरेदी मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे. सदर मिळकत या निर्वेध व निजोखमी अशी आहे तशी खात्री त्यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे व सदरचा प्लॉट मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरुपी खुष खरेदी देण्याचे मान्य व कबुल करुन आमचे अशिलांकडून इसारा रक्कम स्विकारुन त्यांनी रितसर इसारा पावती लिहून दिलेली आहे. तथापि सदर प्लॉट मिळकतीवर कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, दान, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वारसाहक्क, गहाणखत, वाटणीपत्र, बोजा वगैरे अशा वा अन्यप्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाचे मुदतीत लेखी कागदपत्रानिशी समक्ष हजर राहून खालील पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही तक्रार वा हरकत न आल्यास आमंचे अशिल सदरची प्लॉट मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्यासंबंधी खात्री झाल्यावरुन खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर कोणाचीही हरकत असल्यास ती हरकत आमचे अशिलांवर व सदर प्लॉट मिळकतीवर बंधनकारक असणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली तारीखः-३१/०८/२०२४.

**सही/-**
**अमोल शि. कळके**
बी.कॉम.(ऑ), एलएल.बी., ॲडव्होकेट
५ अ/१ दक्षिण कसबा, ऑफिस नं. १३,
बेसमेंट मजला, दमाणि कॉम्प्लेक्स, सोलापूर
मो.नं. ९८५०४३८३८१
अशिलातर्फे ॲडव्होकेट

## दिं सोलापूर इंडस्ट्रीयल को.आप. इस्टेट सोसायटी लि. सोलापूर

**पाटील नगर, होटगी रोड, सोलापूर - ४१३ ००३**
(फक्त सभासदांकरिता)

### ✻ जाहीर नोटीस ✻

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, रविवार दि.१५/०९/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा कॉमन फॅसिलिटी सेंटर, औद्योगिक वसाहत, पाटीलनगर, होटगी रोड, सोलापूर येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केलेले आहे. आपण सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

### ✻ सभेपुढील विषय ✻

१) मागील सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.
२) वैधानिक लेखा परिक्षकांकडून तपासून आलेले सन २०२३-२०४ चे (३१ मार्च २०२४ अखेर) तेरीज, ताळेबंद, नफा तोटा पत्रक यास मंजुरी देणे व लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
३) सन २०२३-२४ च्या वर्षाअखेर झालेल्या नफ्याच्या विभागणीस मान्यता देणे.
४) सन २०२३-२४ च्या अंदाज-पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५) सन २०२४-२५ च्या अंदाज-पत्रकास मंजुरी देणे.
६) सन २०२२-२३ चे दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
७) सन २०२४-२५ सालाकरीता वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणूक करणे.
८) सन २०२४-२५ सालाकरीता अंतर्गत लेखा परिक्षकाची नेमणूक करणे.
९) मा. अध्यक्षसाहेबांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.

**स्थळ - सोलापूर**
**दि.-३१/०८/२०२४**

**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन**
**बाळकृष्ण राजगिरी**
**व्यवस्थापक**

✻ गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्यातासानंतर त्याच ठिकाणी त्याच दिवशी सभा घेतली जाईल व त्यास गणपूर्तीची आवश्यकता भासणार नाही.
✻ कोणत्याही सभासदास वरील विषयासंबंधी काही प्रश्न विचारावयाचे असल्यास सर्वसाधारण सभेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेकडे लेखी देण्यात यावी.
✻ अपूर्ण पत्याअभावी सभासदांना अहवाल न मिळाल्यास कृपया संस्थेच्या कार्यालयामध्ये येवून परिपूर्ण पत्ता नोंदवून अहवाल घेवून जाणेचे करावे.

रेमुनं.४१५/२०१८
**निशाण न.४१**

## 'जाहीर समन्स'

## माढा येथील मे.सि.ज.ज्यु.डी.साहेब यांचे कोर्टात

**(मा.श्री.जी व्ही. गांधे सो कोर्ट)**

मनिषा महावीर खताळ ---- वादी
विरुध्द
विनायक केरु तांबे वगैरे ----- प्र.वादी

ज्याअर्थी यातील खालील प्रतिवादी हे दावेत दिलेल्या पत्त्यावर राहत नाही असा बेल्फि रिपोर्ट आलेनंतर वादी तर्फे दिलेले **निशाण नंबर ४०** वरील आदेशाप्रमाणे जाहीर समन्स बजावणेचा आदेश झालेवरुन प्रतिवादी नंबर ३ यांना या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की,

प्रतिवादी नं.३ जयवंत निवृत्ती मिसाळ रा.शिंगेवाडी ता.माढा जि.सोलापूर या प्रतिवादीस या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, वादीनी आपले विरुध्द सरस निरस मानाने वाटप, पृथक कब्जा व दरम्यानचे उत्पन्न मिळणेसाठी वरील दावा केलेला आहे.

त्यास आपले म्हणणे/कैफियत दाखल करणेसाठी पुढील नेमलेली तारीख **०५/१०/२०२४** रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर व्हावे, तसेच आपला राहता पत्ता, मोबाईल नंबर सादर करावा. वरील तारखेस आपण गैरहजर राहिलेस आपले काही म्हणणे नाही असे समजून पुढील योग्य ते आदेश केले जातील.

हे जाहीर समन्स आज रोजी दि. ३१/०८/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द केले.

**सही/-**
**(श्री. पी. एस. जगताप)**
**क. लि.**

शिक्का

**आदेशावरुन**
**सही/-**
**(श्री. डी. एस. अडसुळे)**
सहा. अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, माढा


S.A.P.D. Jain Pathashala's

**HNCC- MBA**
**An Autonomous Institution**

Ashok Chowk, **Solapur. Ph.No.: 2653206**
**E-mail-hnccsolapur@gmail.com | www.hnccmba.com**

**MBA ADMISSIONS 2024-25**
**Institute Level and CAP Vacancies**, if any

Desirous & Eligible candidates seeking admission to MBA course may contact office during office hours and submit their application latest **by 10.09.2024**
* Please Visit our website & notice board for update & changes in Schedule if any

**PRINCIPAL** **SECRETARY**


## जाहीर प्रसिद्धीकरण

**दि.कि. अर्ज नं. ६४/२०२४ नि.नं. ०६**
पुढील नेमलेली तारीख ०३/१०/२०२४

**बार्शी येथील मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात**
**(मा. श्री. व्ही.के. मांडे सो. यांचे न्यायालयात)**

**चि. आरव पारस मेहता,** वय १० वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क. वडील **पारस बाबुलाल मेहता,** वय ४२ वर्षे, धंदा- व्यापार, रा. सेंटर रोड नं.३, अंबाजी चौक, बोरीवली ईस्ट, आ.मु. बार्शी — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**महाराष्ट्र शासन** (याचे समन्स मा. जिल्हाधिकारी साहेब, सोलापूर यांचेवर बजावणेत यावे.) — **सा. वाला**

**अर्ज- गार्डीयनशिप ॲक्ट १९५६ व कलम २९**
**गार्डीयन्स ॲण्ड वॉर्डस ॲक्टप्रमाणे**

ज्याअर्थी, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी म्युनिसिपल हद्दीतील सि.स.नं. ३१५४/ब याचे क्षेत्रफळ चौ.मी. ९१.१० यासी चतुःसिमा- पूर्वेस- सि.स.नं. ३१५३, दक्षिणेस- नगरपालिकेचा रस्ता, पश्चिमेस- सि.स.नं. ३१५४/अ ची जागा व उत्तरेस- सि.स.नं. ३१५२/अ व सि.स.नं. ३१५२/क चे यामा, याची पाणी व वागणूक दक्षिण बाजूचे नगरपालिकेचे रस्त्यास जाते व आहे. यात ७८४ चौ.फूट याचे चौ.मी. ७२.८६ चे लोड बेअरींगचे बांधकाम व बाकी खुली जागा. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक घरजागा आतील सर्व तदंगभूत वस्तूसह. सदर मिळकत यातील अज्ञान अर्जदार आरव पारस मेहता याची मयत आई रिंकु उर्फ अपर्णा पारस मेहता हिचे मयत वडील नरेंद्र वाडीलाल सोळंकी यांचे मालकीची होती. ते मयत झालेनंतर अज्ञान अर्जदाराची आई रिंकु उर्फ अपर्णा पारस मेहता यांचे नावाची नोंद सदर मिळकतीचे मालकी हक्कात झालेली होती. रिंकु उर्फ अपर्णा पारस मेहता ही ता. १९/०३/२०२३ रोजी मयत झाली असून तिचे पश्चात यातील अज्ञान अर्जदार आरव पारस मेहता याचे नावाची नोंद सदर मिळकतीचे मालकी हक्कात झालेली आहे. सदर अज्ञान अर्जदार याचे मालकीची मिळकत त्याची आज्जी श्रीमती विमला नरेंद्र सोळंकी यांनी विक्रीस काढलेली असून सदरची मिळकत मारुती भाऊ चोरमले यांना विक्री करणेस अज्ञान अर्जदार आरव याचेतर्फे अ.पा.क. वडील पारस बाबुलाल मेहता यांना मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरुरीचे आहे. त्यासाठी अर्जदाराचा हा अर्ज आहे.

त्याअर्थी, वरील मिळकतीचे अज्ञान अर्जदाराचे मालकी हक्काबाबत अगर विक्री हस्तांतरण करणेचे व्यवहारास कोणाची काहीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी सदर प्रसिद्धीकरणापासून ३० दिवसांचे आत किंवा पुढील नेमली ता. ०३/१०/२०२४ रोजी सदर अर्जाचे कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर त्यांचे तर्फे मुखत्यार, वकील यांनी हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाची हरकत, अडथळा न आल्यास कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून अर्जाप्रमाणे अर्जदाराची मागणी मंजूर करणेत येईल.

कळावे, हे प्रसिद्धीकरण दिले. तारीख : ३१/०८/२०२४

सही/-
**लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३१०/२०२४**

**१) अरविंद वामन पाठक,** रा. सहस्त्रबुद्धे चाळ, खानपूर रोड, बार्शी, ता. बार्शी (असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. सहस्त्रबुद्धे चाळ, खानपूर रोड, बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ३० मे १९५९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ३० मे १९५९ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २८३/२०२४**

**१) सुजाता ज्ञानेश्वर हजारे,** रा. मंगरुळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव (असल्यास, तर्फे वकील पद्माकर बि. काटमोरे) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपंचायत, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा राहुल ज्ञानेश्वर हजारे, रा. मंगरुळ, ता. तुळजापूर यांचा मौजे वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २५ एप्रिल २००७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा राहुल ज्ञानेश्वर हजारे यांचा दिनांक २५ एप्रिल २००७ रोजी मौजे वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३११/२०२४**

**१) सुरेंद्र वामन पाठक,** रा. सहस्त्रबुद्धे चाळ, खानपूर रोड, बार्शी, ता. बार्शी (असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. सहस्त्रबुद्धे चाळ, खानपूर रोड, बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २४ ऑगस्ट १९६८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २४ ऑगस्ट १९६८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २६४/२०२४**

**१) खंडू मुरलीधर चेडे,** रा. पाटील प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, सोलापूर (असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची आई शांताबाई मुरलीधर चेडे, रा. पाटील प्लॉट, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आई शांताबाई मुरलीधर चेडे यांचा दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २८४/२०२४**

**१) राहुल दिवाकर माढेकर,** रा. फ्लॅट नं. १२२ ब्लॉक ए बेंगलोर कर्नाटक (असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. फ्लॅट नं. १२२ ब्लॉक ए बेंगलोर कर्नाटक यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०३ जानेवारी १९७७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०३ जानेवारी १९७७ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २७१/२०२४**

**१) सुलभा भालचंद्र लाड,** रा.रोडगा रस्ता,गणपती मंदीरजवळ, बार्शी, ता. बार्शी,जि.सोलापूर (असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. रोडगा रस्ता, गणपती मंदीर जवळ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २७ जानेवारी १९६६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २७ जानेवारी १९६६ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २९४/२०२४**

**१) विनोद भगवान जगताप,** रा. उत्रेश्वर मंदीर जवळ, मंगळवार पेठ, बार्शी, ता. बार्शी (असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. उत्रेश्वर मंदीर जवळ मंगळवार पेठ, बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २४ ऑक्टोबर १९६७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २४ ऑक्टोबर १९६७ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### सिकई मार्शल आर्ट स्पर्धेत हिंदुस्थानी स्कूलची मदिहा बसरी अजिंक्य

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

आंतरशालेय सिकई मार्शल आर्ट स्पर्धेत १७ वर्षाखालील वयोगटात हिंदुस्थानी कॉन्व्हेंट चर्च स्कूलची मदिहा मुजाहिद बसरी हिने अजिंक्यपद पटकविले. तिला क्रीडा शिक्षक बर्नार्ड अँथनी व सुहेल शेख यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या यशाबद्दल प्राचार्य व्ही. जेम्स, पर्यवेक्षक रवी पांडे, रुपाली उजागरे यांनी अभिनंदन केले.



### विंचूर जिल्हा परिषद शाळेत राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त कीट वाटप

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील विंचूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त खेळाडूंना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे यांच्या हस्ते स्पोर्ट्स किट देण्यात आले. हे कीट क्रीडाशिक्षक तुळशीराम शेतसंदी यांच्या वतीने देण्यात आले. अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बसवराज बिराजदार हे होते. यावेळी सरपंच बाळासाहेब पाटील, महादेव पेशवे, भीमाशंकर फुलारी, मुख्याध्यापक बसवराज बनपुरे, यल्लाप्पा कोळी, नितीन कोळी, शशिकांत साबळे,सुरेश म्हेत्रे, नागनाथ कोळी, शिवगोंडा पाटील, खंडप्पा पाटील, बालाजी चव्हाण, दशरथ कोळी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन तुळशीराम शेतसंदी यांनी केले. अशोक साळुंखे यांनी आभार मानले.



### राज मेमोरियल इंग्लिश स्कूलच्या चौघांची पुणे विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**सोलापर, दि. ३१ ऑगस्ट :**

श्रीकृष्ण कुस्ती केंद्र डोणगाव रोड,सलगर वस्ती रामवाडी या ठिकाणी झालेल्या मुलांच्या१४ व १७ वर्षाखालील मुलांच्या शालेय शहर कुस्ती स्पर्धेतून राज मेमोरियल इंग्लिश स्कूलच्या वेदांत मेकाले, विनीत देशमुख, विघ्नेश मेकाले व आर्यन पवार या चौघांची पुणे विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडूंना मुख्य प्रशिक्षकभरत मेकाले, क्रीडाशिक्षक अतुल सोनके, राज दसाडे, आशुतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे संस्था अध्यक्ष महेश कोठे, डॉ. राधिकाताई चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, प्राध्यापक विलास बेत, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांनी अभिनंदन केले आहे. शहर कामगिरी : फ्री स्टाईल : वेदांत भरत मेकाले (६५ किलो वजनी गट, प्रथम) विनीत विश्वराज देशमुख(८२ किलो वजनी गट, प्रथम), विघ्नेश भरत मेकाले (५२ किलो वजनी गट, प्रथम), आर्यन महेश पवार (४५ किलो वजनी गट, प्रथम ).

# रुबिना फ्रान्सिसला कांस्यपदक

पॅरिस पॅरालिम्पिक

◆ **पॅरिस, ३१ ऑगस्ट**



येथे सुरु असलेल्या पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत शनिवारी भारतीय नेमबाज रुबिना फ्रान्सिसने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल एसएच१ प्रकारात तिसरे स्थान मिळवत कांस्यपदक जिंकले. पिस्तूल नेमबाजीत पदक जिंकणारी रुबिना ही पहिली भारतीय महिला नेमबाज ठरली. या पदकाबरोबरच भारताची पदकसंख्या ५ झाली आहे. रुबिनाने २११.१ गुणांची नोंद करत कांस्यपदक मिळविले.

रिपब्लिक ऑफ इराणच्या सारेह जावनमर्दीने या स्पर्धेत पॅरालिम्पिक सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक साजरी केली. सारेहने अंतिम फेरीत २३६.८ गुणांसह आरामात विजय मिळवला. तिने २०१६ मध्ये रिओ आणि २०२१ मध्ये टोकियोमध्येही हेच विजेतेपद पटकावले होते. तुर्कियेच्या आयसेल ओझगलने (२३१.१ गुण) रौप्यपदक पटकावले.

२० नेमबाजांच्या पात्रता फेरीत रुबिनाने ५५६ गुणांसह सहावे स्थान मिळविले आहे. या पात्रता फेरीतून अव्वल ठरलेले आठ नेमबाज अंतिम फेरीसाठी पात्र ठरले.

पात्रता फेरीत रुबिनाची सुरुवात चांगली झाली नाही. तिने पहिल्या दोन मालिकेत प्रत्येकी केवळ ९० गुणांची नोंद केली. तिसऱ्या व चौथ्या मालिकेत अनुक्रमे ९५ आणि ९२ गुणांची नोंद करत अंतिम फेरीत प्रवेश केला व पदकाच्या आशा जिवंत ठेवल्या.

पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्टॅण्डिंग एसएच१ मध्ये स्वरूप महावीर उन्हाळकरने पात्रता फेरीत ६१३.४ गुणांसह १४ वे स्थान मिळवले व तो अंतिम फेरी गाठण्यात अपयशी ठरला.

भारताने सध्या सुरु असलेल्या पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये आतापर्यंत चार पदके जिंकली आहेत. अवनी लेखरा आणि मोना यांनी महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टॅण्डिंग एसएच १ मध्ये अनुक्रमे सुवर्ण आणि कांस्यपदक जिंकले तर मनीष नरवालने पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल एसएच १ मध्ये रौप्यपदक पटकावले. प्रीती पालने महिलांच्या १०० मीटर टी-३५ स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. ◀*(वृत्तसंस्था)*

# बोपण्णा, भाम्बरी जोडीदारांसह तिसऱ्या फेरीत

बालाजी बाहेर

◆ **न्यू यॉर्क, ३१ ऑगस्ट**

भारताच्या रोहन बोपण्णा व युकी भाम्बरी यांनी आपापल्या जोडीदारांसह विजयी घोडदौड कायम राखत अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या तिसऱ्या फेरीत धडक मारली, परंतु अन्य भारतीय एन. श्रीराम बालाजी आपल्या जोडीदारासह स्पर्धेच्या बाहेर झाला आहे.

द्वितीय मानांकित रोहन बोपण्णा व मॅथ्यू एबडेन यांनीही स्पेनच्या रॉबर्टो कार्बालेस बायना व फेडेरिको यांच्यावर ६-२, ६-४ असा विजय मिळवत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला.



एकमेकांचे अभिनंदन करताना ॲल्बानो ऑलिवेट्टी व युकी भाम्बरी

बोपण्णाने मिश्र दुहेरीतही इंडोनेशियन जोडीदार अल्दिला सुतजियादीसह विजय मिळवला. या आठव्या मानांकित जोडीने पहिल्या फेरीत जर्मनीच्या टिम पुएत्झ व नेदरलॅण्डच्या डेमी शुअर्स यांच्यावर ७-६ (७) ७-६ (५) असा विजय मिळवला.

दोन तास पाच मिनिटे चाललेल्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात युकी भाम्बरी व ॲल्बानो ऑलिवेट्टीने १५ व्या मानांकित ऑस्टिन क्रॅजिसेक व जीन-ज्युलियन रॉजर या जोडीवर ४-६, ६-३, ७-५ असा संघर्षपूर्ण विजय मिळवला. भाम्बरीची ग्रॅण्ड स्लॅममध्ये तिसरी फेरी गाठण्याची ही केवळ दुसरी वेळ आहे. यापूर्वी त्याने २०१४ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपनची तिसरी फेरी गाठली होती.

एन. श्रीराम बालाजी व त्यांचा अर्जेंटिनाचा साथीदार गुइडो अँड्रॉझी न्यूझीलंडच्या मायकेल व्हीनस ग्रेट ब्रिटनच्या नील स्कुप्स्की यांच्याकडून पराभूत झाल्यानंतर यूएस ओपनमधून बाहेर पडले. भारत-अर्जेंटिना जोडीला दुसऱ्या फेरीच्या सामन्यात ६-७ (४), ४-६ असा पराभव पत्करावा लागला. ◀*(वृत्तसंस्था)*

# जिजाऊ ज्ञान मंदिर स्कूलची मैदानी स्पर्धेत कामगिरी

## उत्तर सोलापूर तालुका क्रीडा स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

लोकमंगल इंग्लिश मीडियम स्कूल वडाळा येथे झालेल्या उत्तर सोलापूर तालुका मैदानी स्पर्धेत जाणता राजा बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मिडीयम स्कूल व विजयसिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालय कोंडी येथील विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेतली.

यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक दिलीप भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष गणेश निळ, प्राचार्य सुषमा निळ, मुख्याध्यापिका औरादे , प्रा.वैभव मसलकर, प्रा.कांबळे, प्रा उपाध्ये, प्रा.कोतकुंडे आदींनी अभिनंदन केले.

**कामगिरी :** १४ वर्ष : श्रावणी राहुल वाघचवरे (गोळा फेक, द्वितीय). १७ वर्षे : प्रशांत नेताजी राठोड (१०० मीटर धावणे, प्रथम). लांब उडी (द्वितीय), ११० अडथळा शर्यत (तृतीय), आकांक्षा अनिल शिंदे (थाळी फेक, व गोळा फेक (प्रथम), वैष्णवी नागनाथ दळवी (भाला फेक, प्रथम), सदाफ मोईन जहागीरदार (थाळी फेक, द्वितीय), अर्जुन अजय व्यवहारे (थाळी फेक, द्वितीय), शिंवाजली नानासाहेब खंदारे (हातोडा फेक, व्दितीय), प्रज्ञा नारायण निळ (लांब उडी, तृतीय).

१९ वर्षे : नेहा बालाजी मिसाळ (थाळी फेक, प्रथम), गोळा फेक (द्वितीय), श्रद्धा शरद जाधव (थाळी फेक, व्दितीय), माधुरी दत्तात्रय घोडके (लांब उडी, व्दितीय), १०० मीटर (तृतीय), दिव्या दत्तात्रेय गुंड (लांब उडी, तृतीय), प्रवीण देवीदास जाधव (थाळी फेक, तृतीय), क्रिश विलास तरटे (१०० मीटर, तृतीय).




सांगोला येथे सुरू असलेल्या कै. बापूसाहेब झपके स्मृती राज्य निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धेच्या मैदानावर पन्नाशी ओलांडलेल्या बास्केटबॉल खेळाडूंसाठीचा विशेष सामना सांगली मास्टर्सविरुद्ध सोलापूर मास्टर्स संघात झाला. त्यामुळे खेळाच्या आठवणींना उजाळा मिळाला.

## समृद्धी गाडेकरची विभागीय मॉडर्न पेंट्याथलॉन स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट -**



इंडियन मॉडेल स्कूल (सी.बी.एस.ई) च्या समृद्धी सचिन गाडेकर हिची पुणे विभागीय शालेय मॉडर्न पेंट्याथलॉन स्पर्धे साठी निवड झाली. स्वातंत्र्यवीर सावरकर जलतरण तलावात झालेल्या शालेय शहर स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटातून समृद्धी हिने चौथा क्रमांक पटकावला. या कामगिरीवर तिची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला क्रीडा शिक्षक सचिन ढवाण, राजकुमार माने व आंतरराष्ट्रीय कोच श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष ए.डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

## फुटबॉल स्पर्धेत पानगल महाविद्यालयास विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

शालेय फुटबॉल स्पर्धेत एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेजने १९ वर्षाखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयच्या मैदानावर झालेल्या सामन्यात पानगलच्या खेळाडूंनी आपल्या खेळाचे कौशल्य दाखवत सेंट जोसेफ कनिष्ठ महाविद्यालयास ७-0, वालचंद कनिष्ठ महाविद्यालयस ४-0 व हिराचंद नेमचंद कनिष्ठ महाविद्यालय २-0 अश्या फरकाने सामना जिंकून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयास २-0 असे नमविले. यात साकिब कुरेशी व उमर फारूक शेखने प्रत्येकी १ गोल केला. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक अल्ताफ सिद्दीकी, नावेद मुन्शी, इकबाल दलाल, कोच सैफुल्ला शेख, मुबारक बागवान यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघाचे प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान, उपमुख्याध्यापिका डॉ.सूररया परविन जहागीरदार, निकहत नलामंदू , अजीम शेख, गौस बागवान आदीनी अभिनंदन केले.



**विजयी संघ :** अवेस मुजावर, उमर फारूक शेख, शहानवाज शेख, आदिल बागवान, हुजैफ कुरेशी, साकिब कुरेशी, शाहनवाज शेख, अमीर खुसरो कुरेशी, झकवान काझी, सोबान हुंडेकरी, सादिक जमादार, अयान बागवान, रेहान डोंगे, उमेर तुळजापुरे, रेहान शेख, फैयाज मर्चंट, अबू जैद हन्नुरे, मुस्तकीम कलादगी.

## स्व. शंकर मस्कले स्मृती चषक जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा आज सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

ग्रँडमास्टर चेस अकॅडमी व सोलापूर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक यांच्या स्मरणार्थ खुली, १३, ७ व ९ वर्षाखालील गटाच्या जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन रविवार दिनांक १ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता टाकळीकर मंगल कार्यालय, जुळे सोलापूर येथे केले आहे.

सदर स्पर्धा फिडेच्या स्विस लीग नियमानुसार खेळाडूंच्या संख्येनुसार ५ ते ७ फेऱ्यात होणार असुन खेळाडूंना प्रत्येकी १0 मिनिटे व प्रत्येक चालीला ५ सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. या स्पर्धेत सोलापुर जिल्ह्यातील खेळाडू सहभाग घेऊ शकतात. ९ वर्षाखालील गटातील प्रथम येणाऱ्या दोन मुले व मुलींची निवड सोलापूर येथे होणाऱ्या राज्य बुद्धीबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. स्पर्धतील निवड झालेल्या प्रत्येक खेळाडूंना एक ते २५ हजार रुपयापर्यंतचे रोख बक्षिसे, मेडल व चषक देऊन विजेत्यांना देऊन गौरविण्यात येणार असुन स्पर्धेत एकूण ६0 पारितोषिके देण्यात येणार असल्याबाबतची माहिती ग्रँडमास्टर चेस अकॅडमीचे अध्यक्ष सरस्वती झंपले व सचिव गणेश मस्कले यांनी दिली आहे. आयोजकांकडून निवासाची व्यवस्था मोफत करण्यात आल्याबाबातची माहिती संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी सांगितले आहे. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे मो.क्र. ८८८८0४५३४४ अथवा प्रशांत पिसे मो.क्र. ८६२६0३७७३९ यांच्याकडे संपर्क साधावा, असे सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी कळविले आहे. जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.

# मुंबईसह पुणे, बीड, साताराचे संघ उपांत्यपूर्व फेरीत

## बापूसाहेब झपके स्मृती करंडक राज्य निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धा : सोलापूरचे संघ साखळीतच गारद

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३१ ऑगस्ट-**

कै. गुरुवर्य च. वि.तथा बापूसाहेब झपके यांच्या ४३व्या स्मृती करंडक राज्य निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धेत मुंबईच्या घाटकोपर वायएमसीए, घाटकोपर क्रीडा प्रतिष्ठान, मॅनिक स्पोर्ट्स अकॅडमी, इंडियन जिमखाना व प्रोनेट्स क्लबने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

येथील सांगोला विद्यामंदिरच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत डेक्कन जिमखाना पुणे, जय हिंद जिमखाना कडा (बीड) व एनव्ही अस सातारा या संघानेही उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. सोलापूर शहरासह जिल्ह्यातील एकाही संघाला उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळविता आला नाही.

**असे होणार उपांत्यपूर्व सामने**

घाटकोपर क्रीडा प्रतिष्ठान विरुद्ध डेक्कन जिमखाना पुणे.

मॅनिक स्पोर्ट्स अकॅडमी विरुद्ध जय हिंद जिमखाना कडा (बीड).

एनव्ही अस सातारा विरुध्द इंडियन जिमखाना.

घाटकोपर वायएमसीए विरुद्ध प्रोनेट्स क्लब मुंबई.



शिवरत्न अकलूज विरुद्ध एनव्ही अस सातारा

**सोलापूरच्या ग्रीन स्टार व सांगोलाची कडवी लढत**

शनिवारी सकाळच्या सत्रात शेवटच्या साखळीच्या सामन्यात सोलापूरच्या ग्रीन स्टार स्पोर्ट्स क्लबला उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळण्याची संधी मुंबईच्या प्रोनेट्स क्लबने हिरावून घेतली. चुरशीच्या सामन्यात त्यांना मुंबईकडून ४७-५२ असा पराभव स्वीकारावा लागला. पहिल्या दहा मिनिटाच्या डावात ग्रीन स्टारने १८-४ अशी निर्णयक आघाडी घेतली होती. मध्यंतराची २७-२0 ही आघाडीही त्यांना टिकविता आली नाही. अखेर ग्रीन स्टारला मुंबईकडून ४७-५२ असा पराभव स्वीकारावा लागला. ग्रीन स्टारकडून दानिश शेख १३ व मोईन सय्यद १0 गुण नोंदवित लढत दिली. मुंबईकडून एस. करण याने अचूक बास्केट करीत २१ गुण नोंदवित संघाचा विजय खेचून आणला. धर्मपाल कुमावत (७ गुण) याने त्यास साथ दिली.

अन्य एका साखळी सामन्यात घाटकोपर प्रतिष्ठान मुंबईस सांगोला तालुका असोसिएशनला ४६-४0 असे असे हरविताना चांगलीच दमछाक झाली. सोलापूरच्या हुपर्स संघाने सोलापूर स्पोर्टस इन्स्टिट्यूटवर २७-२५ अशी मात केली. अकलूजच्या शिवरत्न क्लबला साताराच्या एन व्ही अस ५३-४0 असे नमविले.

**ऑलिंपिक पदक विजेते स्वप्निल कुसळे यांच्या हस्ते आज पारितोषिक वितरण**

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आज रविवार १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता रायफल शूटिंग ऑलिंपिक पदक विजेते स्वप्निल कुसळे यांच्या हस्ते व मंगळवेढाचे प्रांताधिकारी बी.आर.माळी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी मंगळवेढा विक्रांत गायकवाड, तहसीलदार सांगोला संतोष कणसे, पोलीस निरीक्षक सांगोला भिमराव खणदाळे यांच्या उपस्थितीत तर उद्योगपती सिद्धार्थ झपके,विलास क्षीरसागर,सुहास होनराव,ज्ञानेश्वर तेली,नागेश तेली,मंगेश म्हमाणे,रत्नाकर ठोंबरे (पुणे) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होईल.

**आज झालेले साखळी फेरीचे अन्य निकाल**

डेक्कन जिमखाना पुणे वि. वि. चॅलेंजर्स स्पोर्ट्स गुणकी ७९-५६, घाटकोपर वाय एम सी ए मुंबई वि. वि. डू इट कोल्हापूर ५0-१४, खारघर वि. वि. साई स्पोर्ट्स पुणे ३२-१२, इंडियन जिमखाना मुंबई वि. वि. विद्या प्रतिष्ठान सोलापूर ५४-१२.



ग्रीन स्टार क्लब सोलापूर विरुद्ध या प्रोनेट्स मुंबई.



## काडादी प्रशालेत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट -**

के. एल.ई सोसायटी संचलित अण्णप्पा काडादी प्रशालेत राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जोडभावी पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी अनिता मोरे यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक अनिल पाटील यांनी केले.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रशालेतील क्रीडाशिक्षकांचा यथोचित सत्कार केला. यावेळी क्रीडाशिक्षक नागप्पा मैंदर्गी यांनी मेजर ध्यानचंद यांच्या विषयी सविस्तरपणे माहिती आपल्या मनोगतातून सांगितली.सूत्रसंचालन उपमुख्याध्यापिका सुरेखा म्हमाणे यांनी केले. राजश्री तावसे यांनी आभार केले.यावेळी पोलीस श्रीकांत पवार, निलेश खरात, एफ रेडिओचे निवेदिका आर.जे श्रद्धा, उपमुख्याध्यापिका सुरेखा म्हमाणे, पर्यवेक्षक दत्तात्रय पाटील हे उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### नगरपरिषद संवर्ग अधिकाऱ्यांचा संप; अक्कलकोटमधील नागरिकांचे हाल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासनाने विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केले. मात्र या योजनेतून नगरपरिषद संवर्ग अधिकाऱ्यांना वगळल्याने महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटनेने २९ ऑगस्टपासून संप पुकारल्याने नागरिकांचे हाल बेहाल झालेला आहे. महाराष्ट्रातील विविध विभागाच्या शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत राज्यभर २९ ऑगस्ट २०२४ पासून बेमुदत संप पुकारले होते. या आंदोलनात नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी सामील होणार होते. काही आंदोलनकर्त्यांचा मागण्या मान्य करत महाराष्ट्र शासनाने जुनी पेन्शन योजना लागू केली. जुनी पेन्शन योजना लागू झालेल्या विविध संघटनेने आपले आंदोलन माघार घेतले. मात्र नगरपरिषदेमधील २००५ नंतर सेवेत भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना २००५ सली लागू झालेली डीइपीएस पेन्शन योजना आणि २०१५ साली लागू झालेली एनपीएस पेन्शन योजना नगरपरिषदेतील संवर्ग कर्मचारी अद्यापपर्यंत या योजना लागू झालेला नाही म्हणून २९ ऑगस्ट २०२४ पासून महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेने संप पुकारले असून जोपर्यंत जुनी किंवा नवीन पेन्शन योजना लागू होत नाही. तोपर्यंत आंदोलन चालू राहणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी एका लेखी पत्रान्वये कळवले आहे. या आंदोलनामुळे अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी या तिन्ही नगरपरिषदेतील कामकाज कोळंबली होती.



### महाराष्ट्र विद्यालयात सखी सावित्री समितीची सभा; संरक्षणाचे दिले धडे

**बार्शी, दि. ३१ ऑगस्ट-**

महाराष्ट्र विद्यालयामध्ये सखी सावित्री समितीची सभा झाली. यावेळी संरक्षणाचे धडे देण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्या के. डी. धावणे यांनी केले. सचिव पी. टी. पाटील हे सखी सावित्री समितीचे अध्यक्ष आहेत. सचिव प्राचार्या के. डी. धावणे, सदस्य-नगराध्यक्ष रमेश पाटील, डॉ. सुनिता देशमुख, नगरसेविका योजना पवार, एस. जी. कातळे, विद्या भोरे, विद्यार्थी प्रतिनिधी हर्ष सुरवसे, समर्थ राऊत, विद्यार्थिनी प्रतिनिधी विश्वभारती अंधारे, मनस्वी भोसले यांची निवड करण्यात आली. या सभेमध्ये डॉ. सुनिता देशमुख व विद्या भोरे यांनी मनोगत व्यक्त केले. या सभेनंतर शाळा व्यवस्थापन व विकास आराखडा समितीची सभादेखील झाली. सूत्रसंचालन आनंद कसबे यांनी केले तर आभार पर्यवेक्षक एस. सी. महामुनी यांनी मानले.



### समाधी मठ येथे भाविकांना फळे वाटप

**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट-**

अक्कलकोट बुधवार पेठ येथील स्वामी समर्थ समाधी मठ येथे स्वामी भक्तांना शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुनिल कटारे यांच्या वतीने फळे वाटप करण्यात आले. याप्रसंगी तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे, तालुका महिला संघटिका अनुराधा शिवगुंडे, अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष अय्याज जमादार, प्रसिध्दी प्रमुख मल्लिनाथ खुबा, शहर उपप्रमुख सुमन वेदपाठक, शाखाप्रमुख व पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख अनिल कोकीळ यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला.

# मनोज जरांगे-पाटलांची सोलापूरला धावती भेट

## छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करून मालवणकडे रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील हे मालवणला जात असताना सोलापुरातील छत्रपती संभाजीराजे चौकात त्यांनी समाज बांधवांची धावती भेट घेतली. यावेळी छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करून पत्रकारांशी संवाद साधला.

सोलापुरातील धनुर्धर साईराज हणमे याला शुभेच्छा देऊन जरांगे पाटील यांनी सत्कार केला. हा पठ्ठ्या मेडल घेऊन नक्की येईल हा विश्वास त्यांनी दाखवला. तुझा पहिला सत्कार मी करणार, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. साईराजच्या सत्कारानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

छत्रपतींच्या बाबत कोणीही राजकारण करू नये. ज्यांनी





उद्घाटन केले त्यांचा काहीही दोष नाही. मात्र ज्यांनी पुतळा उभारणी केली त्यांना अटक करून कायम स्वरूपी शिक्षा दिली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. दरम्यान, अंतरवाली सराटी या ठिकाणी झालेल्या बैठकीत जगातील सर्वात मोठ्या आंदोलनाची वर्षपूर्ती झाली त्यानिमित्त समाज बांधवांशी चर्चा झाली असे त्यांनी सांगितले. विधानसभेबाबत आत्ताच भूमिका स्पष्ट करणे योग्य ठरणार नाही असे सांगताना योग्य वेळी नक्कीच सांगेन असे ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले. जर मराठा आरक्षण प्रश्न सुटला नाही तर उपोषण करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शिवछत्रपतींचा पुतळा कोसळल्या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट करत असताना इतर विविध प्रश्नांवर मते व्यक्त केली. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुस्लिम समाज बांधवांची उपस्थितीत लक्षणीय होती. त्यानंतर मालवणच्या दिशेने प्रयाण केले. यावेळी सकल मराठा समाजाचे माऊली पवार, राजन जाधव, नानासाहेब काळे, विनोद डोंगरे, शिवाजीराव चापले, महेश पवार, अमोल भोसले, सचिन गुंड, दिनेश डोंगरे, सचिन पवार, चंद्रकांत पात्रे, पिंटू माने, बब्रुवान माने-देशमुख, सतीश शिंदे, अजहर शेख, मतीन बागवान उपस्थित होते.

# आ. राम सातपुते, दानवेंवर भाजपाकडून मोठी जबाबदारी

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**





भाजपा कोअर कमिटीची महत्वपूर्ण बैठक शुक्रवार, दि. ३० ऑगस्ट रोजी पार पडली. या बैठकीत माजी मंत्री रावसाहेब दानवे यांना विधानसभा निवडणूक संयोजकपदाची जबाबदारी देण्याचा निर्णय घेण्यात आला. तर आमदार राम सातपुते यांच्यावर अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश प्रभारीपद सोपवण्यात आले आहे.

आगामी विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमिवर सर्वच पक्षांनी हालचाली सुरु केल्या आहेत. यातच आता भाजपनेही आपला मास्टर प्लान तयार केला आहे. यानुसार, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्यावर विधानसभा निवडणूक संयोजक पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. विधानसभा निवडणूकांच्या अनुषंगाने सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. येत्या दोन महिन्यात निवडणूका होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने पक्षात मोठे बदल केल्याचे पाहायला मिळाले. यात रावसाहेब दानवेंवर भाजपच्या महाराष्ट्रातील विजयाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

### निंबर्गीच्या तंटामुक्त अध्यक्षपदी रामचंद्र गुरव

**मंद्रुप, दि. ३१ ऑगस्ट-**



निंबर्गी येथील महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी रामचंद्र मार्तंड गुरव यांची निवड करण्यात आली. सरपंच श्रीदीप हसापुरे व उपसरपंच पिरसाब हवालदार यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली. रामचंद्र गुरव यांची अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल जिल्हा दूध संघाचे संचालक सुरेश हसापुरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अरुण बिराजदार, गंगाधर बिराजदार, जगदेव ककमारे, चंद्रकांत पाटील, निशांत लाडे, मिलिंद पाटील, जगू स्वड्डी, महादेव फुलारी, प्रदीप खुणे, कल्लप्पा गुरव, बसवराज माळगे, सरपंच श्रीदिप हसापुरे, उपसरपंच पिरसाब हवालदार, ग्रामसेवक नागेश जोडमोटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## श्रावणमास प्रवचनमाला- २७

# संत हे अविनाशी समाधानी वृत्ती, समदर्शी अवस्थेचे असतात

**●डॉ. जयवंत बोधले महाराज●**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ ऑगस्ट-**

जीव हा अविद्येने ; अज्ञानाने युक्त आहे. म्हणून, त्याला पूर्णत्व नसते. अपूर्णता ही जीवामध्ये अर्थातच माणसामध्ये असते आणि पूर्णावस्था ही परमात्मा स्वरुप असते. ज्ञानसंपन्न अवस्था ही 'पूर्ण-अवस्था' होय. म्हणून, संत हे परिपूर्ण अवस्थेत असतात. संतांनी कळीकाळावर विजय मिळवलेला असतो. संत एकनाथ महाराज हे पूर्णावतारी संत आहेत. म्हणजेच, ते परब्रह्म आहेत, असे श्रीगुरु डॉ.जयवंत महाराज बोधले यांनी आजच्या प्रवचनात सांगितले.

**केशवभट्ट नाथबाबांचे वर्णन करताना म्हणतात-**

**पूर्णावतार सत्पुरुष तो साक्षात जगदीश।**

ज्याच्याकडे पूर्णत्व आहे असा सत्पुरुष म्हणजे संत एकनाथ महाराज आहेत. देव पूर्ण आहे, संत परिपूर्ण आहेत तर माणूस अपूर्ण आहे. भावार्थदीपिकेत ज्ञानोबाराय सांगतात, नदीचे पाणी हे गाईला आणि हिंस्र वाघ या दोघांनाही समान न्याय देते. तद्वतच, संतांचं चित्त ही सर्व इतरेतर जीवांवर असतं.

कावळा आणि कोकिळा दोन्ही दिसायला सारखेच ना हो...... मग, दोहोंत भेद कसा? तर वसंत ऋतू आल्यावर कोकिळा ही कोकिळाच आहे आणि कावळा हा कावळाच आहे. चाफा आणि धोतरा दिसायला दोघेही पांढरेच! परंतु, जेव्हा कवी धोत-याला विचारतो, अरे, तुझा सुगंध कुठे आहे....? तेव्हा, चाफ्याचा धोतरा व्हायला वेळ लागत नाही. जीवाच्या ठिकाणी वरपांगीपणा दिसून येतो. संत मात्र, अंतर्बाह्य गुणांमुळे ओळखले जातात. संतत्व ही एक अवस्था आहे.

डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज पुढे निरुपण करतात की, ज्यांच्या हातात जाणे आणि येणे असते, ते संत असतात. देवाला सुद्धा बोलवावे लागते, आळवावे लागते. पण, संतांना बोलवावे लागत नाही. म्हणून, ते अवतारी असतात. सामान्य माणसाच्या जाणे आणि येणे ही त्यांच्या हातात नसते. संत एकनाथ महाराज तीन वेळा आले आणि तीन वेळा निघून गेले. म्हणून, संतांना येणे आणि जाणे नसतेच. डॉ.श्रीगुरु जयवंत महाराज वर्णन करतात, नाथांचे निधन झाले होते. आणि त्या पैठणमधील एक मुलगी सासरी चालली होती. तेवढ्यात त्या रस्त्याने नाथांचे प्रेत चालले होते. त्या मुलीला आणि तिच्या आईला वाटते ; हे प्रेत आडवे गेले. हा अपशकून आहे. त्या मुलीची आई मोठ्याने म्हणाली. बरं, माझ्या मुलीला जाताना हा नाथ आडवा गेला......! हे नाथांनी ऐकले आणि नाथ त्या ताटीवरुन उठून म्हणाले, थांबा, थांबा बाई.....! मी आलो......!! घाब-याघाब-या त्या ताटीचे खांदेकरी ही पळू लागले आणि ती बाई ही पळू लागली. अशी ही नाथांची अचंबित करणारी अद्भुत कथा. म्हणून, संत हे अविनाशी समाधानी वृत्तीचे आणि समदर्शी अवस्था असलेले असतात.

### अभिनेत्री प्रभावती घोगरे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३१ ऑगस्ट-**



बावडा (ता. इंदापूर) येथील प्रभावती संपतराव घोगरे (वय ९२) यांचे शुक्रवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच मुली, सुना, जावई, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे माजी सचिव राजेंद्र घोगरे यांच्या त्या मातोश्री होत. हिंदी, मराठी, तमीळ, मल्याळम चित्रपटातील अभिनेत्री प्रणाली घोगरे यांच्या त्या आजी होत. विशेष म्हणजे अकलूज येथे चित्रित झालेल्या कारभारी लय भारी या सिरीयलमध्ये प्रभावती घोगरे यांनी आजीचा रोल केला होता. तो फारच गाजला होता.

# शिक्षकांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे

## भूषण कुलकर्णी : पंढरीत अध्यापन प्रक्रियेत नवतंत्रज्ञानाच्या वापरावर प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ ऑगस्ट-**

नव्या-तंत्रज्ञानाचा वापर शैक्षणिक क्षेत्रात वाढविल्यास अध्यापन-अध्ययन प्रक्रिया सुलभ व परिणामकारक होते हे प्रयोगाअंती सिद्ध झाले आहे. नव्या-तंत्रज्ञानाच्या वापराने अध्यापन प्रक्रिया सोपी होण्यास मदत होते. केवळ व्याख्यान पद्धतीचा वापर केल्यास विद्यार्थ्यांना अध्यापनात रुची निर्माण होत नाही. त्यामुळे अध्ययन प्रक्रिया ही रटाळ आणि कंटाळवाणी होते. सध्याची शिक्षण पद्धती पाहून शिकण्याची असल्याने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षण पूरक साधनांचा पुरवठा करावा, असे मत एज्युटेक कॉर्पोरेशन, अहमदनगर येथील भूषण कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात महाविद्यालयीन प्राध्यापकासाठी आयोजित 'अध्यापन प्रक्रियते नव-तंत्रज्ञानाचा



वापर' या विषयावरील प्रशिक्षण शिबिरात बोलत होते. प्रथम सत्रामध्ये ओबीएस स्टुडिओचा वापर करून संगणकाच्या मदतीने स्वत:चे लेक्चर रेकॉर्ड करण्याविषयी मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रामध्ये शिक्षकांनी स्वत:चे लेक्चर रेकॉर्ड करून घेतले. तिसऱ्या सत्रामध्ये अध्यापन प्रक्रियेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कशा पद्धतीने करावा याचे प्रशिक्षण देण्यात आले. एज्युटेक कॉर्पोरेशन, अहमदनगर येथील एकनाथ कोरे यांनी सर्व तांत्रिक बाबींचे सादरीकरण केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते. यावेळी उपप्राचार्य प्रा. डॉ. भगवान नाईकनवरे, प्रा. डॉ. बाळासाहेब बळवंत, प्रा. राजेश कवडे, प्रा. डॉ. तुकाराम अनंत कवळस, नॅक समन्वयक डॉ. अमर कांबळे, नॅक सहसमन्वयक डॉ. समाधान माने, रुसा समन्वयक प्रा. योगेश पाठक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अमर कांबळे यांनी केले तर यावेळी पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. समाधान माने यांनी करून दिला.

# संत समाजाचे दिशादर्शक असतात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

चातूर्मासानिमित्त स्थानकात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. संतांचे आगमन झालेले आहे. चातुर्मासाच्या या पवित्र काळात जप, तप ,उपवास,साधना,सत्संग करून श्रद्धा मजबूत करा.संत आपल्याला जागे करतात. संत समाजाचे दिशादर्शक,पथदर्शक असतात. श्रावक-श्राविकांना योग्य मार्गावर आणण्याचे काम संत करत असतात.आपल्या रसाळ वाणीने ईश्वराचा संदेश आपल्यापर्यंत प्रवचनाच्या माध्यमातून पोहोचविण्याचे काम करतात'असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

चंदनामुळे,चंद्रमामुळे आपल्याला शीतलता लाभते. ज्याच्याकडे चंदन आहे त्यालाच शितलता लाभते. चंद्रमाची शीतलता सर्वांना लाभते. या दोघांपेक्षा अधिक शीतलता साधू संतांच्या सहवासात लाभते.संतांचे




समाजावर उपकार असतात. श्रावक श्राविका जर चुकीच्या मार्गावर जात असतील तर त्यांना संत योग्य मार्ग दाखवतात.संत हे समाजाचे पहारेकरी असतात. तीर्थक्षेत्राएवढे पुण्य संतांच्या दर्शनाने मिळते. संत सानिध्यामुळे तुरंत शुभकार्माचे उपार्जन होते. साधुसंतांचे आपल्यावर उपकार असतात,कारण ईश्वराने सांगितलेला धर्म टिकवून ठेवण्याचे काम ते करत असतात. एखादी इमारत उभी करायची म्हटले की चार खांब महत्त्वाचे असतात. त्याप्रमाणेच साधू-साध्वी,श्रावक- श्राविका हे धर्माचे खांब होत. धर्मरूपी इमारत मजबूत हवी असेल तर हे चारही खांब भक्कम असावे लागतात.

# बँकांनी असोसिएशनमार्फत नोकर भरती करावी

## प्रकाश वाले : मागील वर्षात सहा बँकांची ऑनलाईन, ऑफलाईन नोकर भरती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन मार्फत मागील वर्षात ६ बँकांचे ऑनलाईन;ऑफलाईन नोकरभरती केलेले आहे. आपल्या असोसिएशनला नोकरभरती मुदतवाढ मिळालेली आहे. जास्तीत जास्त बँकांनी आपल्या असोसिएशन मार्फत नोकरभरती करावे. असोसिएशनच्या मुरारजी पेठ येथील जागेचे बांधकामाला लवकरच सुरुवात करीत असून, बँकांसाठी प्रशिक्षण हॉल उपलब्ध करुन देण्यात येईल. उपनिबंधक (परसेवा) सहकारी संस्थाचे उमेश पवार यांनी १०१ अंतर्गत थकीत कर्जाचे जास्तीत जास्त निकाल दिलेबद्दल त्यांचे प्रथमत: आभार मानतो, असे प्रतिपादन बँक्स



> उपनिबंधक (परसेवा) सहकारी संस्थाचे उमेश पवार यांच्या १०१ अंतर्गत थकीत कर्जाच्या निकालामुळे बँकेची वसुली चांगल्या पद्धतीने होत आहे. असोसिएशनने बँकांना जास्तीत जास्त प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन करावे.
>
> **- नंदकुमार फाटे,** संचालक, मोहोळ अर्बन बँक

असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये व्यक्त केले.

यावेळी असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी ढवळे यांनी सभेपुढील सर्व विषय वाचून दाखविले. त्या सर्व विषयास व ऑडिटेड नफातोटा, ताळेबंद पत्रकास उपस्थित सभासद बँक प्रतिनिधींनी एकमताने मंजुरी दिली व सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.

संचालक सीए राजगोपाल मिणियार यांनी आभार मानले व बँकांना अडचणी सोडविण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करु असे मत व्यक्त केले. सभेस असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ.अशोक सुरवसे, निशिगंधा बँकेचे कल्याणराव काळे, विकास बँकेचे सीए राजगोपाल मिणीयार, व्यापारी बँकेचे राजगोपाल झंवर, महेश बँकेचे शंकर पाटील, महावीर बँकेचे दीपक मुनोत, विद्यानंद बँकेचे दिनकर देशमुख, मोहोळ अर्बन बँकेचे संगीता फाटे, नंदकुमार फाटे, मनोरमा बँकेच्या अस्मिता गायकवाड, कमला बँकेचे दिलीप पतंगे, शरद बँकेचे महेश माने, सोलापूर जनता सहकारी बँकेचे आनंदराव कुलकर्णी, निलकंठ बँकेचे महावीर जाधव, कविता बँकेचे अशपाक दंडोती, पंढरपूर अर्बन बँकेचे कृष्णकुमार पेंडाल, समर्थ बँकेचे युवराज जगदाळे यांच्यासह अनेक नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. खेळीमेळीच्या वातावरणामध्ये असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली.

### गुरव महासंघातर्फे आज उद्योजकता विकास शिबीर

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

राष्ट्रीय गुरव समाज महासंघच्या वतीने युवक व युवतींना नवीन उद्योग उभारून उद्योजक बनवण्यासाठी उद्योग मार्गदर्शन शिबिराचे आयोजन रविवार १ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता समाज कल्याण केंद्र येथे करण्यात आले आहे.

उद्योजक कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. आण्णासाहेब गुरव हे ३ हजार ५०० उद्योगाबद्दल माहिती देणार आहेत. अध्यक्षस्थान बाळासाहेब क्षीरसागर हे भूषविणार आहेत व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गणपती फुलारी व रमाकांत पाटील राहणार आहेत. समाजातील बहुसंख्य नागरिकांनी उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मल्लिकार्जुन गुरव यांनी यावेळी बोलताना केले आहे.

# पंढरपूरच्या २२ गावांतील बहिणींसाठी रक्षाबंधन

**आ. समाधान आवताडे यांच्या वतीने कासेगाव आणि लक्ष्मी टाकळीत आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ ऑगस्ट-**

श्रावण महिना आणि रक्षाबंधनाच्या निमित्ताने लाडक्या बहिणींना भेटण्याचे, त्यांच्याशी हितगुज करण्याचे नियोजन आ. समाधान आवताडे यांनी केले आहे. पंढरपूर शहर आणि ग्रामीण भागातील महिलांसाठी हळदी कुंकू, रक्षाबंधन, स्नेहभोजनाचे नियोजन केले आहे. रविवारी १ सप्टेंबर रोजी लक्ष्मी टाकळी आणि कासेगाव येथे रक्षाबंधन सोहळा होणार आहे.

१ सप्टेंबर रोजी रांजणी, मुंढेवाडी, अनवली, गोपाळपूर, एकलासपूर, सिद्धेवाडी, तावशी, तनाळी, खर्डी, तपकिरी शेटफळ, कासेगाव, चिचुंबे, शिरगाव, तरटगाव येथील महिलांसाठी

> बहीण-भावाच्या नात्याला दृढ करणारा हा रक्षाबंधन सोहळा असून यानिमित्ताने माता-भगिनींशी हितगुज करण्याचा प्रयत्न आहे. माता-भगिनींनी मोठ्या संख्येने या सोहळ्यास उपस्थित रहावे.
>
> **- आ. समाधान आवताडे**

कासेगाव येथील यल्लम्मा मंदिर परिसरात तर वाखरी, गादेगाव, कौठाळी, शिरढोण, कोर्टी, बोहाळी, उंबरगाव, लक्ष्मी टाकळीसाठी लक्ष्मी टाकळी बायपास येथील प्रथमेश मंगल कार्यालय येथे तर ३ सप्टेंबर रोजी पंढरपूर शहर, उपनगर आणि इसबावी भागातील महिलांसाठी श्रीराम मंगल कार्यालय, इसबावी, संत मीराबाई मठ, कैकाडी महाराज मठाजवळ, पंढरपूर, शनेश्वर मंगल कार्यालय, सांगोला रोड, पंढरपूर येथे हा कार्यक्रम होणार आहे.

## क्राईम वृत्त

### पूर्व वैमनस्यातून अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट -**

पूर्व वैमनस्यातून महिलेच्या घरात घुसून मारहाण करून अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत मुलीच्या आईच्या फिर्यादीवरुन शकीला हफिस शेख, तिचा पती हफिस शेख तसेच मुलगी जोनिया आणि जवेरीया शेख यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून २४ मे रोजी रात्री शकिला, त्यांचा पती हफिस व मुलींनी यातील पिडीतेच्या घरात घुसून अश्लिल शिवीगाळ करून मारहाण केली. या भांडणाचा फायदा घेत हफिसने पिडीतेशी अश्लिल वर्तण करीत तिला अश्लिल शिवीगाळ करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. म्हणून याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे पुढील तपास करीत आहेत.



---

### गळफास घेऊन वृध्दाची आत्महत्या

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट -**

शहरातील लोकमंगल ऑक्सीपार्कच्या शेजारी बेसमेंट गाळ्याच्या समोर लोखंडी अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केली. चनमल मलप्पा कुंभार (वय ६५, रा. मड्डी वस्ती, जोशी गल्ली, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या वृध्दाचे नाव आहे. शनिवारी सकाळी साडेसहाच्या पूर्वी लोकमंगल ऑक्सीपार्कच्या शेजारी बेसमेंटमधील गाळ्याच्या समोर ॲगलच्यावरती चढणाऱ्या पायऱ्यांना रस्सीच्या सहाय्याने चनमल कुंभार यांनी गळफास घेतल्याचे दिसून आल्याने त्यांना खाली उतरवून फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील पोलिस नाईक जी एम चव्हाण यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी कुंभार यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. तुषार ईमडे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

---

### महिलेच्या घरात घुसून वस्तू व कागदपत्रे चोरणाऱ्या १० जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

महिलेच्या घरात घुसून वस्तु व कागदपत्रे असा ६७ हजारांचा ऐवज चोरून नेणाऱ्या १० जणांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पल्लवी विकास जाधव (वय ३९, रा. मुस्लीम पाच्छा पेठ, शब्बीर मंगल भांडारच्यासमोर, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन रमेश रामचंद्र गायकवाड, मिना गायकवाड, रूत्वीक गायकवाड, शोभा गायकवाड, शिवा गायकवाड, शाहजूर रजाक शेख, रजाक शेख, वसीम शेख, रिजवान पटेल, बबलू कुरेशी (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ ऑगस्ट रोजी दुपारी रमेश गायकवाड व त्यांच्या साथीदारांनी पल्लवी जाधव यांच्या घरात घुसून घरातील सामानाची तोडफोड करण्यास सुरुवात केली. त्यावेळी पल्लवी जाधव या कामावर गेलेल्या होत्या. पल्लवी यांच्या सासू यांनी त्यांना व त्यांच्या पतीला फोनवरून ही बाब सांगितल्यानंतर ते दोघेही घरी आले. त्यावेळी रमेश गायकवाड व इतर सर्वजण हे पल्लवी यांच्या घराच्या खाली राहणारे वाघमारे यांच्या घरात घुसून त्यांच्या घरातील सामान बाहेर टाकत होते. त्यावेळी पल्लवी यांच्या पतीने गायकवाड यांना विचारले असता रमेश गायकवाड याने आम च्याकडे कोर्टाची ऑर्डर आहे हे घर खाली कर असे सांगितले. त्यावेळी कोर्टाची ऑर्डर दाखव असे म्हणाल्यावर गायकवाड याने तु कशाला ऑर्डर दाखवू, तु पहिला घर खाली कर असे म्हणून शिवीगाळ करून निघून गेले. त्यानंतर पल्लवी व त्यांच्या पतींनी घराला लावलेले कुलूप तोडून आत गेले असता घरातील सर्व वस्तु अस्ताव्यस्त पडल्याचे दिसून आले व घरातील दीड तोळ्याचे गंठण, १७ हजारांची रोकड, सीसीटीव्ही कॅमेरे व डिव्हीआर, टीव्ही, कुलर असा ६७ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेल्याचे दिसून आले. त्यामुळे याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.










# पोलिस काका अन् दीदी देणार शाळेतील विद्यार्थ्यांना विश्वास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**



सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमातील पोलिस काका व पोलिस दीदी आता शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये पोलिसांबाबत विश्वास निर्माण करण्याचे काम करून गुड टच व बॅड टच बाबत मार्गदर्शन करणार आहेत.

बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमिवर पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी शनिवारी शहर पोलिस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन त्यामध्ये पोलिस अधिकारी व अमंलदारांनी शाळेतील मुलांमध्ये पोलिसांबाबत विश्वास निर्माण करून पोलिस हे आपल्या सुरक्षिततेसाठी असल्याची जाणीव निर्माण करण्याबाबतच्या सूचना दिल्या. पोलिस अधिकारी व अमंलदारांनी शाळांना भेटी देऊन शाळेतील शिपाई, सीसीटीव्ही कॅमेरे, शाळेच्या सुरक्षिततेबाबतचे काय उपाय योजना आहेत याबाबतची माहिती घेण्यास सांगितले. शाळेतील मुलांच्या सुरक्षेसाठी गार्ड नेमण्यासाठी शाळांना सूचना देण्यात आलेल्या असल्याचेही पोलिस आयुक्तांनी सांगितले.

यावेळी महिला पोलिस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे यांनी उपस्थितांना पोलिस काका व पोलिस दीदी उपक्रमाची माहिती देऊन प्रशिक्षण दिले. तसेच गुड टच व बॅड टच बाबतचे व्हिडीओ दाखवून जनजागृती कशी करायची याची माहिती सांगितली. यावेळी बैठकीस सहायक आयुक्त राजन माने उपस्थित होते. सूत्रसंचलन महिला पोलिस उपनिरीक्षक करूणा चौगुले यांनी केले तर सहायक पोलिस निरीक्षक स्वाती येळे यांनी आभार मानले.

## केगाव येथून दुचाकी चोरी

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट -**

केगाव येथून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत संजय ज्ञानोबा पाटील (वय ६०, रा. केगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ ऑगस्ट रोजी



रात्री संजय पाटील यांनी त्यांची एमएच १३ सीए २५१३ क्रमांकाची दुचाकी घरासमोर पार्क केली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

# अतिरुद्र स्वाहाकाराची आज सांगता

- भाविकांना २१ हजार रुद्राक्ष वाटप
- कुंकूमार्चना आणि पूर्णाहुतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

भाविकांना २१ हजार रुद्राक्ष वाटपाने आज रविवारी सकाळी ९ वाजता अतिरुद्र स्वाहाकाराची सांगता होणार आहे, अशी माहिती श्री श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठाचे मठाधिपती श्रो. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामीजी यांनी दिली.

विमानतळा पाठीमागे असलेल्या कस्तुरबा नगरातील श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्टतर्फे २६ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान विश्वशांती व धर्मजागृतीसाठी आयोजित अतिरुद्र स्वाहाकार भाविकांच्या गर्दीत अत्यंत भक्तिमय वातावरणात झाला. अतिरुद्र स्वाहाकाराची पूर्णाहुती रविवारी सकाळी होणार आहे. त्यानिमित्त श्री अतिरुद्र मंत्राने अभिमंत्रित केलेल्या २१ हजार रुद्राक्षांचे वाटप भाविकांना करण्यात येणार आहे.

तसेच याप्रसंगी कुंकुमार्चना व धर्मसभा होणार आहे. रविवारी होणाऱ्या पूर्णाहुतीच्या कार्यक्रमास श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचे सहअध्यक्ष प. पू. ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, शिवसेनेचे अध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष ह.भ.प. श्री अक्षय महाराज भोसले, पुणे




एअर पोर्ट अथोरीटीचे प्रमुख धानेश स्वामी, अथणीचे आमदार लक्ष्मण सवदी, अदौनीचे आमदार गुमनुरू जयराम, सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शितल तेली-उगले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. भाविकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## दुचाकीला धडक देणाऱ्या ट्रक चालकाविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

शहरातील मरिआई चौकात दुचाकीस्वारास धडक देऊन त्यास फरफटत नेऊन गंभीर जखमी करून दुचाकीचे ९० हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी ट्रक चालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जखमी दुचाकीस्वार प्रविण हणमंत गायकवाड (वय २७, रा. जानकर नगर, आमराई, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन किरण पांडुरंग चंदनशिवे (वय ३२, रा. लांबोटी, ता. मोहोळ) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी मरिआई चौकात प्रविण गायकवाड हा त्याच्या एमएच १३ ईजी ०५३६ क्रमांकाच्या दुचाकीवरून लक्ष्मी विष्णु चाळीकडून घराकडे जात होता. त्यावेळी मरिआई चौकात किरण चंदनशिवे याने त्याच्या ताब्यातील एमएच १२ एमव्हि १२७७ क्रमांकाची ट्रक निष्काळजीपणे चालवून प्रविण याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील प्रविण हा गंभीर जखमी होऊन दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. महिला पोलिस हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

# महायुतीमध्ये अजित पवार धर्म संकटात!

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

**राजकारणातील धुरंधर काकांना कात्रजचा घाट दाखवत राष्ट्रवादी पक्ष, चिन्ह आणि आमदारांसह महायुतीत सहभागी झालेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार राजकीय कात्रीत सापडल्याचे जाणवत असून संघानंतर आता महायुतीतील प्रमुख मित्रपक्ष भाजपा व शिंदे शिवसेनेकडूनही अजित पवारांवर टिकास्त्र सुरु झाल्याने स्पष्टवक्ते प्रतिमा असलेले अजितदादा महायुतीमध्ये धर्मसंकटात सापडले आहेत. एकीकडे मित्रपक्षांकडून कोंडी तर दुसरीकडे स्वपक्षाचे राज्य प्रवक्तेच जाहीरपणे सांगत आहेत की अजितदादांनी आता महायुतीमधून बाहेर पडण्याचा निर्णय घ्यावा. नाराज अजितदादा काय भूमिका घेणार याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.**

पहाटेच्या शपथविधीचे पहिले बंड काका शरद पवारांनी मोडीत काढल्याचा घाव जिव्हारी लागलेल्या अजितदादांनी कालांतराने मास्टर प्लॅन करीत काका शरद पवारांना अखेर कात्रजचा घाट दाखवलाच. उध्दव ठाकरेंना गुजरात मार्गे आसामचा कडक चहा पाजत युतीमध्ये मुख्यमंत्री झालेल्या एकनाथ शिंदे यांची मजल पाहून अजितदादांच्या मनातील पहाटेच्या शपथविधीच्या फसलेल्या प्लॅनची जखम ताजी झाली असेल. अजितदादांनी देखील ४० आमदारांसह महायुतीत प्रवेश केला आणि राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्हावर देखील कब्जा केला. सेम शिंदे पॅटर्न राबविण्यात यश आलेल्या अजितदादांना महायुतीमध्ये उपमुख्यमंत्रीपदाची लॉटरी लागली. पण शिंदे यांच्यासारखी मुख्यमंत्रीपदाची लॉटरी कशी लागेल याकडेही अजितदादांच्या राष्ट्रवादीने सातत्याने लक्ष केंद्रीत केल्याचे दिसून येते. परंतु अजितदादांच्या मुख्यमंत्री बनण्याच्या मार्गात खोडा बसला तो लोकसभा निकालानंतर होय. लोकसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा झटका बसला. किंबहुना काका शरद पवारांनी ऐंशीच्या स्ट्राईक रेटने पुतण्या

### ● आता दुसरा मित्रपक्ष शिंदे सेनेकडून टिकास्त्र सुरु
### ● पक्षाचे राज्य प्रवक्तेच सांगताहेत महायुती सोडा






अजितदादांना क्लिन स्वीप दिला. बालेकिल्ला असलेल्या बारामतीमध्ये पत्नी सुनेत्रा पवार यांचा अजितदादांच्या बहिण सुप्रिया सुळे यांनी केलेला पराभव अजितदादांसह राष्ट्रवादीच्या नक्कीच जिव्हारी लागला. बहिण सुप्रियांच्या विरोधात पत्नीला निवडणुकीत उभा करण्याची चूक देखील अजितदादांनी प्रांजळ मनाने कबूलही केली. तर बारामती विधानसभा हा आपला पारंपारिक मतदारसंघ असतानाही तिथे यंदा न उभारण्याचे सूतोवाच देखील अजितदादांनी केल्याने पवार आणि राष्ट्रवादीमध्ये सध्या राजकीय संभ्रमवस्था आहे. कार्यकर्त्यांना नेमका प्रश्न पडलेला असणार की, अजितदादा विधानसभेला नेमके उभारणार तरी कुठून.

राष्ट्रवादीमध्ये अशी अवस्था असताना लोकसभा निकालात भाजपाला बसलेल्या राजकीय फटक्यावरून संघाच्या मुखपत्रातून अजितदादांना टिकेचे लक्ष्य केले होते. संघाचा रोष ताजा असतानाच आता महायुतीमधील मित्रपक्ष भाजपाचे प्रवक्ते गणेश हाके व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री तानाजी सावंत यांनी राष्ट्रवादीवर कडवट टिका केल्याने राष्ट्रवादीमधून असंतोष व्यक्त होत आहे. राष्ट्रवादीच्या बाजूला बसल्यानंतर उलटी व्हायला होते ही मंत्री सावंतांची टिका राष्ट्रवादीला चांगलीच झोंबली आहे. राष्ट्रवादीच्या प्रवक्त्यांनी मंत्री तानाजी सावंताची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी तर केलीच पण राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षांनी देखील मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे नाराजीचा सूर पोहचवला आहे. राज्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी तर थेट अजित पवारांनी महायुतीतून बाहेर पडण्याचाच सल्ला दिला आहे. अजित पवार अथवा राष्ट्रवादीकडून हा सल्ला किती गांभीर्याने घेतला जातो हे पाहणे देखील महत्वाचे आहे. दरम्यान मंत्री सावंत व गणेश हाके यांच्या टिकेच्या प्रश्नावर अजितदादांनी सावध भूमिका घेत आपल्याला कोणी बोलले तर अंगाला भोकं पडत नसल्याचे सांगत मित्रपक्षाच्या नेत्यांनी थांबावे अन्यथा माझे कार्यकर्ते देखील जशास तसे उत्तर देतील असा सज्जड इशारा मित्रपक्षांना दिला आहे.

लोकसभा निवडणुकीत बॅकफूटवर गेलेल्या महायुतीला विधानसभेसाठी लाडकी बहिण योजनेने दिलासा दिल्याचे जाणवत असताना बदलापूरची चिमुकल्यांवरील अत्याचाराची घटना घडली. बदलापूरची घटना शांत होत होती तोपर्यंत मालवण येथील महाराष्ट्राचे आराध्य छत्रपती शिवरायांचा पुतळा पडला. महायुतीच्या मागील शुक्लकाष्ठ काही थांबत नसल्याचे चित्र असतानाच आता महायुतीतील मित्रपक्षांमध्ये बेबनाव जाणवत आहे.

विधानसभा निवडणुका तोंडावर असून जागा वाटपाचा तिढा मोठा असताना आता मित्रपक्षांमधील नाराजी समोर येत असल्याने निवडणुकीपर्यंत आणखीन काय-काय घडणार हे आताच सांगणे कठीण झाले आहे. कारण गेल्या दोन-तीन वर्षात महाराष्ट्राच्या राजकारणाने अनेक मोठे धक्के पाहिले अन् सहन केलेले आहेत. महायुतीचे सध्याची राजकीय परिस्थिती पाहता खरोखरच अजितदादांच्या राष्ट्रवादीची महायुतीतील गरज संपली असल्यास आगामी काळात काय राजकीय खलबतं होतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

एकूणच काय तर महाराष्ट्राचे राजकारण वेगळ्या वळणावर असून ऐन निवडणुकीत कोण कोणाशी युती करतो आणि कोण कोणासोबत आघाडी करतो हे पाहणे महत्वाचे आहे. या राजकारणात महाराष्ट्राचा विकास मात्र नक्कीच मागे पडत असल्याची चर्चा लोकांमधून सुरु आहे.

### अजितदादांच्या भूमिकेकडे लक्ष!


महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार यांची ओळख एक स्पष्ट वक्ते आणि स्वाभिमानी राजकारणी अशी आहे. काका निवृत्त होत नाहीत आणि पक्ष देखील हातून सोडत नसल्यामुळे हतबल झालेल्या अजितदादांनी वैतागून राष्ट्रवादी पक्ष, घड्याळ चिन्ह आणि ४० आमदारांसह महायुतीत जाण्याचा निर्णय घेतला. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर हे लक्षात आले आहे की, महायुती राजकीयदृष्ट्या यशस्वी झाली नाही. त्यातच भर म्हणजे संघाच्या मुखपत्रातून अजितदादांना सोबत घेण्यावरून उघड नाराजी व्यक्त करण्यात आली. भाजपाचे प्रवक्ते देखील अजितदादांवर टिका करतात आणि नंतर म्हणतात ही माझी वैयक्तिक भूमिका असून पक्षाची नाही. मित्रपक्ष शिंदे सेनेचे मंत्री थेट बोचरी टिका करून अजितदादांना अंगावर घेत आहेत. एकूणच काय तर अजितदादांची महायुतीतील उपयुक्तता संपली की काय? या चर्चांना आता उधाण आले आहे. राष्ट्रवादीमधूनही महायुती सोडण्याचे सूर निघू लागले आहेत. आगामी काळात अजितदादा काय भूमिका घेतात हे याची उत्सुकता आहे.

### ▶▶ क्राईम वृत्त...

#### दारू पिण्यासाठी पैसे न देणाऱ्या दुकानदारास मारहाण

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

दारू पिण्यासाठी पैसे न देणाऱ्या दुकानदारास मारहाण करणाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सत्यबोध सिद्राम फडतरे (वय ३७, रा. प्रशिक्ष बंगला, आयकर भवन, रंगभवन मागे, सोलापूर) यांच्या फियादीवरुन गंगाराम बोधीवाले (रा. लोधी गल्ली, लष्कर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सत्यबोध फडतरे याचे नळबाजार चौकात गिरीराज अपार्टमेंटमध्ये नवनीत मेडीकल नावाचे दुकान आहे. ३० ऑगस्ट रोजी दुपारी फडतरे याच्या दुकानात गंगाराम बोधीवाले हा आला व त्याने फडतरे यास दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. त्यावेळी फडतरे याने पैसे देण्यास नकार दिला असता बोधीवाले याने फडतरे यास मारहाण करून जखमी केले. बोधीवाले याची या भागात दहशत असल्यामुळे फडतरे यांना मारहाण केल्यानंतर शेजारील दुकानदारांनीदेखील त्यांची दुकाने बंद केली व निघून गेले. त्यामुळे याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करणत आला आहे. पोलिस उपनिरीक्षक शिंदे पुढील तपास करीत आहेत.




#### पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या ९ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह ९ जणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रूकसाना गनी शेख (वय ३२, रा. नागनाथ नगर, नई जिंदगी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती अब्दुल, नसमी, जाफर, सना, शहाबाज शेख, रेश्मा सादीक लोकापल्ली, सादीक लोकापल्ली, फिरदोस शाहरूख शेख, शाहरूख शेख (रा, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑगस्ट २०१९ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत रुकसाना या पती अब्दुल याच्या घरी सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती अब्दुल व त्याच्या घरातील लोकांनी मिळून नवीन घर घेण्यासाठी रुकसाना हिने माहेरून दोन लाख रुपये आणावेत म्हणून तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तिचा शारीरीक व मानसिक छळ करून तिला ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

## हिप्परग्याजवळ एसटी खाली येऊन दुचाकीस्वार ठार

### शनिवारी सायंकाळी झाला अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

सोलापूर शहरापासून साधारण तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या तळे हिप्परगा गावच्या ब्रिजवर भीषण अपघात झाला असून एसटी बस खाली येऊन दुचाकी जागीच ठार झाल्याची घटना नुकतीच घडली जागीच ठार झाल्याची घटना नुकतीच सायंकाळी पावणे पाचच्या सुमारास घडली.




गोविंद पवार (वय २६, रा. मुळेगाव तांडा) असे मरण पावलेल्याचे नाव आहे.

अक्कलकोट वरून तुळजापूर कडे जाणाऱ्या एम एच १४ एल बी १२०७ या एसटी बसच्या खाली एम एच १३ बी एस ३५०१ हे दुचाकी एसटीच्या खाली अडकली आहे आणि सुमारे १०० फुटावर दुचाकी स्वराचा मृतदेह रस्त्यावर पडला असल्याचे पाहायला मिळाले. घटनेची माहिती मिळताच जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस दाखल झाले असून बघ यांची मोठी गर्दी झाली असून एक बाजूचा रस्ता बंद झाला आहे. दरम्यान एक स्कॉर्पिओ चालकाने या दुचाकी ला कट मारल्याने ही दुचाकी एसटी खाली आल्याचे काही नागरिक सांगत आहेत. त्यात स्कॉर्पिओ चालकाने एका आय टेन या गाडीलाही कट मारला असे आयटेन कारचा चालक सांगत आहे. यामध्ये स्कॉर्पिओ चालकाची चूक असून तो या अपघातानंतर तिथून पसार झाल्याचे काही नागरिकांनी सांगितले.

## दोन दुचाकींची धडक; मायलेक जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

दहिटणे येथील घोडेपीर दर्गाजवळ दोन दुचाकींची धडक होऊन झालेल्या अपघातात मायलेक जखमी झाला.

याबाबत शोभा ज्योतीराम फडतरे (वय ४०, रा. बक्षी हिप्परगा, ता. दक्षिण सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन अज्ञात दुचाकीस्वाराविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी शोभा फडतरे या त्यांचा मुलासह एमएच १३ बीएम ५१२१ क्रमांकाच्या दुचाकीवरुन सोलापूरहून गावाकडे निघाल्या होत्या. त्यावेळी घोडेपीर दर्गाजवळ शोभा फडतरे यांच्या दुचाकीला हिप्परगाकडून येणाऱ्या एमएच १३ डीडी ०९१४ क्रमांकाच्या दुचाकीस्वाराने जोरदार धडक दिली. या अपघातात शोभा फडतरे व त्यांचा मुलगा तसेच समोरच्या दुचाकीवरीलदेखील व्यक्ती जखमी झाल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार साळुंखे पुढील तपास करीत आहेत.

## शहरातून चार दुचाकींची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

शहरातून दुचाकी चोरींच्या घटना काही केल्या कमी होईनात असे चित्र दिसून येत आहे. शहरातून चार दुचाकींची चोरी झाल्याची नोंद विविध पोलिस ठाण्यांमधून करण्यात आली आहे.

पहिल्या घटनेत रेवणसिध्द चंदू कोळी (वय २६, रा. निलम नगर, भारत चौक, मजरेवाडी, सोलापूर) यांनी त्याची एमएच १३ ईए १९२९ क्रमांकाची दुचाकी ही विडी घरकुल परिसरातील सोना-चांदी अपार्टमेंटसमोर १६ ऑगस्ट रोजी रात्री पार्क केली होती. ती ४५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार उबाळे पुढील तपास करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत शिवानंद नागेश येरटे (वय ४५, रा. भवानी पेठ, मड्डी वस्ती, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ बीसी ६००५ क्रमांकाची दुचाकी ही चाणक्य बारच्या बाहेर २९ ऑगस्ट रोजी रात्री पार्क केली हेती. ती २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार आरेनवरू पुढील तपास करीत आहेत. तिसऱ्या घटनेत अजित नागनाथ जमदाडे (वय ३३, रा. वाघोली, पो. सोहाळे, ता. मोहोळ) यांनी त्यांची एमएच १३ ईई ५२०८ क्रमांकाची दुचाकी ही मंगळवार बाजार येथे २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी पार्क केली होती. ती ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत. चौथ्या घटनेत अंबादास पेंटप्पा कट्टा (वय ४८, रा. युनिक टाऊन, विडी घरकुल, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ व्ही ००३१ क्रमांकाची दुचाकी ही ५ जुलै रोजी घराजवळ पार्क केली होती. ती १० हजार रुपये किंमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

# शिराळच्या डाळिंबाला दुबईत भाव

### तीन एकरात ५२ लाखांचे उत्पन्न; जैविक ब्रँड, रासायनिक खतांचा अचूक वापर; १८० रूपये उच्चांकी दर

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ३१ ऑगस्ट-**

शिराळ (ता. माढा) येथील बंडू हरिदास शिंदे यांनी तीन एकर डाळिंब पिकास रासायनिक खताबरोबरच एम आय लाईफस्टाईल कंपनीच्या इंडियाग्रो या कृषीविषयक ब्रँडची जैविक औषधे वापरून ५२ लाख रूपये उत्पन्न घेतले असून प्रतिकिलो डाळिंबास १८० रू. उच्चांकी भाव मिळाला आहे. हे उत्तम प्रकारचे डाळिंब परदेशात दुबई येथे निर्यात झाले आहे.

मूळ निमगाव टें. येथील रहिवासी असलेले नागनाथ शिंदे व बंडू शिंदे यांनी काही वर्षांपूर्वी शिराळ येथे जमीन खरेदी करून बागायत क्षेत्र केले आहे. माळरान जमीन असल्याने त्यांनी चार वर्षांपूर्वी तीन एकरात भगवा जातीचे १२ बाय ७ वर १,३०० रोपांची लागवड केली. बंडू शिंदे हे स्वत: शेती करतात. चालू वर्षी फेब्रुवारी छाटणीवेळी बंडू शिंदे यांनी एकरी चार ट्रेलर शेण खत, सुरुवातीस प्रति झाड एक किलो व रेस्टनंतर दर दीड महिन्याला एक किलो रासायनिक भेसळ खत व या भेसळ खतामध्येच एकदाच एमआय लाईफस्टाईल कंपनीच्या इंडियाग्रो या जैविक ब्रँडचे वाळवी, हुमणी, कीडी, गोगलगाय लागू नये म्हणून भूअन्न प्रति एकर सहा किलो वापरले. यामुळे जमिनीची सुपिकता वाढून गांडूळ संख्या वाढण्यात मदत झाली.

झाडास मर, तेल्या रोग येऊ नये यासाठी जर महिना एमआय प्राउड, ओलीप व ग्रोमॅझिक हे डीपमधून व फवारणी घेतली. रासायनिक व जैविक खतांचा मेळ घालून योग्य पद्धतीने खताचा वापर केल्याने झाड ट्रेसमध्ये न येता जोमात वाढ होऊन फळांना वाढ, वजन, गोडी व चकाकी वाढली तर शंभर टक्के मर रोगापासून व पिनहोलपासून संरक्षण तर झालेच; पण सेटिंग काळात इंडियाग्रो ब्रँडचा चांगला फायदा झाला असल्याचे शेतकरी बंडू शिंदे यांनी सांगितले. प्रति झाड सरासरी २० किलो डाळिंब निघाले असून २०० ग्रॅमपासून ४०० ग्रॅमपर्यंत वजन मिळाले. हे सर्व डाळिंब व्यापाऱ्यांनी बांधावर येऊन बिगरखर्ची प्रति किलो १८० रूपये दर देऊन दुबईला निर्यात केले, याचा मला आनंद झाल्याचे शिंदे यांनी सांगितले.

#### २५ टन डाळिंबाची निर्यात

आत्तापर्यंत २५ टन माल निर्यात झाला असून दोन दिवसांत अजून पाच टन माल निघणे अपेक्षित आहे. बंडू शिंदे यांनी अतिशय काटकसरीने शेती करत इंडियाग्रो जैविक ब्रँड व रासायनिक खतांचा वापर करीत एकरी अडीच लाख रूपये खर्च करीत एकरी १५ लाखांचे भरीव उत्पंन्न घेतले आहे. तीन एकरात तब्बल ५२ लाख रूपयांचे उत्पन्न घेतले आहे.



#### यांनी केले मार्गदर्शन

या डाळिंब पिकासाठी औदुंबर कुबेर, नितीन कापसे, सुशिलकुमार टोनपे, दादा शिंदे, इंडियाग्रो या जैविक ब्रँडचे अभिजीत फाटे, अमोल फाटे व सोमनाथ शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले.

## एसटी बसची वाट पाहणाऱ्या वृध्दाकडील ५ ग्रॅमची बोरमाळ लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट -**

शहरातील अक्कलकोट रोडवरील एस व्ही सी एस शाळेजवळ गावी जाण्यासाठी एस टी बसची वाट पाहणाऱ्या वृध्दाचा विश्वास संपादन करून फसवणुकीने त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील ५ ग्रॅमची सोन्याची बोरमाळ चोरून नेणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबबात मलप्पा महादेव बिराजदार (वय ६५, रा. मल्लिकार्जुन नगर, धानम्मा कलशेट्टी यांच्या घरात भाड्याने, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात मोटारसायकलस्वाराविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० ऑगस्ट रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास मलप्पा बिराजदार हे त्यांच्या पत्नीसमवेत घुंगरे गावी जाण्यासाठी अक्कलकोट रोडवरील एस व्ही सी एस शाळेजवळ बसची वाट पहात थांबले होते. त्यावेळी त्यांच्याजवळ एक अज्ञात मोटारसायकलस्वार आला व त्याने बिराजदार यांच्याशी बोलणे करीत त्यांचा विश्वास संपादन केला. त्या अज्ञात दुचाकीस्वाराने बिराजदार यांना तुमच्या दोघांच्या खात्यावर प्रत्येकी २१ हजार रुपये जमा झाले आहेत, हे पैसे तुम्ही बँकेतून काढून देण्यासाठी बायकोच्या गळ्यातील सोन्याची बोरमाळ काढून द्या असे



सांगितले. त्यावेळी बिराजदार यांचा विश्वास बसल्याने त्यांनी त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील ५ ग्रॅमची सोन्याची बोरमाळ काढून त्या अज्ञात मोटारसायकलस्वारास दिली. ती घेऊन तो गेला तो परत आलाच नाही. त्यामुळे आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यानंतर बिराजदार यांनी एमआयडीसी पोलिस ठाणे गाठून याबाबत फिर्याद दाखल केली. पुढील तपास हवालदार दीपक डोके करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - ८७४

**तुका म्हणे नव्हे दिसतों मी तैसा ।**
**पुसणें ते पुसा पांडूरंगा ।।**

आतून बाहेरून सारखे राहणे अत्यंत अवघड आहे. असा सारखेपणा फार कमी लोकांकडे असतो. जास्तीत जास्त लोक हे बाहेरून वेगळेपण दाखवतात आणि प्रत्यक्ष वर्तनात मात्र वेगळे असतात. आपण फार चांगले कसे आहोत, हे लोक बाह्य दिखाव्यातून किंवा भाटांच्या व स्वत:च्या मुखातून दाखवण्याचा प्रयत्न करतात. पण प्रत्यक्षात आपण अंत:रंगातून कसे आहोत हे दाखवणारे एकूण लोकसंख्येच्या तुलनेत जवळपास कमी असतात. आपण खरे कोण आहोत किंवा आपण दिसतो तसे नाही,



हे स्वत:होवून सांगणे अत्यंत कठीण कार्य आहे. पण हे कठीण कार्य सहजतेने पुर्णत्वास नेणारे महात्मे आहेत. संसारात अडकलेला जीव कळत न कळत नको त्या गोष्टीच्या मागे लागतो. इच्छित प्राप्त करून घेण्यासाठी नीती-नियमांच्या विरुध्द वागतो. पण आपण संसारात असूनही नीती-नियमाचे तंतोतंत पालन करतो. त्यामुळे ईर्षा, मोह, द्वेष, मत्सर, अहंकार, मीपणा, काम, क्रोध आदीमध्ये अजिबात अडकलो नाही. आम्ही संसारात अडकल्याचे आपणाला दिसत असले तरीही आम्ही संसारात राहूनही त्यापेक्षा वेगळे झालो आहोत. म्हणून आम्ही आपणाला दिसत आहोत तसे नाही. आमचे हे बोल खरे वाटत नसतील तर तुमचा ज्याच्यावर विश्वास आहे, त्या समचरणी उभा असलेल्या पांडूरंगाला आमच्याबद्दल काय विचारायचे ते विचारा. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे नव्हे दिसतों मी तैसा । पुसणे तें पुसा पांडूरंगा ।।

आपण दिसतो तसे नाही आणि आपण दिसतो त्यापेक्षाही खूप चांगले आहोत, असे सांगतांना खूप फरक आहे. संसारात अडकलेला जीव ईर्षा, काम, क्रोध, माया, मोह, अहंकार, मत्सर आदिमध्ये आपोआप गुरफटला जातो. त्याचे हे गुरफटणे मीच्या अस्तित्वाला बळकटी देते. मीची निर्मिती किंवा मीचे अस्तित्व माणसाला मानवतेपासून दूर नेऊ लागते. मी मुळे माणूस आपण असे आहोत, आपण तसे आहोत, आपण हे करू शकतो, आपण ते करू शकतो अशा फुशारक्या मारू लागतो. अंतर्गत वर्तन कितीही वाईट असले तरीही माणूस त्याच्यावर पडदा टाकून बाह्य देखावा करण्याचा प्रयत्न करतो. आपल्या मोठेपणाचे कौतुक भाटांकडून ऐकवतो. स्वत:ला मोठे म्हणून घेण्यात आनंद मानतो. अशा फुशारक्या मारणाऱ्या किंवा खोटारडे मोठेपणा सांगणाऱ्या लोकांच्या बायकांना यांच्याबद्दल विचारले तर निश्चितच याच्या उलट ऐकायला मिळू शकते. म्हणूनच असे फुशारक्या मारणारे लोक स्वत:च्या बायकांना त्यांच्यासोबत व्यासपीठावर येऊ देत नसावेत किंवा त्यांच्यासमोर मोठेपण गात नसावेत, भाषण, प्रवचन, व्याख्यान करीत नसावेत.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार**
**दि. १ सप्टेंबर २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - श्रावण**
**कृ. त्रयोदशी (२७.४०)**
**ऋतु - शरद**
**नक्षत्र- पुष्य (१९.३८)**
**योग - वरियन (१७.३७)**
**करण - गर (१४.५९)**
**सुर्योदय - ०६.२६**
**सूर्यास्त - १८.५२**

**दिनविशेष -**
**शिवरात्री**
**चांगला दिवस**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**वृषभ :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. शक्यतो जिवनातील निर्णय योग्य व विचार करून घ्या. आनंदी रहा.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. महिलांना सौख्याच्या घटना घडतील.

# लाड कमिटी अंतर्गत ५९ जणांना नियुक्ती

## महापालिका आयुक्त शीतल तेली -उगले यांनी काढले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सोलापूर महापालिका प्रशासनाने महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या वारसदारांकडून आलेल्या अर्जांमधून लाड कमिटी अंतर्गत ५९ जणांना नियुक्तीचे आदेश शुक्रवारी दिले. महापालिका आयुक्त शीतल तेली -उगले यांनी हे आदेश काढले आहेत.

यामुळे त्या नियुक्त कर्मचाऱ्यांकडून आनंद व्यक्त करण्यात आला. महापालिकेकडून यापूर्वी देखील अशा प्रलंबित ७९ आणि त्यांनतर ३५ नियुक्त्या देण्यात आल्या. शासनाच्या निर्देशानुसार महापालिका आयुक्तांच्या मान्यतेने लाड कमिटी वारसा हक्क अंतर्गत ५९ जणांना नियुक्ती देण्यात आली आहे. आतापर्यंत १७३ जणांना नियुक्ती आदेश दिले आहेत.त्यांना सातवा वेतन आयोगानुसार वेतन तसेच अधिक इतर मान्य भत्ते दिनांक २ सप्टेंबर पासून पुढील दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीसाठी अटी व शर्तींच्या अनुसरून देण्यात येणार आहे. यामध्ये नियुक्त्या देण्यात आलेल्या वारसा हक्क कर्मचाऱ्यांना घनकचरा व्यवस्थापन विभागात नियुक्त करण्यात आले आहे.

हे आदेश शुक्रवारी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी काढले आहेत. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतुल यांच्या माध्यमातून या विभागाने या नियुक्तीसाठीची प्रक्रिया राबवली. दि. २ सप्टेंबरपासून दोन वर्षाच्या परीविक्षा कालावधी करिता अटी व शर्तीस अधीन राहून महापालिकेतील संबंधित कार्यालयाकडे या कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्यात येत असल्याचे आदेशात म्हटले आहे. आज एकूण ५९ वारसांना हे नियुक्ती आदेश देण्यात आले आहे.



### नियोजन पूर्वक नेटक्या पद्धतीने प्रक्रिया

महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध नेटक्या पद्धतीने सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतुल यांच्या माध्यमातून या विभागातील कर्मचारी लाड पागे समिती अंतर्गत अर्जांची निपटारा प्रक्रिया पार पाडत आहेत. यामुळे इतर महापालिकांच्या तुलनेत सोलापूर महापालिका सामान्य प्रशासन विभागाने कमी वेळातच नेटक्या पद्धतीने १७३ नियुक्ती आदेश काढण्यात यश मिळाले आहे.

# गणेशोत्सवासाठी २३५ जादा एसटी बसेस

### एसटी महामंडळ सज्ज; वाहतूक व्यवस्थेसाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

श्री गणेशाचे आगमन अवघ्या आठ दिवसांवर येऊन ठेपले आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटी महामंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सव काळात चाकरमान्यांना गणेशोत्सवासाठी आपल्या गावी जाता यावे यासाठी विविध मार्गावर जादा बसेस सोडण्याचे नियोजन केले जात आहे.

त्याच अनुषंगाने सोलापूर एसटी विभाग देखील उत्सव कालावधीत केल्या जाणाऱ्या जादा बसेसच्या नियोजनासाठी सज्ज झाले आहे. सोलापूर विभागात एकूण नऊ आगार आहेत. या नऊ आगारातून सुमारे २३५ जादा बसेस विविध मार्गावर जादा बसेस सोडण्यात येणार आहे. सोलापूर एसटी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या जादा बसेसच्या नियोजनासाठी चालक आणि वाहक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच वाहतूक व्यवस्थेसाठी देखील अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त केले जात आहे.

### कोकणात जादा वाहतूक

सोलापूर एसटी विभागातील नऊ आगाराच्या माध्यमातून सदरची जादा वाहतूक केली जाणार आहे. गणेशोत्सव सुरू होण्याअगोदर वाहतूक महामंडळ स्तरावरून सुरू केली जाणार आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या मार्गावर जादा वाहतूक वरिष्ठ स्तरावरून केली जाते.

**- अजय पाटील,**
विभागीय वाहतूक अधिकारी सोलापूर एसटी विभाग.



## हॅकॅथॉन स्पर्धेत ४० संघाचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

केगाव येथील एन.बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अंतर्गत हॅकॅथॉन स्पर्धेचे कल्पना सादरीकरण झाले. महाविद्यालयाचे प्रा. सुनील शाखापुरे यांनी विद्यार्थ्यांना स्मार्ट इंडिया हॅकॅथॉनबद्दलची संकल्पना सांगितली. स्पर्धेत ४० संघांनी सहभाग घेतला व प्रत्येक संघात ६ विद्यार्थ्यांचा समावेश होता.

२४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे परीक्षण नागेश पाथरूट व अमेय कुलकर्णी यांनी केले. यावेळी सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे व डॉ. शेखर जगदे उपस्थित होते.

स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन - २०२४ हा उपक्रम दैनंदीन जीवनातील काही महत्वाच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि अशाप्रकारे उत्पादनातील नाविन्यपूर्ण संस्कृती आणि समस्या सोडवण्यासाची मानसिकता विकसित करणारा उपक्रम आहे.

कार्यक्रमासाठी प्रा. सुनील शाखापुरे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी प्रा. शशिकांत हिप्परगी यांनी परिश्रम घेतले. या महविद्यालया अंतर्गत सादर केलेल्या कल्पनातून निवडलेल्या संघाला राष्टीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळते.

# पद्मावतीदेवीला अर्पण करणार माहेरची साडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

तिरुपती नजीकच्या तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवी मंदिरात सालाबादप्रमाणे नोव्हेंबरमध्ये ब्रह्मोत्सव होणार असून या उत्सवात दि. ३० नोव्हेंबर रोजी सोलापुरातील पद्मशाली बांधव देवीला माहेरची साडी अर्पण करणार आहेत, अशी माहिती पद्मशाली श्री पद्मावती देवी ब्रह्मोत्सवम संस्थेचे संस्थापक जनार्दन कारमपुरी व अध्यक्ष अंबादास बिंगी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भगवान व्यंकटेश्वर अर्थात बालाजी यांच्या पत्नी श्री पद्मावतीदेवी या पद्मशाली समाजाच्या कन्या आहेत. तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवी मंदिरात दरवर्षी ब्रह्मोत्सव साजरा केला जातो. यंदाच्या उत्सवात माहेरची साडी अर्पण करण्यासाठी सोलापुरातील पद्मशाली बांधवांसाठी प्रती जोडपी १५ हजार १ रुपयांचे देणगी शुल्क असून यामध्ये देवीचे महावस्त्र (माहेरची साडी) प्रवास व निवास व्यवस्था केली जाणार आहे. या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या समाजबांधवांनी श्रीधर सुरा (९१७५९३१८८८) व नागेश सरगम (९०९६५६२१२३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला संस्थेचे सचिव अजय पोन्नम, खजिनदार नागेश सरगम, सल्लागार रामचंद्र जन्नू, दामोदर पासकंटी आदी उपस्थित होते.

### पद्मावतीदेवी पद्मशाली असल्याचे प्राचीन दाखले

भगवान व्यंकटेश्वर यांच्या पत्नी महालक्ष्मी स्वरूपिणी देवी पद्मावती या स्वतः 'मी पद्मशाली' असा गर्भगृहातून आवाज दिल्याचे पुरातन दाखले आहेत. त्यामुळे पुरातन काळापासून पद्मावतीदेवीला साडी चोळी, ओटीभरणा करण्याचा बहुमान पद्मशालीवंशीयांचा कायम आहे. तशी नोंद ताम्रपटात असून तो ताम्रपट आजही तिरुपती देवस्थानाकडे उपलब्ध आहे

## हरिभाई देवकरण प्रशालेत क्रीडा दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ ऑगस्ट-**

हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त धनश्री देशपांडे श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

धनश्री देशपांडे यांनी आपल्या भाषणात मुलांनी करिअर म्हणून खेळाकडे पहावे, रोज खेळाचा सराव करावा खेळाबरोबरच आपले आरोग्य देखील सुदृढ राहते असे मत व्यक्त केले. प्रभारी मुख्याध्यापक हनुमंत मोतीबने यांनी मुलांना विविध प्रकारच्या खेळाची माहिती दिली व खेळाडू कोट्यातून नोकरीच्या संधी याविषयी याविषयी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर विविध संघातील कर्णधार, कोचेस, खेळाडू यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त व मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त क्रीडा दौड काढण्यात आली. यावेळी प्र. मुख्याध्यापक हनुमंत मोतीबने, पर्यवेक्षक शांताप्पा कुंभार, भानुदास बनसोडे, आप्पासाहेब राऊत, औदुंबर सर्वगोड क्रीडा शिक्षक प्रकाश कंपली, अक्षय गवळी, एच.एम. नलवडे, सागर कोळी, दत्तात्रय हडपद, भावना यलगुलवार, आसावरी देशमुख, दिनेश कुमार घंटे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रमोद चुंगे यांनी केले. आभार माणिक साळसकर यांनी मानले.



स्वत:च्या प्रभावी, सर्वस्पर्शी लेखनातून व प्रेमळ स्वभावाने पत्रकारितेत व जनमानसात कायमचा आगळा-वेगळा ठसा उमटविलेला प्रचंड उत्साही,प्रवाही व त्याचबरोबर जनसंपर्कवादी व समन्वयवादी माझा जिवलग मित्र अभय दत्तात्रय दिवाणजी हा सुमारे ३७ वर्षे यशस्वी चौफेर पत्रकारिता करून आज वयाच्या ५७ व्या वर्षी पत्रकारितेतून सेवानिवृत्त होत आहे. त्यानिमित्त त्याच्या कार्यकर्तृत्वावर टाकण्यात आलेला हा एक छोटासा प्रकाशझोत.

# सदाबहार, समाजाभिमुख पत्रकार : अभय दिवाणजी



चांदण्याच्या शीतलतेप्रमाणे शांत व सूर्याच्या तेजाप्रमाणे तेजस्वी असलेल्या अभय आणि माझ्यातील दोस्ताना अखंडित ३७ वर्षांचा आहे. त्यावेळी आम्ही दोघेही कॉलेजला होतो, मी २४ वर्षांचा तर तो २० वर्षांचा होता. मी तरुण भारतमध्ये आजचे मराठी पत्रकार संघाचे नेते एस. एम. देशमुख यांच्याबरोबर कार्यरत होतो, तेव्हा भरारी प्रतिनिधी म्हणून अभय हा देशमुख यांची पत्नी व भरारी संयोजक शोभा कुलकर्णी यांच्याकडे नेहमी येत असे. त्यावेळी झालेली भेट ही पक्क्या मैत्रीत रूपांतरित होत राहिली व टिकली आहे. आमच्यातील मैत्री ही मी माझी सर्वोत्तम कमाई समजतो. अभयचे प्रत्येक वेळचे ''चालणं-बोलण-वागणं'' हे फर्स्ट इम्प्रेशन इज लास्ट इम्प्रेशन असेच असते. महाराष्ट्रातील एक ख्यातनाम पत्रकार हे अढळपद आज अभयला सहज मिळालेले नाही, कोणताही वारसा नसताना त्याने आपल्या कार्यकर्तृत्वाने, जिद्द व परिश्रमाने ते स्थान मिळविले आहे. सुरुवातीच्या काळातच आम्हा दोघांना विद्यार्थी परिषदेचा संस्कार व गुरुवर्य विवेक घळसासी यांचा परिस्स्पर्श लाभलेला आहे, हे येथे उल्लेखनीय.

### स्वामी समर्थांच्या कृपेमुळे मृत्यूच्या दारातून परत

प्रत्येकजण आयुष्यभर विद्यार्थी असतो त्याप्रमाणे पत्रकार हा कधी निवृत्त होत नसतो. पण आता अभयला प्रकृतीच्या कारणावरून नाईलाजास्तव निवृत्त व्हावे लागत आहे. त्याच्यावर दोन मोठ्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत, डॉकटरांनी त्याची हमी दिली नव्हती. श्री स्वामी समर्थांच्या कृपेमुळे तो बरा झाला. फिनिक्स पक्षी राखेतून पुन्हा कसा उभा राहतो, त्याप्रमाणे आज उभा आहे, त्याच्या या पुनर्जन्मासाठी विशाला वहिनींना सावित्रीची भूमिका वठवावी लागली. एकदा तो पुण्यातील रुबी रुग्णालयात ॲडमिट होता, त्यावेळी त्याने माजी मंत्री सुशीलकुमार शिन्दे यांच्यावरील 'सप्तरंग' चा कॉलम लिहून दिला होता. विशेष म्हणजे कोरोना काळात तो मार्कंडेय रुग्णालयात उपचार घेत असताना तेथून लॅपटॉपवर काम करून पंधरा दिवस अंक काढला होता.

**पत्रकार संघ व इतर कार्य**

'आनंदाच्या डोही आंनद तरंग' असलेल्या अभयने १९९६-२०१० या काळात सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्ष,उपाध्यक्ष, सरचिटणीस, खजिनदार व कार्यकारिणी सदस्य, सल्लागार या पदांवर राहून उल्लेखनीय कार्य केले आहे. सध्या तो अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा आजीव सदस्य असून तेथील पुरस्कार निवड समितीचा अध्यक्ष आहे. तो इंडियन रेडक्रॉस सोसायटीचा आजीव सदस्य आहे. याशिवाय त्याने विधी सेवा प्राधिकरण, विद्यापीठ व मेडिकल रॅगिंग समिती, बीएमआयटी कॉलेज व सोनामाता शिक्षण संस्था आदी ठिकाणी सदस्य म्हणून काम केले आहे. सध्या त्याची सकाळमधील अध्यात्मिक विंगमध्ये श्री स्वामी समर्थांची सेवा चालू आहे.

**सर्वार्थाने संपन्न कुटुंब**

शांत, संयमी व मनमिळाऊ असलेल्या अभयचे कुटुंब आज सर्वाथाने संपन्न आहे. त्याची पत्नी विशाला वहिनी यांनी सामाजिक कार्याला वाहून घेतले आहे,त्या भगिनी समाज ट्रस्टच्या अध्यक्षा असून समुपदेशनाचे काम करीत आहेत. मुलगी आलेखा ही इंजिनियर असून एल अँड टी माईंडट्री कंपनीमध्ये इंजिनियर मुलगा आयुष हा टाटा कम्युनिकेशनमध्ये नोकरीला आहे. त्या दोघांना राज्य व राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार मिळाले आहेत, विशेष म्हणजे आयुषने पुरस्काराच्या माध्यमातून मिळालेल्या रकमेतून स्वत:चे डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण केले आहे. २४ वर्षे वयाच्या आयुषने वडिलांच्या सामाजिक कार्याचा वारसा घेत आतापर्यंत बारावेळा रक्तदान केले आहे.

**लेखक - दशरथ वडतिले,**
मो.९४२२४५७१००,
माजी अध्यक्ष,सोलापूर श्रमिक पत्रकार संघ.

# मराठासेवा संघ ३४ वा वर्धापन दिन



**१ सप्टेंबर १९९० साली पुरषोत्तम खेडेकर यांच्या संकल्पनेतून मराठा सेवा संघाची स्थापना झाली. समाजातील दुर्लक्षित असणाऱ्या प्रत्येक घटकाला मूळ प्रवाहात आणण्यासाठी ३२ कक्षांची स्थापना करण्यात आली. मातृसंस्कृतीचं महात्म्य आणि जिजाऊ माँसाहेबांचे स्वराज्य उभारणीमधील प्रेरणादायी कर्तृत्व श्रद्धास्थानी ठेवून 'जय जिजाऊ जय शिवराय' या उद्घोषात नवा विचार घेऊन सेवा संघ उदयास आला.**

---

स्थापनेनंतर आरक्षणापासून ते इतिहासाच्या पुनर्लेखनापर्यंत, शिक्षणापासून ते उद्योग व्यवसायापर्यंत, अध्यात्मापासून अंधश्रद्धेपर्यंत, बळीसंस्कृती ते शिवधर्म स्थापनेपर्यंत, समाजकारणापासून राजकारारणापर्यंत अशा समाजाशी निगडीत सर्व विषयांवर प्रबोधनाबरोबरच जागृतीचं खूप मोठं काम सेवा संघाने केले आहे.

शिक्षणसत्ता, अर्थसत्ता, धर्मसत्ता, राजसत्ता, प्रचार प्रसार माध्यमसत्ता ही पंचसूत्री नजरेसमोर ठेवूनच सेवा संघाची बांधणी झाली. आज केवळ राज्यातच नव्हे तर देशभर आणि देशाच्या बाहेरही मराठा सेवा संघाच्या शाखा कार्यरत आहे. सहकारी बँका, पतसंस्था, बचतगट आदी आर्थिक संस्थाबरोबर मुलींचे वसतीगृह, वाचनालय, सांस्कृतिक भवन आदींसह महाराष्ट्रात जवळपास प्रत्येक जिल्ह्यात सेवा संघाचे कार्यालय कार्यरत आहे. १९ फेब्रुवारी शिवरायांची जन्मतारीख, जिजाऊंचे विधिमंडळात तैलचित्र, मराठा आरक्षण, जेम्स लेन पुस्तक बंदी, दादू कोंडदेव पुतळा हटविणे, या आणि अशा अनेक आघाड्यांवर सेवा संघाने अविरतपणे प्रबोधनाचे काम केले. प्रसंगी आंदोलनंही उभी केली. वधू-वर परिचय मेळावे, विद्यार्थी करिअर मार्गदर्शन, उद्योग व्यवसाय कृषीविषयी मार्गदर्शन, शिक्षक पुरस्कार महिला पुरस्कार याबरोबरच मराठा जोडो अभियान, जिजाऊ रथ यात्रा, विविध अधिवेशने, शिवधर्म परिषदा शिक्षक परिषदा आदी माध्यमातून समाज जागृत आणि प्रेरित करण्याचे काम मराठा सेवा संघाने केले आहे. जिजाऊ ज्ञान मंदिर ही शिक्षण क्षेत्रातील एक नवीन संकल्पना तयार केली आज अनेक ठिकाणी ही ज्ञान मंदिर जोमाने कार्यरत आहेत.

सिंदखेड राजा येथील जिजाऊ सृष्टी, शिवधर्म पीठ व नागपूर येथील बळीराजा संशोधन केंद्र ही खूप मोठी निर्मिती सेवा संघाने केली आहे. हजारो लेखक, वक्ते, प्रकाशक निर्माण करुन वाचन व लिखाण संस्कृती वाढविण्यामध्ये सेवा संघाचे योगदान खूप मोठं आहे.

बहुजनांचे हित डोळ्यासमोर इतर बहुजनवादी चळवळी सोबत संवाद ठेऊन जातीय सलोखा, धार्मिक सलोखा राखण्यामध्ये सेवा संघ आणि सर्व कक्षानी उत्तम भूमिका बजावली आहे. ३३ वर्षांच्या सेवा संघाच्या यशस्वी वाटचालीत संपूर्ण समाजाचे भरभरुन सहकार्य मिळाले. आपणा सर्वांच्या सहभागातूनच ही चळवळ अत्यंत ताकदीने उभी आहे व यापुढेही वेगाने कार्यरत राहणार आहे तशी प्रेरणा आम्हाला मिळत राहो, ही आई जिजाऊ चरणी प्रार्थना! पुन्हा एकदा वर्धापन दिनाच्या हार्दिक सदिच्छा.

**- प्रशांत पाटील,** विभागीय अध्यक्ष
मराठा सेवा संघ महाराष्ट्र

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# संक्षिप्त वृत्त

## राष्ट्रवादी उद्योग, व्यापार विभागाचे कार्य कौतुकास्पद : शरद पवार

**पंढरपूर, दि. ३१ ऑगस्ट-**

राष्ट्रवादी उद्योग व व्यापार विभागाकडून नव उद्योजकांना करण्यात येणारे मार्गदर्शन, त्यांना देण्यात येणारे प्रोत्साहन महत्त्वाचे ठरत आहे. हे काम कौतुकास्पद आहे. राष्ट्रवादी उद्योग व व्यापार विभागाकडून करण्यात येत असलेल्या निवडी तसेच वाढता जनसंपर्क पाहून पक्षाध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी राष्ट्रवादी उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांचे कौतुक केले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार उद्योग व व्यापार विभाग प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे हे दिल्ली येथे कामानिमित्त गेले होते. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची शुक्रवारी दिल्ली मधील निवासस्थानी भेट घेत चर्चा केली. उद्योग व व्यापार विभागाचे विविध विषय व प्रश्न यावेळी मांडत यांवर शरदचंद्र पवार यांचे मार्गदर्शन देखील घेतले. यावेळी पवार यांनी सोलापूर जिल्ह्यातील राजकीय घडामोडी बाबतही चर्चा केली. या भेटी दरम्यान पवार यांनी केलेले मार्गदर्शन माझ्यासाठी दीप स्तंभाप्रमाणे आहे. मला दिलेले पाठबळ हीच माझी शक्ती आहे असे नागेश फाटे यांनी सांगितले.

## बांधकाम कामगारांसाठी आज करमाळ्यात नोंदणी अभियान; सहभागी होण्याचे आवाहन

**करमाळा, दि. ३१ ऑगस्ट-**

उद्या रविवार एक सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजल्यापासून अमरनाथ टावर देवीचा मार्ग रोड येथे बांधकाम नोंदणी कार्यक्रम आयोजित केला असून नवीन नोंदणी कामगारांसाठी सर्व कागदपत्र घेऊन कामगारांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना महिला आघाडी ज्योतीताई शिंदे यांनी केले आहे. उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील तालुका प्रमुख राहुल कानगुडे, शहर प्रमुख संजय आप्पा शीलवंत, युवा सेनेचे तालुकाप्रमुख नवनाथ गुंड, जेऊर शहर प्रमुख माधव सूर्यवंशी, ओबीसी शिवसेना आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुयश करचे, वैद्यकीय कक्ष प्रमुख नागेश चेंडगे, जेऊर शाखाप्रमुख संजय जगताप, निलेश चव्हाण, राजेंद्र मिरगळ, उपतालुकाप्रमुख दादासाहेब तनपुरे, जेऊर शहर प्रमुख दादा थोरात आदी जास्तीत जास्त नोंदणी कामगार करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. नवीन बांधकाम कामगारांना नोंदणी करण्यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड झेरॉक्स, इंजिनियर किंवा कंत्राटदाराचा कामावर असल्याचा दाखला असे कागदपत्र घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन करमाळा शहर प्रमुख संजय शीलवंत यांनी केले आहे.





## अक्कलकोट तालुका गणित अध्यापक मंडळाच्या अध्यक्षपदी कल्लप्पा बुळ्ळा

**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुका गणित अध्यापक मंडळाच्या अध्यक्षपदी डिग्गेवाडी माध्यमिक आश्रमशाळेचे कल्लप्पा लक्ष्मण बुळ्ळा यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मंगरूळे हायस्कूल येथे शिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड झाली. प्राचार्य नंदा कदम, सेवानिवृत्त मुख्याधपाक बसवराज बंडगर, शिवानंद पुजारी, लक्ष्मण चलगेरी, विषय तज्ज्ञ शिवशरण बिराजदार, प्रशांत चाबुकस्वार, जयंत उपासे उपस्थित होते. उपाध्यक्ष स्वप्नाली जमदाडे, सचिव शावरी, परीक्षा प्रमुख शिवानंद पुजारी, सदस्य कल्लप्पा कलशेट्टी, शिवशरण गवंडी, भीमाशंकर भहिरगोंड, चंद्रशेखर खंडाळा, काशिनाथ धनशेट्टी, सचिन डफळे, भीमाशंकर भास्कर, सतीश मर्जी, चैतन्य विजापुरे, भाग्यश्री पुजारी, भाग्यश्री धनशेट्टी यांच्या निवडी झाल्या. प्रास्ताविक मोहन गुरव यांनी केले तर आभार सिद्धारम नुला यांनी मांनले.



## युवासेनेचे करमाळ्याच्या तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन

**करमाळा, दि. ३१ ऑगस्ट-**

मालवण जिल्हा सिंधुदुर्ग येथे उभारण्यात आलेला छत्रपती शिवरायांचा पुर्णाकृती पुतळा कोसळल्याप्रकरणी संबंधीत ठेकेदारावर तात्काळ गुन्हा दाखल करण्याबाबत व बदलापूर जिल्हा ठाणे येथील शाळेतील चिमुरड्या मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ तहसीलदार शिल्पा ठोकडे यांना निवेदन युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) करमाळा तालुका समन्वयक कुमार माने यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख शाहू फरतडे, महिला आघाडी तालुका प्रमुख वर्षाताई चव्हाण, युवासेना तालुका प्रमुख शंभूराजे फरतडे, शहर समन्वयक प्रसाद निंबाळकर, युवासेना उपशहर प्रमुख कल्पेश राक्षे, आदित्य जाधव, किशोर पवार, नबी कुरेशी, संघर्ष लांडगे, अनिकेत ढावरे, ओंकार कोठारे, भाऊ मस्तुद व अनेक शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अक्कलकोट तहसीलमधील सर्व्हर डाऊन

**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट-**

येथील तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून गोरगरीब वृद्ध रेशन कार्ड काढणे, नावे कमी करणे, विभक्त कार्ड करणे, बालकांची नावे समाविष्ट करणे, ऑनलाईन नंबर आदी कामासाठी महिला वर्ग, तरुण मुले वृद्ध माणसे या कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. सर्व्हर बंद असल्याचे कारण सांगून सातत्याने माघारी पाठविले जात असल्याचा प्रकार घडत आहे. तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात रेशन कार्ड काढण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची वेळेत कामे होत नसल्याने या कामावर नागरिक तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

# निकृष्ट डांबरी रस्त्याची चौकशी करा

## तहसीलदारांना निवेदनाद्वारे मागणी; ठेकेदारांना काळ्या यादीत टाका

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट-**

केंद्र व राज्य सरकारकडून मिळालेल्या कोट्यवधी निधीतून दर्जेदार डांबरीकरण रस्ते होणे अपेक्षित होते. परंतु ठेकेदारांनी दर्जेदार रस्ता करण्याऐवजी निष्कृष्ट व अत्यंत बोगस रस्ते केलेली आहेत. तीन-चार वर्षात झालेल्या सर्व रस्त्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी आढळणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावे तसे न झाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करू असा इशारा शिवसेना उबाठाचे तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी तहसीलदारांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे.



निकृष्ट कामे करून ठेकेदारांनी रस्त्यांची वाट लावली असून ठेकेदार नागरिकांच्या जीवाशी खेळत आहे. लाखो रुपयांच्या निधीतून झालेली कामे ठेकेदारांनी मात्र सर्व निकष डावलून केले आहे. त्यामुळे नव्याने केलेल्या रस्त्याची दूरवस्था झाली असून जागोजागी रस्ता उखडला जात आहे. दोन्ही बाजूला साईडपट्टी न केल्याने वाहन चालक स्वःताचे जीव मुठीत घेऊन गाडी हाकलत आहे. ठेकेदाराने दर्जाहीन काम केल्याने अपघात घडण्याची शक्यता वर्तवली जात असून रस्ता किती काळा टिकेल याची शाश्वती नाही. संबंधित ठेकदार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जनतेबद्दल तळमळ नसून फक्त मळमळ आहे. अनेक रस्त्यांचे डांबरीकरण नव्याने करण्यात आले. मात्र खडीचा पातळ थर, डांबराचा अल्पसा वापर करण्यात आल्याने रस्ता अल्पावधीतच खड्डेमय बनला जात आहे. ठेकेदाराने मनमानीपणे काम उरकून घेतल्याने रस्ता जागोजागी खचला आहे. सर्वच रस्त्याच्या कामाकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाले आहे.

डांबरीकरण कामाची स्वतंत्र पथक नेमून रस्त्याची पाहणी करावी. कामाची गुणवत्ता विभागाच्या माध्यमातून तपासणी व मोजमाप करण्यात यावे. यामध्ये दोषी आढळणाऱ्या संबंधित ठेकेदार व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. जनतेच्या डोळ्यात ठेकेदार व बांधकाम विभागाच्या अधिकारी संगनमताने धूळफेक केली आहे. ठेकेदार व बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे स्थानिक सत्ताधाऱ्याने दुर्लक्ष केले आहे.

### लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे

रस्त्याच्या कामाकडे राजकीय नेत्यांचे लक्ष नसल्याने ठेकेदार मात्र सोयीस्करपणे निष्कृष्ट दर्जाचे रस्ते तयार करून स्वतःचे उकळ पांढरे करून घेतले आहे. भाजप विकासाची आश्वासने देत सत्तेवर येताच सत्ताधाऱ्यानी जातीभेदाची नखे बाहेर काढली. २०१९ ला दिलेली वारेमाप वचने म्हणजे निवडणुकीचा जुमलाच असल्याचे शिवसेना उबाठाचे तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी सत्ताधाऱ्यावर आरोप केला आहे.



# दामाजी महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्रांतर्गत केक मेकिंग कोर्स

● माधुरी गवळी यांनी विद्यार्थिनींना दिले केक मेकिंगचे धडे

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ३१ ऑगस्ट-**

मंगळवेढा येथील श्री संत दामाजी महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्रांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी केक मेकिंगचे प्रशिक्षण देण्यात आले. यात ६५ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला होता.

प्रभारी प्राचार्य डॉ. औदुंबर जाधव यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की येणाऱ्या काळामध्ये कौशल्य प्रशिक्षण हे विद्यार्थ्यांना करावे लागणार आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना प्रत्येक विद्यार्थ्यांनी कौशल्याचे शिक्षण घेणे देखील गरजेचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणात सुद्धा या कौशल्य शिक्षणाला अनन्यसाधारण असे महत्त्व अभ्यासक्रमात देण्यात आले आहे. त्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असेही महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य जाधव यांनी त्यांच्या मनोगतातून व्यक्त केले.

केक मेकिंग प्रशिक्षणासाठी मंगळवेढा तालुक्यातील प्रसिद्ध माधुरी गवळी यांनी विद्यार्थ्यांना सलग तीन दिवस अतिशय कौशल्यपूर्ण तसेच सहज व सोप्या पद्धतीने प्रशिक्षण दिले. त्याच्यामध्ये विद्यार्थ्यांना काही तास थेरीचे व काही तास प्रॅक्टिकल अशा पद्धतीने हा कोर्स अतिशय यशस्वीरित्या व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हे प्रशिक्षण यशस्वी संपन्न करण्यासाठी महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख व कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. जावेद तांबोळी, केक मेकिंग कोर्सच्या इन्चार्ज प्रा. सरिता भोसले, प्रा. डॉ. संजय क्षीरसागर, प्रा. डॉ. राजकुमार पवार, प्रा. सुधाकर राठोड, ट्रेनर माधुरी गवळी यांनी परिश्रम घेतले.

# फेकलेली विषारी बाटली बेतली चिमुकलीच्या जीवावर

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३१ ऑगस्ट-**

गावातील रस्त्याच्या कडेला अज्ञातांनी फेकून दिलेली विषारी औषधाची बाटली लहान चिमुकलीने खेळण्यासाठी घेतली. नंतर तिने खेळतखेळत त्या बाटलीतील विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे मुंगशी येथील दुर्वा विनोद क्षीरसागर (वय ३) या चिमुकलीचा दुर्देवी अंत झाला.



ही घटना बार्शी तालुक्यातील मुंगशी (वा.) येथे घडली आहे. तिने औषध प्राशन केल्याची घटना तिच्यासोबत असणारे चिमुकले संवगडी यांच्यामुळे उघडकीस आली. त्यानंतर तात्काळ उलटीचा त्रास सुरू झाल्याने तिच्यावर वैराग येथे खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करून तिला बार्शी येथील खाजगी दवाखान्यात दाखल केले. परंतु तिचे शरीर साथ देत नसल्याने तिला सोलापूर येथे हलवण्यात आले. परंतु तिच्या संपूर्ण शरीरात विष भिनल्याने प्रकृती चिंताजनक झाली होती. त्यानंतर काल तिची प्राणज्योत मालवली. अशा घटना समाजात घडत असताना पालकांनीदेखील आपल्या लहान मुलांची योग्य ती काळजी घेतली पाहिजे. औषध वापरल्यानंतर बाटली काळजीपूर्वक विल्हेवाट लावली पाहिजे तरच दुर्घटना टळतील.

# यश चंदनशिवे युवा प्रतिष्ठानच्या दहीहंडीचा मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ ऑगस्ट-**

शिवछत्रपती क्रीडा व सांस्कृतिक मंडळ संचलित युवा प्रतिष्ठानच्या मानाची दहीहंडी फोडण्याचा मानकरी यश चंदनशिवे ठरला आहे. बार्शी शहरातील कसबा पेठमधील हांडे गल्लीत परंपरेनुसार दहीहंडी उत्सव साजरा केला जात आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. सुशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनातून मागील १२ वर्षांपासून दहीहंडी उत्सवास मोठे स्वरूप देण्यात आले आहे.



बार्शी येथील युवा प्रतिष्ठानची ओळख प्रत्येक वर्षी आगळेवेगळे देखावे, सामाजिक उपक्रम यासाठी आहे. एका बाजूला उत्सवाच्यानिमित्ताने धांगडधिंगा व सेलेब्रिटी महिलांचा डान्स असेल प्रकार वाढत असताना कायम वेगळेपण जपणाऱ्या युवा प्रतिष्ठानने यावर्षी दहीहंडी उत्सवातून आजच्या युवकांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

दहीहंडी उत्सवासाठी केवळ युवकांचा जल्लोष व धिंगाणा असे समीकरण न ठेवता शिवकालीन मर्दानी खेळाचे आयोजन केले होते. यामध्ये तलवारबाजी, काठी, लाठी याची प्रात्यक्षिके बार्शी येथील माधवराव देशमुख व त्यांच्या टीमने सादर केली. तसेच डॉल्बीवर केवळ धांगडधिगा न करता देशभक्तीची गाणी लावत उपस्थित सर्वच नागरिकांच्या अंगात उत्साह संचारला होता.

युवा प्रतिष्ठानच्या दहीहंडी उत्सवासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. सुशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन गायकवाड, अक्षय चव्हाण, बिट्टू बारंगुळे, दयानंद धुमाळ, अण्णा साळुंखे, दीपक नवले, मनू चव्हाण, केतन वायचळ, ओंकार वायचळ, सोहम वायकुळे, नागेश सुरवसे, प्रथमेश पाटील, प्रशांत घोडके, अभिषेक गवळी, वैभव गरड, आकाश चव्हाण, दीपक भुजबळ, आकाश गाडे सोनू नवले, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम आयोजनासाठी तारा इलेक्ट्रॉनिक बार्शी यांचे सहकार्य लाभले.

### प्रबोधनपर चित्रफितीने वेधले लक्ष

दहीहंडीसाठी खास रेनडान्सची सोय करण्यात आली होती. तर उत्सव ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची डिजिटल व स्क्रीन सर्वांना आकर्षित करत होते. त्याचबरोबर मोठ्या स्क्रीनवर युवा प्रतिष्ठानने केलेल्या विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांची माहिती देणारी चित्रफीत ही लावण्यात आली होती. नेहमी प्रशासनाला सहकार्य करणारी भूमिका बजावत या बार्शी ही पोलीस प्रशासनाने दिलेल्या वेळेच्या अर्धा तास दहीहंडी उत्सव पूर्ण करण्यात आला.

# सांगोल्यात पुतळा उभारणीसाठी मंजुरी द्यावी

● आ. शहाजीबापू पाटील, माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांची मागणी




छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्यासाठी आमदार फंडातून दहा लाख रुपये आणि छत्रपती शिवाजी महाराज चौकात खुले सभागृह उभारण्यासाठी नगरविकास विभागाकडून दोन कोटी रुपये मंजूर केले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या चबुतऱ्यासाठी नगरविकास विभागाकडून दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.

**- आ. शहाजीबापू पाटील**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३१ ऑगस्ट-**

सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या चबुतऱ्यांचे काम पूर्णत्वाकडे सुरू आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांची तात्काळ बैठक घ्यावी आणि पुतळा उभारणीसाठी मंजुरी द्यावी, अशी मागणी आ. शहाजीबापू पाटील व माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्यदिव्य पुतळा उभारण्यासाठी माझ्यासह शिवप्रेमी बहुउद्देशीय सामाजिक संस्था, सांगोला व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ, सांगोला यांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह संबंधित सर्व शासकीय अधिकाऱ्यांची पुतळा समितीची बैठक तातडीने आयोजीत करावी. तसेच पुतळा उभारणीसाठी मंजुरी देण्याची कार्यवाही तात्काळ करावी अशा सूचना आ. शहाजीबापू पाटील यांनी पत्राद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्या आहेत. दोन्ही संस्थांकडून नवीन पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी संपूर्ण परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केला आहे.

# करकंब-अरण पायी दिंडीची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३१ ऑगस्ट-**

गेल्या ३ वर्षांपासून प्रत्येक पंधरवाडी (वद्य पक्ष) एकादशीला करकंब ते अरण पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. या पायी दिंडी सोहळ्यामध्ये वरचेवर भक्तांची संख्या वाढतच असल्याचे हभप कांतीलाल खारे यांनी सांगितले.

करकंब, शुक्रवार पेठेतील संत सावता माळी मंदिरातून सकाळी ८ च्या सुमारास ही दिंडी निघते. विठ्ठल मंदिर, मारुती मंदिर येथे दर्शन घेऊन पुढे अरणला रवाना होते. या मार्गावरील भाविक भक्तांकडून या दिंडीसाठी चहा व फराळाचे आयोजन करण्यात येते.अरण येथील व्यापारी व शेतकरी शहाजी सावंत यांच्या घरी तुळशी पूजनानंतर भक्तांना गेल्या २ वर्षांपासून फराळ दिला जातो. तीर्थक्षेत्र अरण येथील मंदिरात दर्शन झाल्यानंतर भजन व आरती करण्यात येते.दिंडीतील महिला, पुरुष फुगड्यांमध्ये सामील होऊन विठ्ठलनामाचा आनंद घेताना दिसून येतात. या दिंडी सोहळ्यात शांता शिंदे, सुनंदा खारे, सुभद्रा शिंदे या भगिनी डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन या दिंडीत सहभागी होतात. या पायीदिंडी सोहळ्यासाठीसाठी शालन खारे, ज्ञानेश्वर देशमुख, कल्याण मसवडे, लाला शिंदे, सदाशिव वाघमारे यांची मोलाची साथ लाभते.



### प्रत्येक एकादशीला महाप्रसाद

तीर्थक्षेत्र अरण येथील मंदिरात दर्शन घेऊन भजनही करण्यात येते. श्रावण मासानिमित्त लऊळजवळील कुर्मदास मंदिरात दर्शन घेऊन आरती करण्यात आली. पंढरपूर तीर्थक्षेत्री विठ्ठलाच्या दर्शनाचेही आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक महिन्याच्या एकादशीला प्रदीप घाटुळे, शहाजी सावंत, सावता वसेकर, विठ्ठल व्यवहारे, दत्तात्रय कदम, सुरेश जाधव यांच्यावतीने भक्तांना महाप्रसाद व चहा दिला जातो.

# गणेशोत्सवात नियमांचे पालन करा

● उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या सूचना
● पंढरपुरातील गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ ऑगस्ट-**

पंढरपूर शहर व तालुक्यात सर्वच समाजाचे सण, उत्सव एकत्र येऊन आनंदाने साजरे करतात व जातीय सलोखा अबाधित ठेवतात अशी या तालुक्याची परंपरा आहे. आणि हीच परंपरा कायम ठेवून तसेच नियमांचे पालन करु गणेशोत्सव आनंदात व उत्साहात करावा, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांनी केले.



पंढरपूर शहर पोलीस स्टेशन येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरातील गणेशोत्सव मंडळाची बैठक घेण्यात आली, यावेळी ते बोलत होते. यावेळी पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके उपस्थित होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले म्हणाले, गणेशोत्सव काळात शांततेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे.

पारंपरिक वाद्य व कमी आवाजाची साऊंड सिस्टिम याला मंडळांनी प्राधान्य द्यावे. गणेश मंडळांचा मंडप व विसर्जन मिरवणुकीतील देखावा हा रहदारीस अडथळा करणारा नसावा, ध्वनिक्षेपकाच्या आवाजाची मर्यादा पाळावी, तसेच गणेशोत्सवामध्ये गणेश मंडळांनी पर्यावरणपूरक उपक्रम राबवावेत. समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे सादरीकरण करावे. उत्सव काळात अनुचित प्रकार टाळण्यासाठी मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करावेत. उत्सव साजरा करताना त्यामध्ये अडचणी निर्माण करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### महिला सुरक्षेसाठी पोलिस तत्पर

समाज माध्यमातून जे आक्षेपार्ह संदेश पाठविण्यात येतात, ते इतरत्र पाठवू नये. आक्षेपार्ह संदेश असेल तर तात्काळ पोलीस स्टेशनला त्याची माहिती द्यावी म्हणजे संबंधितावर कारवाई करता येईल. पोलिसांच्या सोशल मीडिया सेलच्या माध्यमातून आक्षेपार्ह सोशल मीडियाच्या पोस्टवर लक्ष ठेवण्यात येत आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासन तत्पर असल्याचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांचे सरसकट कर्जमाफ करा

● शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने नागणसूर येथे आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट-**

नागणसूर (ता. अक्कलकोट) येथे शेतकऱ्यांच्या हितार्थ उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा संघटक शरण सुरवसे, शेतकरी सेना तालुका संघटक महांतेश हत्तुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नागणसूर येथे शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करा, शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा यासह विविध मागण्यांसाठी आमरण उपोषणास प्रारंभ केला आहे. उपोषणाचा आजचा दुसरा दिवस आहे.



नागणसूर भागातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. थकीत पीकविमा, दुष्काळ निधीचे वाटप त्वरित झाले पाहिज, नागणसूर येथील मराठवाडी तलाव प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ४ पट मोबदला द्यावा, तलाव ताबडतोब पूर्ण करावा, रेंगाळत पडलेले देगांव कालव्याचे ४०० कोटी निधी देऊन काम त्वरित चालू करावे, अक्कलकोट तालुक्यातील अन्न योजनेमधील बोगस व श्रीमंत लाभार्थ्यांचे प्रत्येक गावात चावाडी वाचन करावे. गरीब लाभार्थ्यांना लाभ द्यावा, तालुक्यातील सर्व गावांतील तलावाला देगांव कालवा एक्सप्रेस व एकरुख सिंचन योजनेच्या उजनी पाण्याद्वारे जोड देऊन तलाव भरण्यात यावा, तालुक्यातील अनेक रस्त्यांमध्ये निकृष्ट दर्जेचे काम करून ठेकेदार व संबंधित अधिकारी तालुकावासियांची फसवणूक करीत आहेत, त्यांना काळ्या यादी टाकून संबंधितांवर कडक कारवाई करावी, शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज देण्यात यावी, शेतकऱ्यांचे पेंडिंग असलेले डीपी त्वरित देण्यात यावी, कल्लहिप्पपरगे ते करजगी रस्ता मंजूर करून त्वरित काम चालू व्हावे, तालुक्यातील शेतकऱ्यांना थकबाकी किंवा सिव्हिल स्कोअरचा अट रद्द करून तात्काळ कर्ज सर्व बँकेकडून वितरित करावे, हिळ्ळी-खानापूर, आळगी येथे बॅरेज बांधून अधिक क्षमतेने पाणी साठवणूक करून पंप हाउसद्वारे लिफ्ट करून तालुक्यातील तलाव भरण्यात यावा आदी मागण्यांसाठी आमरण उपोषणास प्रारंभ केला आहे.

CMYK

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मानसिक समाधानासाठी लिंगपूजा करा

● जय गुरुशांतलिंगराध्य शिवाचार्य महास्वामी



**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट**

वीरशैव लिंगायत समाजात देवळातील स्थावरलिंग उपासनेपेक्षा गळ्यातील इष्टलिंग उपासनेला लिंगायत धर्माने महत्त्वाचे स्थान दिले आहे म्हणून भाविकांनी प्रपंचात सुख आणि समाधान मिळविण्यासाठी दररोज सकाळी लिंगपूजा करावी, असे प्रतिपादन मठाधिपती श्री. जयगुरुशांतलिंगराध्य शिवाचार्य महास्वाम‍ीजी यांनी केले. कुंभार गल्लीतील श्रीशैल पीठाचे श्री शांतलिंगेश्वर हिरेमठात श्रावणमासनिमित्त आयोजित महासाध्वी हेमरड्डी मल्लम्मा यांच्या पुराणात ते बोलत होते. वीरशैव धर्मातील ९ जंगम बटूंना अय्याचार व ७५ भक्तांना श्री जय गुरूशांतलिंगराध्य महास्वामी यांच्या हस्ते, वे. बसवराज शास्त्री व संतोष स्वामी यांच्या मंत्रोच्चारात होमहवन करून दीक्षा संस्कार देऊन इष्टलिंग पूजा झाली. सूत्रसंचालन तात्यासाहेब समाने यांनी केले. याप्रसंगी शिवय्या स्वामी, कल्लप्पा सोमेश्वर, तात्यासाहेब समाणे, श्रीशैल स्वामी, भीमाशंकर करकी, बाबुराव बिराजदार, इरण्णा पाटील, मल्लिकार्जुन कुंभार, शरणप्पा कुंभार, योगेश कुंभार, शिवानंद कुंभार, चिदानंद कुंभार, श्री रेणुकाचार्य अक्कन बळग, श्री चौडेश्वरी माता, भक्तगण उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### तुंगत येथे २०५ जणांचे रक्तदान

**पंढरपूर, दि. ३१ ऑगस्ट-**

तुंगत येथे घेतलेल्या रक्तदान शिबिरामध्ये तब्बल २०५ जणांनी रक्तदान केले. यावेळी बाजार समितीचे सभापती हरीष गायकवाड, लक्ष्मण धनवडे, बंडू पवार, बाबासाहेब पाटील, माऊली हळणवर, संजय घाडगे, हनुमंत सपाटे, अतुल चव्हाण, खंडेराव रणदिवे, आगतराव रणदिवे संजय रणदिवे, महादेव रणदिवे, चेअरमन महेश रणदिवे, लक्ष्मण कदम, ब्रह्मदेव रणदिवे, बाळासो आंद, भजनदास आंद, शिवाजी नागणे, वामन वनसाळे, गणपत रणदिवे, संतोष रणदिवे, युटोपियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक आदी उपस्थित होते. जि प. प्राथमिक शाळा, श्री तुंगेश्वर हायस्कूल, अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी राजू भोसले, आनंद आंद, गजेंद्र रणदिवे, दत्तात्रय रणदिवे, बाळासाहेब देठे, दत्तात्रय भांगे, कृष्णा पवार, कुमार माळी, हुसेन मुलाणी, रमेश आंद, अनिकेत रणदिवे, महेश गायकवाड, संतोष भांगे, सर्जेराव भोसले, राम कृष्ण नागणे, अविराज रणदिवे, तेजस गोडसे, दादा देठे, महादेव भुसे, म्हाळाप्पा कोळेकर,अथर्व रणदिवे, मल्लिकार्जुन ब्लड बँक सोलापूरचे बाळासाहेब सातपुते यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मंगेश भोसले यांनी केले. माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले होते.

### चोपडी तंटामुक्त समिती अध्यक्षपदी ज्ञानेश्वर बाबर यांची फेरनिवड

**सांगोला, दि. ३१ ऑगस्ट-**

चोपडी ग्रामपंचायतची ग्रामसभा सरपंच मंगलताई सरगर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. ग्रामसभेमध्ये ज्ञानेश्वर भानुदास बाबर यांची तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली. त्यांनी यापूर्वी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी चांगले काम केल्याने त्यांची पुन्हा एकदा निवड करण्यात आली.यावेळी उपसरपंच पोपट यादव, सोसायटीचे चेअरमन भिकाजी बाबर, दगडू बाबर, आर. एस. बाबर, ग्रामपंचायत सदस्य दिनेश बाबर, प्रशांत डोंगरे, ग्रामविकास अधिकारी मच्छिंद्र मिसाळ, तलाठी एस. के.




जाधव, आरोग्य सेविका टी. आर.गेजगे, माजी सैनिक चंद्रकांत बाबर, बाळासाहेब बाबर, महादेव वाघमारे, कृषीमित्र बाळासाहेब बाबर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामसभेत बांबू लागवड, घरकुल योजना, मतदारावर यादी वाचन, सिद्धनाथ मंदिराला तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात यावा याबाबत चर्चा करण्यात आली. समाजकल्याण व महिला बालकल्याण योजनांची माहिती देण्यात आली. आभार मच्छिंद्र मिसाळ यांनी मानले.



### कल्याणराव इंगळे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी वाहनाची सोय

**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कल्याणराव बाळासाहेब इंगळे पॉलिटेक्निक महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी नवीन शालेय बस सेवा सुरू केली आहे. चेअरमन महेश इंगळे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना प्रवासात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आणि त्यांना सुरक्षित व सुलभ प्रवास अनुभवता यावा म्हणून आम्ही ही नवी बस सेवा सुरू केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाचेल आणि प्रवास अधिक आरामदायक होईल.नवीन बससेवेचा शुभारंभ प्रथमेश इंगळे यांनी केला. यावेळी प्राचार्य एन. बी. जेऊरे यांनीही मनोगत व्यक्त केले.



### जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलमध्ये पालकसभेत विविध निर्णय

**करमाळा, दि. ३१ ऑगस्ट-**

झरे (ता. करमाळा) येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या पालक सभेत विविध निर्णय घेण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश बिले, सचिव युवराज बिले, संचालिका स्वाती बिले, मुख्याध्यापिका अमृता परदेशी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी माठ्या प्रमाणात पालक उपस्थित होते. अनेक पालकांनी शैक्षणिक व्यवस्थेबद्दल आपले विचार व्यक्त केले. अध्यक्ष जयप्रकाश बिले यांनी पालकांशी संवाद साधला. सूत्रसंचालन नम्रता साळुंखे यांनी केले व आभार सतिश कोंडलकर यांनी मानले.

# स्टेडियमसाठी आरक्षित जागेची विक्री

● भाजपाच्या पंढरपूर तालुकाध्यक्षावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची दीपक चंदनशिवेंची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ ऑगस्ट-**

पंढरपूर तालुक्यातील कासेगाव हद्दीतील गट नंबर १४/१अ/२/अ ही ८ एकर जागा वीस वर्षांपूर्वी नगरपालिका प्राधिकरणाने पंढरपूर शहरातील खेळाडूंसाठी स्टेडियम उभे राहावे यासाठी सदर जागेवर स्टेडियमचे आरक्षण व जुनी शर्त असतानाही प्लॉटिंगसाठी डेव्हलप करून या जागेची बोर्ड लावून विनापरवाना विक्री केली जात आहे.


प्रांताधिकाऱ्यांची परवानगी टाळण्यासाठी दहा गुंठ्याप्रमाणे जागा विकता यावी. यासाठी भाजपा तालुकाध्यक्षपदाचा दबाव टाकून जागेच्या उताऱ्यावर जिरायत ज्वारी जमीन असा उल्लेख असतानाही बागायत जमीन म्हणून विक्री केली आहे. खरेदी देताना जागा मालकाने जागेवर कोणत्याही प्रकारचे आरक्षण नाही असे प्रतिज्ञापत्र दिले आहे. झोनल दाखला न जोडल्याने दुय्यम निबंधक अधिकाऱ्याची व खरेदी करणाऱ्या नागरिकाची फसवणूक करून जागा विकण्यात आली असल्याचा आरोप दीपक चंदनशिवे यांनी केला आहे. यामुळे जागेचे मालक भाजपाचे तालुकाध्यक्ष भास्कर कसगावडे यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा व सदर आदेश व खरेदी व्यवहार रद्द करण्यात यावेत. यासाठी न्याय मागण्यासाठी लवकरच पंढरपूर तहसील कार्यालयासमोर खेळाडू व नागरिकांना सोबत घेऊन आंदोलन करणार असल्याचा इशारा आरपीआयचे दीपक चंदनशिवे यांनी पंढरपूर येथील आयोजित पत्रकार परिषदेत दिला आहे. यावेळी त्यांनी भाजपा तालुकाध्यक्ष भास्कर कसगावडे यांच्याकडून सदर तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप करत त्यांच्यापासून आपल्या जीवितास धोका असल्याने पोलीस संरक्षण मिळावे अशी मागणी केली आहे.

यावेळी त्यांनी माध्यमांसमोर सदर जागेवर स्टेडियमचे आरक्षण असल्याचा व खरेदी देताना जिरायत शेत जमीन बागायत असल्याचा उल्लेख केल्याचा तसेच झोनल दाखला न जोडता खरेदी देताना जागेवर आरक्षण नसल्याचे स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्र जागा मालकाने दिल्याचा पुरावा माध्यमांसमोर सादर केला आहेत. यावेळी त्यांनी सदर जागेच्या उताऱ्यावर पतसंस्थेचे कर्ज असतानाही पतसंस्थेकडून जागा विकण्यास परवानगी असल्याचा दाखला देण्यात आल्याने याचीही सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

याबाबत आपण भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**कायदेशीर कारवाई करणार : कसगावडे**

पंढरपूर-कासेगाव (ता. पंढरपूर) हद्दीतील गट नंबर १४/१अ/२/अ ही जागा माझ्या खासगी मालकीची आणि वहिवाटीची आहे. तरीही माझी बदनामी करण्याच्या हेतूने, तसेच जमिनीविषयी संभ्रम निर्माण करण्याच्या हेतूने तहसीलदारांकडे चुकीचे निवेदन दिले आणि प्रसिद्धी माध्यमांनाही चुकीची माहिती दिली, अशी माहिती भास्कर कसगावडे यांनी दिली. पंढरपूर विकास प्राधिकरण जाहीर होण्यापूर्वीच या जमिनीचे खरेदीचे रीतसर व्यवहार झालेले आहेत. ही जमीन रीतसर, कायदेशीर पद्धतीने खरेदी केलेली आहे, असे असतानाही आपण भाजपचे तालुकाध्यक्ष आहोत. त्यामुळे राजकीय हेतूने, तसेच आपल्या जमिनीबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण करण्याच्या हेतूने हे निवेदन देऊन चुकीची मागणी केली आहे, त्यामुळे आपण दीपक चंदनशिवे यांच्यासह इतरांविरोधात कायदेशीर कारवाई करणार असल्याचा इशाराही कसगावडे यांनी दिलेला आहे.




# माढा विधानसभेची दहीहंडी मीच फोडणार

● अभिजीत पाटलांचा विश्वास | माढ्यातील शिवशाही प्रतिष्ठानचा संघ ठरला विजेता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ ऑगस्ट-**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वतीने माढा येथे युवाशक्ती दहीहंडी उत्सव ठेवण्यात आलेला होता. दहीहंडीच्या निमित्ताने कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणून सिने अभिनेत्री अक्षय देवधर यांची प्रमुख उपस्थिती होती. याच ठिकाणी विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी आपल्या सर्वांच्या साथीने, सर्वांच्या प्रेमाने व आशीर्वादाच्या जोरावर आपणच येणारी २०२४ ची विधानसभेची दहीहंडी फोडणार असल्याचे मोठे वक्तव्य अभिजीत पाटील यांनी केल्याने माढा तालुक्यात चर्चेला उधाण आहे.



माढा युवाशक्तीच्या माध्यमातून झालेल्या दहीहंडीचा शिवशाही प्रतिष्ठान, माढा यांनी बक्षीस पटकावत मानाचा फेटा आणि रोख पारितोषिक मिळविले. यावेळी धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील, राजाभाऊ चवरे, आनंद कानडे, शहाजी साठे, शिवाजी पाटील, ॲड. धनंजय चव्हाण, शंभू साठे, पंडित साळुंखे, यू. एफ. जानराव, ॲड. विजय माने, निशांत पालकर, भाऊसाहेब महाडिक, अजिंक्य चव्हाण, पोपट आलदर, सज्जन पाटील, संदीप उमाटे, अच्युत उमाटे, ऋषिकेश तंबीले, संजय तांबिले, ज्ञानेश्वर बगडे, संजय भोगे, शिवाजी मुळे, नागेश इंगळे, दत्तात्रय पाटेकर, दादा नाईक, समाधान पाटील, शंभू चौरे, अमोल देशमुख, सतीश लटके, समाधान नागटिळक, दत्तात्रय पाटेकर, सागर शिंदे, पिंटू आतकरे, अभिजीत उबाळे, सागर बारबोले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक आबासाहेब साठे, जीतू जमदाडे, अक्षय शिंदे, सुयश मस्के व अभिजीत आबा पाटील मित्र परिवार माढा तालुका यांनी परिश्रम घेतले.

**माढ्यात जनसंपर्कावर जोर**

सध्या गावोगावी अभिजीत पाटील यांची प्रचार यंत्रणा फिरत असून वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून जनसंपर्क वाढवण्यावर जोर देत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी टेंभुर्णी येथे कुस्ती मैदानाच्या आखाड्यात कोणीही उमेदवार असू द्या त्याला चितपट कसे करायचे माहिती आहे असे वक्तव्य केले होते.



# राजुरीत पाटील गटाला खिंडार

● अनेक कार्यकर्ते संजयमामा शिंदे गटात

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३१ ऑगस्ट-**

राजुरी (ता. करमाळा) येथील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी नारायणआबा पाटील गटाला राम राम करून आ. संजयमामा शिंदे यांच्या गटात प्रवेश केला. आज दुपारी निमगाव येथील संजयमामा शिंदे यांच्या निवासस्थानी हा पक्षप्रवेश झाला.

आ. संजयमामा शिंदे यांनी राजुरीसाठी स्वतंत्र सबस्टेशन, उजनी कुकडी उपसा सिंचन योजना व नुकताच हॅम अंतर्गत मंजूर झालेला सावडी ते वेणेगाव फाटा या मार्गामुळे राजुरी गावाच्या विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार असल्याचे माजी ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब जाधव यांनी सांगितले. यावेळी भाऊसाहेब जाधव, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र बापू गायकवाड, छगन जाधव, माजी उपसरपंच धनंजय जाधव, योगेश जाधव, दादा जाधव, राजुरी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य बाळासाहेब पवार, वस्ताद गौतम गरुड, मगनदास जाधव, अण्णा जाधव, शहाजी जाधव, भागवत शिंदे या सर्व कार्यकर्त्यांनी माजी आ. नारायणआबा पाटील गटातून संजयमामा शिंदे यांच्या गटात प्रवेश केला आहे. यावेळी आ. संजयमामा शिंदे यांच्यासह माजी जिल्हा परिषद सदस्य उद्धव माळी,आर. आर. साखरे, नंदकुमार जगताप, संजू तात्या सारंगकर, सुनील पाटील, उदय साखरे, नामदेव जाधव, नवनाथ दुरंदे, दादा साखरे, आत्तम दुरंदे, मल्हारी दुरंदे, आकाश झोळ, संकेत अवघडे, आप्पासाहेब साखरे, तुषार मोरे, सचिन सराटे, सोमनाथ धुमाळ उपस्थित होते.

# जयघोषांनी परिसर दुमदुमला

● अक्कलकोट येथे श्री संतसेना महाराज पुण्यतिथी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ ऑगस्ट-**

श्री संतसेना महाराज नाभिक समाज बहुउद्देशिय संस्थेतर्फे श्री संतसेना महाराजांची ६५४ वी पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. श्री संतसेना महाराज की जय..! च्या जयघोषाने अवघा परिसर दुमदुमून गेला होता.

विणा पूजन, रघुनंदन भजनी मंडळ दहिटणेचे भजन, गोरज मुहूर्तावर श्री संत सेना महाराजांच्या मूर्तीचे पूजन, श्री हनुमान भजनी मंडळ बणजगोळचा हरिजागरासह धार्मिक कार्यक्रम पार पडले. शिवराज हडपद यांच्या हस्ते सेना महाराजांची मूर्ती स्थापना करण्यात आली. रक्तदान शिबिराचे उद्घाटन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांनी केले. याप्रसंगी ५१ जणांनी रक्तदान केले. श्री हनुमान भजनी मंडळ कुन्सावळी यांच्या गुलालाचे कीर्तन, गुलालाचा कार्यक्रम झाला.

यावेळी माजी नगरसेवक मीलन कल्याणशेट्टी, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, आरपीआय आठवले गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, बहुजन वंचित आघाडीचे चंद्रशेखर मडीखांबे, बंटी राठोड, लाला राठोड, महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजी जमदाडे, सोनार समाजाचे प्रदेश अध्यक्ष रविकिरण धर्माधिकारी, खेमू राठोड, डॉ. सतिश बिराजदार, प्रथमेश इंगळे, उद्योजक सिद्धराम टाके, नन्नु कोरबू, ज्योती जरीपटके, दीपक जरीपटके उपस्थित होते.

याप्रसंगी शहराध्यक्ष लक्ष्मण विभूते, उपाध्यक्ष राजेश कोरे, शहराध्यक्ष अरुण विभूते, पद्माकर डिग्गे, प्रभाकर सुरवसे, भागवत विभूते, सोमनाथ सुरवसे, महादेव भाले, शरण सुरवसे, श्रीशैल सुरवसे, प्रशांत विभूते, प्रविण राऊत, नरसिंग क्षीरसागर, व्यंकटेश विभूते, अनिल वाघमारे, शिवराज कोरे, सुमित डीग्गे, काशिनाथ विभूते, जगन्नाथ वाळके, दादा वाळके, हरी राऊत, संदीप राऊत, प्रवीण राऊत, महेश सुरवसे, अमर सुरवसे, आकाश सुरवसे, राजेंद्र सुरवसे, सचिन लोखंडे, शिवा विभूते, सचिन विभूते, संकेत विभूते, समर्थ विभूते, महिला तालुकाध्यक्षा अनुराधा सुरवसे, भाग्यश्री काळे, डॉ. प्रमिला वाघमारे, संध्या विभूते उपस्थित होते. सूत्रसंचालन सुभाष सुरवसे यांनी तर आभार शिवशरण सुरवसे यांनी मानले.



**नाभिक समाज सभामंडपासाठी २५ लाख निधी : आ. कल्याणशेट्टी**


आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी भ्रमणध्वनीद्वारे शुभसंदेश देताना नाभिक समाजाच्या सभा मंडपासाठी २५ लाख रुपये निधीची घोषणा केल्याची माहिती श्री संतसेना महाराज नाभिक समाज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सुदर्शन विभूते यांनी सांगितले.



### नाभिक समाजाचे प्रश्न लवकरच सोडवणार : आ. शहाजीबापू पाटील

**सांगोला, दि. ३१ ऑगसट-**

सांगोला शहरासह तालुक्यातील नाभिक समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्य देणार असल्याची ग्वाही आ. शहाजीबापू पाटील यांनी दिली. ते नाभिक समाजातर्फे आयोजित सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होते. आ. शहाजीबापू पाटील यांनी शहरातील संत सेना महाराज मंदिर येथे दुसरा मजला बांधकामासाठी ५० लाखाचा निधी दिल्याबद्दल नाभिक समाजातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना विधानसभा प्रमुख प्रा. संजय देशमुख, शहर संघटक आनंदा माने, एससी आघाडी तालुका प्रमुख दीपक ऐवळे, माजी नगरसेवक सोमेश यावलकर, सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब ठोकळे तसेच तालुक्यातील बहुसंख्य नाभिक समाज बांधव उपस्थित होते.



### पिलीव येथे विविध धार्मिक कार्यक्रम

**पिलीव, दि. ३१ ऑगस्ट-**

पिलीव येथे संत श्रेष्ठ शिरोमणी सेना महाराजांची पुण्यतिथी नाभिक समाज बांधवाच्या वतीने खडीच्या महादेव मंदिरालगत असणाऱ्या संत सेना महाराज समाज मंदिरात व भक्तिमय वातावरणात पार पडली. यावेळी संत शिरोमणी सेना महाराजांच्या जिवन चरित्रावर आधारित भजन व किर्तनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. हरिहरनंदन महाराजांना तबलावादक, पेटीवादक, टाळकरी, विणेकऱ्यांनी साथसंगत दिली. यावेळी संत सेना महाराज, विठ्ठल, तुकाराम महाराजांची आरती करुन व संत सेना महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन महाप्रसादाचे वाटप करणयात आले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्रावण मासानिमित्त श्री मुदगुलेश्वर मंदिरात फुलांची आरास

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ ऑगस्ट -**

तिर्थक्षेत्र तुळजापूरच्या घाटशिळ पायथ्याशी असणाऱ्या श्रीमुदगुलेश्वर महादेव मंदीरात श्रावण मास निमित्ताने मंदीर परिसरात आकर्षक अशा फुलांचा आकर्षक असा आरास करुन मंदीरात आकर्षक देखावा साकारला होता.

श्री मुद्गलेश्वर सेवा समिती तथा श्री मुद्गलेश्वर युवा प्रतिष्ठानतर्फे श्री मुद्गलेश्वरांची महापुजा करण्यात आल्यानंतर अन्नदान आयोजन केला होता. याचा पंधरा हजार अन्नदान महाप्रसादाचा लाभ घेतला.

याचे आयोजन श्री मुद्गलेश्वर सेवा समिती तथा श्री मुद्गलेश्वर युवा प्रतिष्ठान यांनी केले होते.





### संक्षिप्त वृत्त...



## कदेर तंटामुक्त अध्यक्षपदी महादेव साखरे, उपाध्यक्षपदी वैशाली जाधव

**कदेर, दि.३१ ऑगस्ट -**

उमरगा तालुक्यातील कदेर गावात ग्रामपंचायत कार्यालयामध्ये वार्षिक ग्राम सभा पार पडली. यामध्ये गावातील विविध विषयावर चर्चा करण्यात आल्या. गावातील रस्ते, गावातील शिवाजी महाराज चौकातील समस्या, लिंगायत दफनभूमी, दारूबंदी, गावातील अतिक्रमण, महिलांचा विविध सुविधा आदी विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी तंटामुक्त अध्यक्षपदी महादेव साखरे तर उपाध्यक्षपदी वैशाली जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. याप्रसंगी सरपंच सतीश जाधव, उपसरपंच राणी राठोड, ग्रामविकास अधिकारी राजपूत व्ही.जी, जाधव मीनाक्षी, प्रवीण जाधव, शाम चौधरी, विवेकानंद चौधरी, पी.डी. जाधव, सुनील पाटील, तलाठी सुमैय्या बागवान, गावातील नागरिक व महिला उपस्थित होते.



## मंगरूळ जिल्हा परिषद प्रशालेत सखी सावित्री व सुरक्षा समिती गठीत

**मंगरूळ, दि.३१ ऑगस्ट -**

बदलापूर येथे घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी राज्य सरकारच्या वतीने खबरदारी घेऊन जिल्हा परिषद शाळेत व महाविद्यालयात सखी सावित्री व विद्यार्थी सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली. त्याच अनुषंगाने शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांची संयुक्त बैठक घेऊन ३१ ऑगस्ट रोजी सखी सावित्री व विद्यार्थी सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली. या समितीत पोलीस पाटील, सरपंच, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, प्रतिष्ठित नागरिक व विद्यार्थी प्रतिनिधी यांची निवड करण्यात आली. यावेळी सरपंच विजयालक्ष्मी डोंगरे, लक्ष्मण माळी, आप्पासाहेब जेटीथोर, मनोज डोंगरे यांच्यासह पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राठोड यांनी केले तर सूत्रसंचालन वाघचौरे यांनी केले.



## सेवानिवृत्तीनिमित्त मुख्याध्यापक अशोक रोडगे यांचा सत्कार

**लोहारा, दि.३१ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील होळी येथील जि.प.प्रा. शाळेतील मुख्याध्यापक अशोक रोडगे सेवानिवृत्त झाल्याने दि.३१ ऑगस्ट रोजी होळी येथे ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उषा चव्हाण होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन सरपंच सरोजा बिराजदार, विनोद गायकवाड, शिक्षक सूर्यवंशी, माळी, वाघमारे, माने, स्वामी, मठपती आदी उपस्थित होते. कार्यक्रमास ग्रामस्थ उपस्थित होते.



## महाराष्ट्र राज्य तलाठी महासंघाचे एक दिवशीय कामबंद आंदोलन

**लोहारा, दि.३१ ऑगस्ट -**

आडगाव रेजे (ता. वसमत, जि. हिंगोली) येथील तलाठी संतोष पवार यांची तलाठी कार्यालयात निर्घृण हत्या केल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य तलाठी महासंघ लोहारा तालुका यांच्यावतीने दि.२९ ऑगस्ट रोजी एक दिवशीय लाक्षणिक काम बंद करुन आंदोलन करुन तहसीलदार काशिनाथ पाटील यांना निवेदन दिले. या घटनेचा निषेध करुन आंदोलनाला पाठींबा देऊन तहसीलच्या कर्मचाऱ्यांनी काळ्या फितु लावुन दिवसभर कामकाज केले. या निवेदनावर अध्यक्ष डी.एम. रेड्डी, उपाध्यक्ष एम.झेड. सय्यद, सचिव के.एन. पवार, कोषाध्यक्ष एस.जी. माळी, मंडळ अधिकारी वाजीद मनियार, मंडळ अधिकारी बी.एस. बरनाळे, अदिंच्या सह्या आहेत.

## घोळसगाव तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी संजय होळे

**जळकोट, दि.३१ ऑगस्ट -**

येथून जवळच असलेल्या घोळसगाव (ता. अक्कलकोट) येथील महात्मा गांधी गाव तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी संजय होळे यांची एकमताने निवड करण्यात आली. घोळसगाव ग्रामपंचायत ग्रामसभेत तंटामुक्त समिती अध्यक्ष निवडीसाठी चर्चा करण्यात आली. त्यानंतर संजय होळे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीनंतर ग्रामपंचायत कार्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला. या निवडीचे गावात स्वागत करण्यात आले आहे.

दादा... शेती, घरे जातय; आम्ही जगायाचे कसे! तुम्हीच सांगा?... महिलांनी मांडल्या दादांसमोर आपल्या व्यथा...

# मी सदैव तुमच्या पाठीशी; अन्याय होवु देणार नाही : आ. राणादादा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ ऑगस्ट -**

साहेब आमची रोटी जावुन आज आम्ही उघड्यावर येणार असल्यामुळे आम्हाच्यासाठी काही तरी करा असा टोहो तडवळा येथे रेल्वे बाधीत महिला, पुरुष, गोरगरीब वर्गातील मंडळींनी व शेतकरी वर्गाने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या समोर मांडला. यावेळी त्यांनी बाधीतशेत मंडळींसमोर बोलताना पाटील म्हणाले कि, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत, हे लक्षात ठेवा. तुम्हा बाधीतांना घरे मावेजा बाबतीत मी न्याय मिळवुन देईल, अशी ग्वाही यावेळी दिली.

बुधवार दि.२८ रोजी रात्री तडवळा येथील बाधीत शेतकऱ्यांच्या विनंतीवरुन आमदार राणाजगजितसिंह पाटील हे दाखल होताच यावेळी रस्त्यावरच गावच्या जेष्ट महिलांनी साहेब आम्ही उघड्यावर पडत असल्याने तुम्ही आम्हाला उघड्यावर पडू देवू नका, अशी मागणी केली. यावेळी एका विधवा महिला व्यथा मांडताना म्हणाली कि, साहेब मला तीन मुले आहेत.

माझे घर रेल्वे स्टेशनसाठी घेतलेल्या जागेत जाणार आहे. तर मला अवघे ७५० रुपये नुकसान भरपाई आली आहे, अशी व्यस्था मांडली. या भागात शंभरच्या आसपास घरे उठणार आहेत. त्यामुळे आम्ही आता कुठे जावे असा सवाल केला. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी साहेब येथे एकरी साठ ते सत्तर लाख रुपये भाव असताना अत्यल्प मावेजा दिला आहे. द्राक्ष शेती बागायत असताना हंगामी बागायत दाखवली आहे. अवार्डमध्ये अनेक चुका आहे. स्वतंत्र सातबारे असताना ज्वाँईट खात्यावर सामाईक खाते दाखवले आहेत. आमची रोजीरोटी जावुन आम्ही उघड्यावर येणार आहोत. त्यामुळे आमच्यासाठी काहीतर करा कारण प्रशासन चुकीच्या माहीती आधारे बाधीतांना अत्यल्प मावेजा देत आहे, असा आरोप यावेळी केला. यावेळी बाधीत ग्रामस्थ झोपडपट्टी धारक व शेतकऱ्यांनी दादांसमोर आपली गाऱ्हाणे मांडले. सर्वाचे एकुण घेतल्यानंतर या बाबतीत मी तुमच्या पाठीशी असेन व तुमच्यावर अन्याय होवू देणार आपल्या देशाचे पंतप्रधान हे शेतकरी गोरगरीबांवर अन्याय होवु नये याची काळजी घेतात, असे यावेळी स्पष्ट केले.



यावेळी विनोद गंगणे, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, नानासाहेब लोंढे, सरपंच कांबळे, उपसरपंच राजाभाऊ चंदनशिवे, दिंगबर सरक, लखन गुंड, मधुकर गुंड सह शेकडो ग्रामस्थ, शेतकरी उपस्थितीत होते.




**तेर :** धाराशिव तालुक्यातील तेर जवळील तेरणा धरणातील पाण्याचे जलपूजन आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाखा अभियंता धनंजय वरपे, निहाल काझी, उपसरपंच श्रीमंत फंड, नवनाथ नाईकवाडी, प्रविण साळुंके, रामा कोळी, जुनेद मोमीन, अजित कदम, नवनाथ पसारे, प्रतिक नाईकवाडी, इर्शाद मुलांनी व नागरिक उपस्थित होते.

## कळंब शहर 'डीजे' मुक्त करा; ज्येष्ठ नागरिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३१ ऑगस्ट -**

कळंब शहरातील ज्येष्ठ नागरिक व शहरवासीयांच्या वतीने कळंब शहर डीजे मुक्त करण्याची मागणी उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलिस अधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, कळंब शहरामध्ये ज्येष्ठ नागरिक यांना अनेक आजार आहेत. यामध्ये शुगर पेशंट, हृदय पेशंट, महिला व बालके यांना विविध आजार आहेत. शहरात होणाऱ्या अनेक कार्यक्रमात डी. जे. वाजवण्यात येत आहेत. त्यामुळे ध्वनिप्रदूषण होऊन आनेक नागरिकांना याचा त्रास होत आहे. त्यामुळे येणारे सर्व सण, उत्सव, नेत्यांचे वाढदिवस, लग्न जयंती यामध्ये सर्रास डीजेचा वापर होत आहे. त्यासाठी विविध संघटनेचे पदाधिकारी, पक्षाचे प्रमुख, कार्यकर्ते यांनी पारंपारिक वाद्य वाजवावीत व धार्मिक सोहळ्याचा आनंद सर्वांना मिळावा या बाबतीत आपल्या स्तरावर प्रमुख पदाधिकाऱ्यांना कळवुण राजकीय धार्मिक प्रमुखांना मार्गदर्शनपर सूचना कराव्यात व कायद्याचे पालन करण्याबाबत सूचना द्याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.



निवेदनावर प्रकाश भडंगे, हर्षद अंबुरे, किशोर वाघमारे, भास्कर सोनवणे, विलास मिटकरी, सतपाल बनसोडे, राहुल हौसलमल, सुनील ताटे, महावीर गायकवाड, प्रशांत रत्नाकर, हनुमंत पाटुळे, सुदर्शन शिंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## श्री छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड येथे विद्यार्थ्यांनी साकारली परसबाग

**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.३१ ऑगस्ट -**

भारत शिक्षण संस्था उमरगा, संचलित श्री छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड प्रशालेत इको फ्रेंडली क्लब आणि हरित सेनेच्या वतीने शाळेच्या २ गुंठे जमिनीवर वांगी, पालक, मेथी, चुका, मिरची, भेंडी, अशा विविध पालेभाज्या आणि फळ भाज्यांची लागवड करुन या परसबागेतील पालेभाज्या आणि फळभाज्यांचा इयत्ता ८ वी वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात याचे भाजीपाल्यांचा वापर करण्यात येणार आहे.

त्यामुळे सर्वच भाजीपाला सहजतेने उपलब्ध होणार असून विद्यार्थ्यांना सकस आणि पोषण आहार या माध्यमातून मिळणार आहे.

यावेळी राष्ट्रीय हरित सेनेचे सर्व विद्यार्थी, आणि इको क्लबच्या सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून सर्वांनी स्वकष्टाने ही परसबाग तयार केली आहे. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक मोरे जयवंत, राष्ट्रीय हरित सेनेचे करबस माळी, महेश सूर्यवंशी, जितेंद्र जाधव, नितीन राठोड, अश्विनी बिराजदार, नंदा वडदरे, अरविंद पाटील, प्रकाश मोरे यांचे सहकार्य लाभले.

ही सर्व रोपे कर्नाटक सिमावर्ती भागातून आणण्यात आले. सर्व प्रकारचे डोस आणि खत व फवारणी करण्यात आली. यासाठी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.



## भूम येथे कलावंत मेळाव्यास साहित्यिकांचा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.३१ ऑगस्ट -**

येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहामध्ये दि.३० रोजी मराठवाडा लोककला विकास मंडळ व वृद्ध साहित्यिक कलाकार संघटनेच्यावतीने लोक कलावंत मेळावा व संस्कृत कला महोत्सव लोककला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत तालुक्यातील मोठ्या प्रमाणात कलावंतांनी उपस्थिती लावली होती.

स्पर्धेच्या उद्घाटनासाठी उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, वारकरी साहित्य परिषदेच्या भूम तालुकाध्यक्ष मंदाबोराडे, वृद्ध कलाकार मानधन निवड समिती सदस्य शंकरराव खामकर, शशिकला गुंजाळ, लावणी कलाकार स्नेहा दुधाळ, गायत्री तिवारी यांचेसह अनेकांची उपस्थिती होती. या स्पर्धेतील भारुड, पोतराज, आराधी, भजनी मंडळाच्या गायकांनी चांगलाच सूर धरला होता. स्पर्धेतील उत्कृष्ठ प्रथम भजनी मंडळास ५ हजार, द्वितीय ३ हजार, तृतीय २ हजार रुपये व उत्कृष्ट आराधी मंडळसाठीही अशाच प्रकारची बक्षीसे देण्यात आली.

समारोप प्रसंगी स्वतंत्ररित्या बक्षिसांचे वाटप करण्यात आले. मराठवाडा लोककला विकास मंडळ व वृद्ध साहित्यिक कलाकार संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या लोककलावंत मेळावा, सांस्कृतिक कला महोत्सव स्पर्धेमध्ये आराधी प्रकारात आरसोली व अनिता काळे आराधी मंडळांनी तर भजन प्रकारात वीर गल्ली विठ्ठल रुक्मिणी व सोनगिरी मंडळाने विभागून प्रथम क्रमांक मिळवला,. त्यांना कार्यक्रमस्थळी बक्षीस घेऊन सन्मानित करण्यात आले.

र्यक्रमासाठी वृद्ध, ज्येष्ठ साहित्यिक कलाकार संघटनेचे पदाधिकारी व सर्जेराव इंदलकर, महादेव राजाराम जाधव, गुंजाळ महाराज यांनी परिश्रम घेतले.

## विलासपुर पांढरीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.३१ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील विलासपूर पांढरी या गावातील शालेय विद्यार्थ्यांसाठी श्रीमती कोंडाबाई पाटील व कै. गणपतराव पाटील यांच्या स्मरणार्थ वर्षभरात शालेय विद्यार्थ्यांनी केलेल्या उज्वल कामगिरी बद्दल पारितोषिक आणि चषक देवून गौरविण्यात आले.

या पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मारूती कार्ले तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य आर.टी. राठोड, अँड. मुरगे, प्रा. व्यंकटराव चिकटे, उपसरपंच अशोक जांभळे, पर्यवेक्षक एम.वाय. भोसले, डॉ. आदिती लोंखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास पोलीस पाटील सूर्यकांत पाटील, गजानन जायफळे, उन्मेष पाटील, किसन खोत, सिद्धेश्वर कार्ले, महादेव कार्ले, गहिनीनाथ बिराजदार, किसन जांभळे यांच्यासह गावातील नागरिक, शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

## श्री संत सेना महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.३१ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथे श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

विठ्ठल रुक्माई मंदिरात दोन दिवस धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम घेत श्री संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. दि.३० रोजी गुलाल व महाप्रसादाने सांगता झाली. बारा वाजता महाआरती, गुलाल व पुष्पवृष्टीने गुलाल सोहळा झाली.

यावेळी कार्यक्रमास गणेश अपुणे, रामचंद्र दिघे, संजय सावंत, अमोल अपुणे, मयूर गोरे, ज्ञानेश्वर पंडित, आबा पंडित, विनय अपुणे, रामभाऊ पंडित, अंकुश अपुणे, तेजस सावंत व भजनी मंडळ तसेच नाभिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्यु होम मिनिस्टर कार्यक्रमास महिलांचा उदंड प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ ऑगस्ट -**

महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे यांच्यावतीने तेर येथे आयोजित केलेल्या खास महिलांसाठी प्रसिद्ध सिनेअभिनेते क्रांती नाना मळेगावकर व टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांचा न्यु होम मिनिस्टर या कार्यक्रमाला महिलांचा तुफान प्रतिसाद मिळाला. त्यामुळे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या होमग्राऊंडवर अशोक जगदाळे यांची दमदार इंट्री झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळत सुरु आहे.

सध्या महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे यांच्याकडुन विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरु आहे. यावेळेस कसल्याही परीस्थितीत तुळजापुर विधानसभा मतदार संघात विजय मिळवायचाच या उद्देशाने अशोक जगदाळे यांच्याकडुन विधानसभा निवडणुकीची मोर्चेबांधणी सुरु आहे. जुना तुळजापुर विधानसभा मतदार संघातील गावे पिंजुन काढल्यानंतर आता अशोक जगदाळे यांनी त्या ७२ गावांवर आपले लक्ष केंद्रीत केले आहे.

सध्या त्यांनी खास महिलांसाठी आयोजित केलेला प्रसिद्ध सिनेअभिनेते क्रांती नाना मळेगावकर व टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांचा न्यु होम मिनिस्टर हा कार्यक्रम या ७२ गावांमध्ये सुरु आहे. बेंबळी आणि तेर याठिकाणी हा न्यु होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे प्रयोग झाले आहेत. बेंबळी आणि तेर येथील दोन्ही कार्यक्रमांना महिलांचा तुफान प्रतिसाद मिळाला आहे. तेर येथील कार्यक्रमाला तर महिलांचा उदंड प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे अशोक जगदाळे यांचा विधानसभा निवडणुकीत विजयी होण्याचा कॉन्फिडन्स आणखी वाढला आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे तेर हे मुळ गाव आहे. त्यांच्याच गावात अशोक जगदाळे यांनी खास महिलांसाठी न्यु होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन करून दमदार इंट्री केली आहे. या कार्यक्रमाला तेर येथील महिलांचा तुफान प्रतिसाद मिळाला.

## संक्षिप्त वृत्त...



### परंड्यात संत सेना महाराजांची पुण्यतिथी साजरी

**परंडा, दि.३१ ऑगस्ट -**

शहरातील जय भवानी चौक, काशीद गल्ली येथे नाभिक समाजाच्यावतीने दि.३० रोजी संत सेना महाराजांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी समाजप्रबोधनकार बाळासाहेब घोगरे व डॉ. आनंद मोरे यांचा संत सेना महाराजांच्या जीवनचरित्रावर व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. पुण्यतिथी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. दुपारी १२ वाजता संत सेना महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करुन पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास नाभिक समाजातील महाराष्ट्र चँपीयन आप्पा काशीद, दिनकर काशीद, युवा नाभिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष नागेश काशीद, प्रकाश काशीद, संतोष भालेकर, विशाल काशीद, सुरेश काशीद, ग्रामसेवक मनोज काशीद, जयंत काशीद, संजय काशीद, नागेश यादव, नागेश डाके, प्रितम डाके, सनी काशीद, रमेश काशीद, राहुल काशीद, गणेश काशीद, सचिन काशीद, प्रभु वाघमारे, अकुंश जमदाडे, बाबी काशीद, शुभम काशीद, ओंकार काशीद आदिसह नाभिक समाजातील महिलावर्ग, समाजबांधवाची मोठी उपस्थिती होती.

### प्रश्नमंजुषा स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**जळकोट, दि.३१ ऑगस्ट -**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ अंतर्गत असलेल्या जळकोट येथील शिवाजी चौकातील श्री कॉम्प्युटर्सच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी स्वातंत्र्य दिनानिमित्त घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेचे विविध शाळेत पारितोषिक वितरण करण्यात आले. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ आयोजित श्री. कॉम्प्युटरतर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रश्नमंजुषा परीक्षा घेण्यात आली. सदरील ही परीक्षा २० मार्काची होती. वीस मिनिटे वेळ विद्यार्थ्यांना देण्यात आला होता. परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सहभाग प्रमाणपत्र व शाळेतून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकासाठी विद्यार्थ्याला मेडल पारितोषक स्वरूपात देण्यात आले. पार्वती प्रशालेतील २०० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला होता. शाळेच्या मुख्याध्यापिका लता सोमवंशी, शिक्षक अभिमन्यू कदम, बसवराज मडोळे, विजय मोरे, गुड, कदम, तळेकर तसेच जिल्हा परिषद जळकोट येथेही परीक्षा घेण्यात आली.



### विद्यार्थ्यांचे वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये सुयश

**मंगरूळ, दि.३१ ऑगस्ट -**

जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्रशाला मंगरूळ ता. तुळजापूर येथील विद्यार्थ्यांनी १७ वर्षाखालील विविध वजनी गटांमध्ये नेत्रदीपक यश संपादन केले असून त्यांची नांदेड येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्रियंका विजय साळुंखे हिने ४९ किलो वजनी गटात प्रथम तर वसुधा रामेश्वर हजारे हिने ५९ किलो वजनी प्रथम व मुलांमध्ये अथर्व ज्ञानेश्वर पाटील याने ६७ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवलेला असून श्रेयस संजय कोरेकर याने ६१ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक पटकावला. प्रथम क्रमांक आलेल्या तीन विद्यार्थ्यांची निवड नांदेड येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी झालेली आहे. या सर्व स्पर्धकांना प्रशालेचे मुख्याध्यापक शिवाजी राठोड, सहशिक्षक फुगारे, तनपुरे, राऊत, वाघमोडे, आशिष साठे, सरडे, वाघचौरे, दरेकर तसेच पोतदार व कापसे यांचे मार्गदर्शन लाभले.



### जि.प. प्रशालेचा व्हॉलीबॉल संघ विजयी

**शिराढोण, दि.३१ ऑगस्ट -**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर क्रीडा संकुल डिकसळ (ता. कळंब) येथे तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत पीएमश्री भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय आदर्श जि.प. प्रशाला शिराढोण येथील १७ वर्षे वयोगटातील मुलांचा संघ प्रथम क्रमांकाने विजयी झाला. जिल्हास्तरावर निवड झाल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सुनील अहिरे, सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, पालक, गावातील नागरिकांनी सर्व टीमचे अभिनंदन केले.

# नाभिक समाज भक्तनिवास लवकरच उभारू : आ. राणाजगजितसिंह पाटील



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ ऑगस्ट-**

नाभिक समाज हा सामाजिक बांधिलकीसह सेवाभाव जपणारा असून तुळजाई नगरीत कुंभार गल्लीतील नियोजित जागेवर लवकरच सुसज्ज असे भक्तनिवास उभारून राज्यभरातील नाभिक बांधवांसाठी हक्काची व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याने मत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले.

तसेच गतवर्षी १० लाख आणि आता यावर्षी १५ लाख रुपये आमदार निधीतून याकामी उपलब्ध देणार असा आशावाद आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी समजभूषण पुरस्कार प्राप्त शहाजी कावरे व अनिल आगलावे यांचा आमदार पाटील यांनी सत्कार केला.

तुळजाई नगरीत श्री संत शिरोमणी सेना महाराज पुण्यतिथी सोहळा निमित्ताने नाभिक समजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारासह नाभिक समाजरत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

कुंभार गल्ली कार पार्किंग शेजारील श्री संत सेना महाराज सांस्कृतिक सभागृहाच्या नियोजित जागेवर गुरुवार २९ रोजी सायंकाळी ६ वाजता महंत तुकोजी बुवा, महंत मावजीनाथ बाबा यांच्या प्रमुख उपस्थितीत सेना महाराज मुर्ती प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

शुक्रवार ३० रोजी अनिकेत राऊत महाराज यांची काल्याचे किर्तनसेवा संपन्न झाली, दुपारी महाप्रसादानंतर सायंकाळी ४ वाजता अमर चोपदार, श्रीकांत कदम, सचिन ताकमोघे यांच्या हस्ते आरतीने पुण्यतिथी सोहळ्याची सांगता झाली.

याप्रसंगी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, अशोक जगदाळे, धीरज पाटील, सचिन रोचकरी, विनोद गंगणे, आनंद कंदले, अभिजित चव्हाण, ऋषीकेश मगर, अमर चोपदार, अविनाश गंगणे, राम चोपदार, अमर हंगरगेकर, विजय कंदले, अमोल कुतवळ, नरेश अमृतराव, अजित परमेश्वर, विशाल रोचकरी आदींसह नाभिक बांधवांची उपस्थिती होती.

**नाभिक समाजभूषण पुरस्काराचे मानकरी...**

पत्रकार अनिल आगलावे, नायब तहसीलदार मनोरमा प्रकाश गाढे, शिक्षण विस्तार अधिकारी मल्लिनाथ काळे, निवृत्त बँक कर्मचारी शहाजी बडोदकर यांना यंदाचा नाभिक समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## लहू कदम मित्र परिवारातर्फे विलास राठोड यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.३१ ऑगस्ट-**

जळकोट येथील सामाजिक कार्यकर्ते श्री. लहूजी कदम मित्र परिवारातर्फे भाजपचे तालुका सरचिटणीस व आलियाबाद ग्रामपंचायत माजी सदस्य श्री. विलास राठोड यांची संत सेवालाल महाराज तांडा सुधार समृद्धी योजनेच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीवर अशासकीय सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

## श्री मल्लिकार्जून मंदिरात शरण चरित्र अमृता कार्यक्रमाची उत्साहात सांगता

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ ऑगस्ट-**

पवित्र श्रावण मासा निमित्त नळदुर्ग येथील प्रसिद्ध श्री मल्लिकार्जुन मंदिरामध्ये एक महिनाभर सुरु असलेल्या शरण चरीत्र अमृता या कार्यक्रमाची समाप्ती दि.३० ऑगस्ट रोजी मोठया उत्साहात व आनंदात करण्यात आली.

श्री मल्लिकार्जुन मंदिरामध्ये पवित्र श्रावण मासा निमित्त दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत श्री शिवबसव देवरु यांचे शरण चरीत्र अमृता या विषयावर प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. या प्रवचन कार्यक्रमास नळदुर्ग शहरातील वीरशैव बंधु भगिनी मोठया संख्येने उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढविण्याचे काम केले.

महिनाभर सुरु असलेल्या या प्रवचन कार्यक्रमाची समाप्ती दि.३० ऑगस्ट रोजी मल्लिकार्जुन मंदिरामध्ये मोठया उत्साहात व आनंदात करण्यात आली. यावेळी श्री शिवलिंगेश्वर मठाचे मठाधीपती श्री ष. ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी, श्री प्रभु देवरु, श्री बसव देवरु व शामा प्रसाद महाराज या सर्वांचे आशिर्वचन झाले.

या कार्यक्रमास वीरशैव बंधु भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर महाप्रसाद होऊन कार्यक्रमाची समाप्ती करण्यात आली.

## व्यापारी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी लक्ष्मीकांत जाधव, सचिवपदी वडगावकर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑगस्ट-**

कॉन्फरेडेशन ऑफ ऑल इंडिया आणि महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स न्ड ग्रिकल्चर संलग्नित असलेल्या धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघाच्या अध्यक्षपदी लक्ष्मीकांत जाधव यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सचिवपदी महेश वडगावकर,संघटन सचिव अभिलाष लोमटे यांची तर राज्य सचिवपदी संजय मोदाणी, उपाध्यक्षपदी संजय मंत्री यांची एकमताने निवड झाली आहे.

कॉन्फरेडेशन ऑफ ऑल इंडिया संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.एस. भरतीया, राष्ट्रीय महामंत्री खासदार प्रवीण खंडेलवाल, महाराष्ट्राचे अध्यक्ष सचिन निवंगुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्यात शुक्रवारी (दि.३०) व्यापारी महासंघाची राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत व्यापाऱ्यांच्या वेगवेगळ्या समस्यांबद्दल व्यापक चर्चा करण्यात आली.

त्यानंतर प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत धाराशिव जिल्ह्याच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यानुसार लक्ष्मीकांत जाधव यांची धाराशिव जिल्हा व्यापारी महासंघाचे नूतन जिल्हाध्यक्ष म्हणून एकमताने निवड जाहीर करण्यात आली. तसेच महेश वडगावकर यांची जिल्हा सचिव, अभिलाष लोमटे यांची संघटन सचिव म्हणून निवड करण्यात आली. संजय मोदाणी यांची महाराष्ट्र सचिवपदी तर संजय मंत्री यांची महाराष्ट्र उपाध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली.

यावेळी संजय मोदाणी, राजाभाऊ काळे, कपिल शर्मा, संग्राम शिंदे, अभिजीत थिटे, मनोज कोचेटा, शामभाऊ भन्साळी, शैलेश मेहता, धनंजय जेवळीकर, नितीन फंड, नितीन भन्साळी, अमित मोदाणी, प्रशांत कोनारडे, मंगेश वैजापूरे, संतोष कुलकर्णी, अझहर खान, बापू शिंगाडे, जगदीश मोदाणी, विशाल थोरात, शाम बजाज यांची उपस्थिती होती.

## डेंग्यु रोगास प्रतीबंधात्मक उपाययोजना तात्काळ करा : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ ऑगस्ट-**

धाराशिव जिल्हयातील डेंग्यु रोगाचा प्रसार मोठया प्रमाणात झाला असल्याकारणाने रुग्णांचे प्रमाण जिल्हयाभरात दिवसेंदिवस वाढत चालले आहे. डेंग्यु व डेंग्यु सदृष्य आजारामुळे जिल्हयातील अनेक नागरीक सातत्याने आजारी पडत आहेत. या साथ रोगास प्रतीबंधात्मक उपाययोजना करुन अटकाव करणे गरजेचे आहे.

या संदर्भाने खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी जिल्हाधिकारी धाराशिव यांना धाराशिव जिल्हयातील डेंग्यु रोगास प्रतीबंधात्मक उपाययोजना तात्काळ करणेबाबत पत्राव्दारे सुचीत केले आहे.

या पार्श्वभुमीवर उमरगा तालुक्यातील ओम साळुंके व सत्यजित देशमुख या दोन शालेय विद्यार्थ्यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे.

धाराशिव जिल्हयातील डेंग्यु साथ रोगास प्रतीबंधात्मक उपाय योजना करणेबाबत मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, धाराशिव व जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रुग्णालय धाराशिव यांना प्रतीबंधात्मक उपाययोजना करुन शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी व गावोगावी औषध फवारणी तसेच इतर प्रतीबंधात्मक उपाययोजना करणेबाबत पत्राव्दारे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्याकडून कळविण्यात आले आहे.

## अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सास्तुर येथे मिरवणुक



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३१ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील सास्तुर येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणुक काढण्यात आली.

यावेळी साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन भाजपाचे युवा नेते नऊस राहुल पाटील व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष श्रीनिवास जाधव यांच्या हस्ते करुन साठे समाज मंदिरापासून मिरवणुकीत सुरुवात सुरुवात करण्यात आली. यावेळी गरीब होतकरू विद्यार्थ्यांना युवा नेते नऊस राहुल पाटील यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी किसन सरवदे, राहुल सरवदे, अजय जाधव, विजय जाधव, लालू सरवदे, लक्ष्मण चिमुकले, बालाजी चिमुकले, राजू सरवदे, छगन सरवदे, राजू साठे, बबन शिंदे, आकाश चिमकुले, शिवाजी चिमुकले, माधव गायकवाड, दत्ता गायकवाड, आशिष वाघमारे, मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समाज बांधव उपस्थित होता.

## जल संजीवनी प्रकल्पाकडून मत्स्यपालनासाठी प्रोत्साहन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३१ ऑगस्ट-**

युनायटेड वे मुंबई संस्थेच्या जल संजीवनी प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्यांना मत्स्यपालनासाठी प्रोत्साहन म्हणून मत्स्यबीज आणि खाद्य वाटप करण्यात आले. प्रकल्प कार्यक्षेत्रातील ६ शेतकऱ्यांना याबाबतचे सहाय्य करण्यात आले आहे. या सहा शेतकऱ्यांना या आधी शेततळे आणि अस्तरीकरणासाठी ही प्रकल्पाकडून अर्थसहाय्य करण्यात आले आहे. मत्स्यपालनासाठी लागणारे सर्व मार्गदर्शन जल संजीवनी टीमकडून या शेतकऱ्यांना देण्यात आले आहे.

संशोधनात्मक असलेला हा प्रकल्प लोहारा तालुक्यातील मार्डी, नागराळ, उंडरगाव, हिप्परगारवा तर तुळजापूर तालुक्यातील कार्ला आणि वानेगाव या गावांमध्ये सुरू आहे. हवामान आधारित शेती बरोबरच शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पादन स्त्रोत निर्माण व्हावा या अनुषंगाने जल संजीवनी प्रकल्पा अंतर्गत मत्स्यपालनासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे.




संशोधनावर आधारित असलेल्या जल संजीवनी प्रकल्पा अंतर्गत पुर्नजीवी शेती, शून्य किंवा अल्प मशागत, सेंद्रीय शेती आदि बाबीवर मार्गदर्शन आणि अर्थसहाय्य करण्यात येत आहे.

जल संजीवनी कृषीतज्ञ टीम शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करीत असून अभ्यास भेटी, प्रशिक्षण यामुळे

शेतकरी आपल्या बांधावर सेंद्रिय निविष्टा तयार करून प्रकल्पामध्ये सक्रीय सहभाग घेत आहे.

# उमरगा-लोहारा भागातील उगवता तारा : ॲड. शीतल चव्हाण

समाजातून अनेक तरुण नेतृत्व म्हणून पुढे येताना आपण पाहतो. पण यातील बहुतांश तरुण हे आमदार, खासदार, मंत्री अशा प्रस्थापित कुटुंबातून असतात. सर्वसामान्य कुटुंबातील तरुण शिक्षण, नोकरी, लग्न, प्रपंच अशा चक्रात अडकलेला असताना प्रस्थापित कुटुंबातील तरुण क्रिकेट टोर्नामेंट्स, बॅनरबाजी, वाढदिवसाचे इव्हेंट्स, दानधर्म अशा माध्यमातून नेतृत्व म्हणून झळकतात असे सर्वसाधारण चित्र सामान्यत: दिसून येते. पण मागास समजल्या गेलेल्या मराठवाड्यातील उमरगा-लोहारा परिसरात ॲड. शीतल चव्हाण या तरुणाने या परिस्थितीला वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व या तिन्ही पातळ्यांवर सक्षम कार्य करुन अपवाद निर्माण केलेला दिसून येतो.

सध्याच्या युगात तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे झुकलेली आहे. मराठवाड्यातील लातुर-धाराशिव परिसरातील तरुणांमध्ये तंबाखू, सुपारी खाण्याचे व्यसन खुप मोठ्या प्रमाणावर जडले आहे. त्यातल्या त्यात धाराशिव जिल्ह्यात उमरगा तालुक्यातील गाव, वाड्या-वस्त्या व गल्ली-बोळांमध्ये किमान दोन-तीन पानटपरी तेजीत असलेल्या दिसून येतील. या व्यसनांध पानटपरीला छेद देण्याच्या उद्देशाने उमरगा तालुक्यातील एका युवकाने 'पान टपरी नव्हे, ज्ञान टपरी' असे ब्रीद घेवून वाचनटपरी उभारण्याचा संकल्प केला हा संकल्प पुर्णत्वास नेऊन वाचन टपरी ही संकल्पना सत्यात उतरवली. या संकल्पनेला सत्यात उतरवल्याने राज्यभरात चर्चेचा विषय झालेल्या तरुणाचे नाव आहे. ॲड. शितल चव्हाण...!



जडणघडण व्यवसायाने वकील असलेल्या ॲड. शितल चव्हाण यांचा जन्म २ एप्रिल १९८६ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड या शहरात झाला. त्यांचे मुळ गाव उमरगा तालुक्यातील मुळज हे असून त्यांचे वडील सिल्लोड येथील यशवंत महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते. वडीलांचे छत्र वयाच्या तिसऱ्या वर्षी गमावल्याने त्यांना आजोळी म्हणजेच उमरगा तालुक्यातील माडज या गावी रहायला यावे लागले. आईचे वडील कॉ. रामराव गायकवाड हे हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक होते. ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते आणि ग्रामीण भागात सहकाराचे धोरण राबविण्यासह शेतकरी, कष्टकऱ्यांसाठी लढणारे झुंजार नेते होते. आजोबांच्या कम्युनिस्टवादी विचारांचा प्रभाव बालवयातच शीतलवर पडला. आजही डाव्या-पुरोगामी विचारांचा प्रभाव त्यांच्या लिखाण, वक्तृत्व आणि कार्यातून ठळकपणे जाणवतो तो बालवयात झालेल्या आजोबांच्या संस्कारामूळे आणि पुढे वाचनाच्या माध्यमातून त्यांनी या संस्काराला विकसित केल्यामूळे वडिलांच्या निधनामूळे दोन वर्ष आजोळी राहिल्यानंतर आपल्या मुलांना चांगले शिक्षण देता यावे या हेतूने शीतल यांच्या आईने तिन्ही भावंडांना उमरगा शहरात आणले. तिथे वडिलांनी अर्धवट बांधलेल्या घराचे काम आईने पूर्ण केले व त्या घरात हे कुटुंब राहू लागले. त्यांच्या कुटूंबाला त्यांच्या आजोबाचा खुप मोठा आधार होता. परंतू शीतल पाचवीला असताना आजोबांचे म्हणजेच आईचे वडील स्वातंत्र्यसैनिक कॉ. रामराव गायकवाड यांचे छत्रही त्यांच्या निधनामूळे हरवले. ॲड. शितल चव्हाण यांचे बालवाडी ते तिसरी पर्यंतचे शिक्षण उमरगा शहरातील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयात झाले. त्यानंतरचे शिक्षण उमरगा शहरातील श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या आदर्श विद्यालयात झाले. आदर्श विद्यालयात त्यावेळी काही शिक्षक अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ मोठ्या जोमाने चालवित होते. पुस्तकांच्या रुपानेही या चळवळीमधून जनजागृती होत होती. शीतल सहावीत असताना या चळवळीतील वैज्ञानिक जाणीवा प्रकल्पांतर्गत काही पुस्तिका त्यांनी वाचल्या आणि तिथूनच वाचण्याची गोडी लागली. शाळेत नाटके, पथनाट्ये, वक्तृत्व स्पर्धा यामध्ये शीतल हिरीरीने सहभाग घेत असत. शाळेतल्या वाचनालयातील पुस्तके घेवून, ती वाचून स्वत:च भाषणे लिहित असत. नववी, दहावीला असताना साहीत्याची गोडी वाढत गेली. स्वतः कविता लिहणे, प्रवास वर्णन लिहणे, पथनाट्ये लिहिणे यातून साहीत्य लिहण्याचा छंद लागला. दहावीनंतर शीतल यांचा वाचनाचा वेग वाढला, दिवसेंदिवस वाचनाची भुक वाढू लागली. नवनवीन पुस्तकांचा शोध घेणे सुरु झाले आणि वाचनाची सवय वृध्दिंगत होत गेली. मराठा सेवा संघ, गुरु रविदास सत्यशोधक समाज यांच्या कार्यक्रमांना शीतल जावू लागले. फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचे साहित्य वाचण्यावरचा भर वाढला. आजोबा कम्युनिस्टवादी विचारसरणीचे होते, सहाजिकच त्यांच्या विचाराचा प्रभाव असल्याने कम्युनिस्ट पक्षाचे कार्यालय शोधले आणि ऑल इंडिया स्टुडन्ट फेडरेशन या विद्यार्थी संघटनेत शीतलने कुमार वयात दोन वर्ष काम केले. अनेक विद्यार्थी आंदोलनांत आणि उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवला. ११ वी व १२ वीचे शिक्षण उमरगा शहरातील भारत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात घेतले. विज्ञान शाखेत असूनही सामाजिक कार्याची, वाचनाची ओढ काही कमी होत नव्हती. त्यामुळे १२ वी नंतर समाजाशी, कायदे निर्मितीच्या प्रक्रियेशी संबंधित असलेले वकीलीचे शिक्षण घेण्याचे ठरवले. 'लॉ' चे शिक्षण घेण्यासाठी थेट पुणे गाठले. पुणे हे शिक्षणाचे आणि सांस्कृतिचे माहेरघर असलेले शहर असल्याने सहाजिकच पुण्यातील साहित्य, कला व चळवळ या क्षेत्रांशी निगडीत व्यक्तींच्या गाठी-भेटी वाढत गेल्या. पुण्यात असतानाही महाविद्यालयीन जीवनात वाचनाची ओढ होतीच. स्वत:ला केवळ वाचनापुरते मर्यादित न ठेवता व्यक्त होण्यावरही शीतल यांनी भर दिला. लिखाण, अभिनय, वक्तृत्व याशी संबंधित विविध स्पर्धामध्ये सहभागी होत त्या यशस्वीरीत्या पार पाडल्या. डाव्या चळवळीतील लेखिका सुलभाताई ब्रह्मे यांच्याशी सातत्याने संपर्कात राहिल्याने महाविद्यालयीन काळातही कविता आणि स्फूट लिखाण केले. सन २००९ साली 'एल.एल.बी' चे शिक्षण पुर्ण केले. पुढे 'ज्युनिअरशीप' करीतच 'एल.एल.एम' चे शिक्षण पुर्ण केले. ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनच्या माध्यमातून सामजिक कार्य, आंदोलने शीतल चव्हाण यांचे सामाजिक कार्य आणि वाचनालये या निमित्ताने अनेक लोक त्यांच्याशी निस्वार्थ भावनेने जोडले गेले. या सर्वांनी एकत्र येवून ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशन ही संस्था स्थापन केली. सत्यनारायण जाधव, व्यंकट ऊर्फ राजू भालेराव, किशोर औरादे, करीम शेख, राजू बटगिरे, ॲड. ख्वाजा शेख, धानय्या स्वामी, प्रदिप चौधरी, माधव ऊर्फ दादा माने, किशोर बसगुंडे, बबिता मदने, अनुराधा पाटील, शशी पाटील, संतोष चव्हाण, माधव चव्हाण, संगिता सुर्यवंशी, रवी सांगवे, निसार औटी, विजय चितली, सिद्राम जमादार, प्रविण वडगाव, सुरज पाटील अशी समाजातील अनेक सुज्ञ मंडळी शीतल चव्हाण यांच्या विचार व कार्याने प्रभावित होवून त्यांच्यासोबत सक्रियपणे कार्यरत आहे. प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वाचनालयाच्या माध्यमातून वाचन संस्कृती रुजवण्याचे तर ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक विषयांना वाचा फोडण्याचे काम उमरगा-लोहारा परिसरात अविरतपणे सुरु आहे.

उमरगा-लोहारा परिसरातील वीज, पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, रोजगार, शिक्षण अशा सर्व विषयांवर फाऊंडेशनने आजवर भरीव कार्य केलेले आहे.

... शब्दांकन ...
**आकाश पोतदार**
उमरगा तालुका प्रतिनिधी : दै. तरूण भारत

# सरकारच्या कल्याणकारी योजना आणि अभूतपूर्व विकासकामामुळे किनवट मतदारसंघात पुन्हा कमळच फुलणार

## आ. भीमराव केराम यांचा आत्मविश्वास

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, ३१ ऑगस्ट -**

किनवट विधानसभेचे कार्यकुशल आमदार भीमराव केराम यांनी मागील दोनच वर्षाच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांना प्रभावित होऊन किनवट माहूर तालुक्यातील विविध पक्षातील प्रमुख पदाधिकारी तसेच ग्रामीण भागातील कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने भारतीय जनता पक्षाशी जुडताना दिसत असून या मतदारसंघातील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले ग्रामीण रस्ते, पूल, सिंचन तसेच पायाभूत विकासाची काम कायमस्वरूपी मार्गी लागल्यामुळे विकास कामाच्या जोरावर पुन्हा एकदा या मतदारसंघात कमळच फुलणार अशी चर्चा सर्वसामान्य जनतेतून सुरु आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने किनवट मतदार संघात भारतीय जनता पक्षाने जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली आहे. किनवट माहूर तालुक्यात वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले ग्रामीण रस्ते,महत्त्वाचे पूल,गावांतर्गत सिमेंट रस्ते नाल्या समाज मंदिर, उच्चपातळी बांधाऱ्याच्या माध्यमातून शेतीसिंचन, आरोग्य आदी मूलभूत कामे आ भीमराव केराम यांनी अवघ्या दोनच वर्षात मार्गी लावली आहेत. देवस्थान, मंदिरे ,परिसराचा विकास करून त्यांनी पर्यटणाला मोठ्या प्रमाणात चालना दिली आहे.किनवट शहरातील महापुरुषांचे नवीन पुतळे उभारणी व सुशोभीकरनासाठी कोट्यावधीरु चा निधी खेचून आणला. बाजारपेठ व उद्योगवाढ करण्याच्या हेतूने त्यांनी ग्रामीण भागातील जवळपास सर्वच रस्ते चकाचक केले असून रस्त्यावरील छोटे मोठे पूल ठराविक वेळेत पूर्ण झाल्याने शालेय विद्यार्थी व नागरिकांची मोठी सोय झाली आहे. आ भीमराव केराम यांनी त्यांच्या स्थानिक विकास निधीतून किनवट माहूर तालुक्यातील गाव खेड्यात व तांड्यात सिमेंटरस्ते नाल्या समाज मंदिर, शाळा मंदिर परिसरात पेवर ब्लॉक करून ग्रामीण भागाचा कायापालट केला आहे.सर्वांगीण विकास कामामुळे ग्रामीण भागातील जनतेमध्ये भाजपा सरकार बद्दल प्रचंड सहानुभूती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे केंद्र व राज्य सरकारने लागू केलेल्या योजना सर्वच समाज घटकातील गरजू व पात्र नागरिक महिलांपर्यंत पोहचल्याने विविध पक्षातील नेते, कार्यकर्ते व सामान्य नागरिक भाजपासी जुडताना दिसत आहेत. उज्वला गॅस योजना शेतकरी सन्मान निधी तसेच लाडकी बहीण सारख्या महत्वकांक्षी योजना शेतकरी, मजूरदार कामगार व दुर्बल घटकातील महिलासाठी वरदान ठरल्या आहेत. मागच्या दोन वर्षाच्या कार्यकाळात किनवट माहूर तालुक्यात झालेली विकास कामे आणि केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनामुळे पुन्हा एकदा या मतदारसंघात कमळच फुलणार आहे असा आशावाद आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केला असून विकासकामाच्या जोरावर विजय आपलाच आहे असे स्पष्ट करत त्यांनी माहूर येथील पक्षाच्या विस्तारित अधिवेशनात आगामी विधानसभा निवडणूकिचे रनसिंग फुंकले आहे.



# राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या समवेत होणार कॉम्रेड उज्वला पडलवार यांची संस्मरणीय भेट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३१ ऑगस्ट -**

महिला सबलीकरणासाठी गेल्या अनेक वर्षापासून भरीव योगदान देणाऱ्या महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील २५ महिलांचा राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार असून राष्ट्रपती सोबत संस्मरणीय भेटीच्या सोहळ्यात नांदेडच्या कॉ. उज्वला पडलवार यांचा समावेश करण्यात आला आहे . दिनांक ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी मुंबई येथील राजभवनात हा दिमाखदार सोहळा पार पडणार असल्याची माहिती लोकमत सखी मंचच्या वतीने देण्यात आली आहे .



कष्टकरी ,शेतकरी ,आशा वर्कर, गटप्रवर्तक, घरकामगार ,असंघटित कामगार महिलांच्या न्याय हक्कासाठी गेल्या एक दशकावून अधिक काळ संघर्ष करणाऱ्या कॉम्रेड उज्वला पडलवार यांच्या कार्याची पावती म्हणून दैनिक लोकमत संखी मंचच्या वतीने महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मूर्मु यांच्या हस्ते दिनांक ३ सप्टेंबर रोजी गौरव करण्यात येणार आहे . राज्यातील महिलांच्या सबलीकरणासाठी आणि सशक्तीकरणासाठी योगदान देणाऱ्या गोवा आणि महाराष्ट्र राज्यातील केवळ २५ महिलांचाच सन्मान करण्यात येणार असून यात कॉम्रेड उज्वला पडलवार यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे कष्टकरी, शोषित, पीडित , वंचितांच्या न्याय हक्कासाठी गाळलेल्या घामाचा सुगंध थेट आता राजभवना पर्यंत पोहोचणार आहे. त्यामुळे या निवडीबद्दल कॉम्रेड उज्वला पडलवार यांचे विविध क्षेत्रातील मान्यवर आणि ज्यांच्यासाठी त्यांनी कष्ट उपसले त्या सर्व कष्टकरी महिला , असंघटित कामगार महिलांकडून अभिनंदन होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### वाढदिवसानिमित्त वाचनालयास ग्रंथ भेट

**नांदेड**-ज्येष्ठ पत्रकार आनंद कल्याणकर यांनी आपल्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त नायगाव तालुक्यातील बरबडा इथल्या इंदिरा सार्वजनिक वाचनालयास ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम आणि डॉ. सुरेश सावंत यांच्या हस्ते ६२ ग्रंथ भेट दिले आहेत. दत्त प्रभू प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक महेश शिवाजीराव धर्माधिकारी यांनी यांनी ते स्वीकारले. पत्रकार आनंद कल्याणकर यांच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे कौतुक मित्र परिवाराने केले आहे.कल्याणकर यांनी यापूर्वी राजर्षी शाहू विद्यालय, वसंतनगर आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी हायस्कूल, तरोडा बुद्रुक या शाळांना ग्रंथ भेट म्हणून दिले आहेत. यावेळी दिगंबरराव क्षीरसागर, साहित्यिक डॉ. भगवान अंजनीकर, पत्रकार पंढरीनाथ बोकारे, बालाजी पवार, महावीर दुट्टे, कानोले, सुरनर, विवेक मोरे, महाजन आदी उपस्थित होते.

### हाणेगाव ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभा संपन्न ; तंटामुक्ती अध्यक्षपदी योगेश देशमुख

**हाणेगाव**-हाणेगाव येथे आज दि.३१ रोजी ग्रामसचीवालयात ग्रामसभा आयोजीत करण्यात आली होती यावेळी अध्यक्षस्थानी सरपंच सौ. शारदादेवी शंकराराव राठोड उपसरपंच मुजीप चमकुडे ग्रामविकास अधीकारी अमोलकुमार जाधव ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य उपस्थीत होते. यावेळी गावातील असंख्य नागरीकांच्या उपस्थीतीत ग्रामसभा संपन्न झाली यामध्ये एकमुखी बिनविरोध योगेश आबासाहेब देशमुख यांची महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी स्थानीक नगरीकांनी स्थानीक समस्यांचे वेगवेगळ्या समस्या वेगवेगळ्या परीने मांडले त्यात शिवसेना कार्यकर्ते प्रविन इनामदार राष्ट्रीवादीचे राजेश पंदरगे बालाजी नाईकवाडे युवराज स्वंतकर यांनी सर्वप्रथम तंटामुक्ती अध्यक्ष पदाची सुचना केली आणि सर्व नागरीकांनी एकमुखी हात वर करुन बिनविरोध निवडीसाठी सहकार्य केले तर गावातील आनेक नगरीकांनी रोड नाली पाणी विज आदी समस्यांचे पाढा वाचले यावेळी ग्रामविकास अधीकारी यांनी सर्वांच्या समस्यांचे नोंद करुन निराकरण करण्याचे आश्वासन दिले आहे. आतापर्यंतच्या इतीहासात ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभेत स्थानीक नागरीकांची लक्षणीय उपस्थीती होती तर स्थानीक नगरीकांनी शासनाच्या विवीध योजनाची शांतपणे माहीती ऐकुन घेतले तर यावेळी या ग्रामसभेत माजी ग्रा.पं.सरपंच प्रशांत देशमुख,शंकरराव राठोड,ग्रा.पं.सदस्य विवेक पडकंठवार,शंकरराव राठोड,रमेश सा.राणे,वजीयोदीन चमकुडे,शिवाजी राठोड,उमाकांत पंचगले,किशोर आडेकर,विलास भंडारे,मयुर पाटील,समद चौधरी,अयुब पठाण,शादुल बागवान,नयुम चौधरी,धनाजी होटले,व्यंकट बोईनवाड,अशोक टोके,वसंत आडेकर,राजकुमार हंदीखेरे,मुख्तार पटेल आदीजन यावेळी उपस्थीत होते.



### तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत स्नेहा पाटीलने पटकावला प्रथम क्रमांक

**लोहा**-दिग्रस (खु) येथील श्री नाईक विद्या मंदिर शाळेतील इयत्ता ८ वर्गातील विद्यार्थी कु. स्नेहा पाटील हिने तालुकास्तरीय शालेय मुलीच्या कुस्ती क्रिडा स्पर्धात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. १४ वयोगटातील ५४ किलो वजन गटात बाजी मारली आहे. या यशाबदल शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड के.डी, सहशिक्षक सतीश देवकत्ते, खोकले पी.एस, राम कल्याणकर, अविनाश पांचाळ, दहिफळे पी.जी, जयराम टाले, सतीश कल्याणकर, चंद्रकांत कल्याणकर, आत्माराम गुट्टे आदिंनी अभिनंदन केले आहेत.

### राजेश्वर मुत्तेपवार यांचे निधन

**नांदेड** -इंदिरा गांधी हायस्कूल सिडको नांदेडचे सहशिक्षक तथा डॉ. शंकरराव चव्हाण शारदा धनवर्धिनी पतसंस्थेचे खजिनदार महेश मुत्तेपवार यांचे वडील राजेश्वर गंगाधरराव मुत्तेपवार यांचे आज वयाच्या ७५ या वर्षी दुःखद निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा सायंकाळी सात वाजता श्रीनगर रामराव पवार मार्ग येथील त्यांच्या निवासस्थानाहून निघणार असून सायंकाळी साडेसात वाजता गोवर्धन घाट येथे दिवंगत राजेश्वर मतेपवार यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत . पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे नांदेड जिल्हा समन्वय रवींद्र संगनवार यांचे ते मावसे होत.




### पंडित प्रदीप मिश्रा यांनी पूजन केलेले शिवलिंग दर्शनासाठी उपलब्ध

**नांदेड** -नांदेड येथे नुकत्याच संपन्न झालेल्या शिवमहापुराण कथेत आंतरराष्ट्रीय कथा वाचक पंडित प्रदीप मिश्रा यांनी शिवमहापुराण कथेच्या वेळी दररोज ज्या शिवलिंगाची पूजा केली, ते शिवलिंग माँ तुळजा भवानी कावड यात्रेत भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आले आहे.

# पोळा सण वृक्षतोड न करता पर्यावरण पूरक साजरा करावा : नारायण कदम

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, ३१ ऑगस्ट -**

येणाऱ्या पोळा सणानिमित्त मेढीसाठी पळस व उबरांच्या फांद्या तोडून दारापुढे उभ्या करून त्याची पूजा केली जाते. यामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्यामुळे भविष्यात याचा आपणास फटका बसू शकतो याची प्रचिती आपल्यास कोरोनाच्या काळात आली होती म्हणून वृक्षतोड न करता आपल्या घरासमोर त्या दिवशी वृक्षारोपण करून पोळा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करावा असे आवाहन सर्व जनतेस सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा निसर्ग व सामाजिक पर्यावरण निवारण मंडळाचे तालुकाध्यक्ष नारायण कदम यांनी केले.



पोळा सणानिमित्त मृत फांद्यांची पूजा केली जाते. याबाबत कदम यांनी वयोवृद्ध, तज्ञ पंडित, अभ्यासक यांना विचारले असता त्यात कोणती धार्मिक शास्त्रीय कारण मिळाले नाही . वृक्षतोडीमुळे प्रदूषित झालेल्या काळात ही प्रथा ( रुढी ) योग्य आहे का ? म्हणून आपण रोपवाटिकेतून कोणतेही दोन झाड घेऊन मुख्य चौकटीला लावून या जिवंत झाडांमध्ये देव पाहून याची पूजा करावी. लग्नासाठी हिरवा मंडप, दसऱ्याला आपटा, हरितालिकेला पाने, दिवाळी लक्ष्मीपूजन, तोरणे ,पाडवा तोरण यासाठी वृक्षतोड करून आपण पर्यावरणाचा नाश करत आहोत. तरी आपल्या प्रत्येक सणानिमित्त मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे गरजेचे असून ज्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन करून पर्यावरण प्रदूषण टाळण्यात यावे असे आवाहन कदम यांनी केले.

# हदगाव विधानसभेत-मंडळ प्रभारीपदी भागवत देवसरकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३१ ऑगस्ट -**

भारतीय जनता पार्टीने हदगाव-हिमायतनगर विधानसभेच्या हिमायतनगर मंडळ प्रभारीपदी संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते भागवत देवसरकर यांची निवड केली आहे,भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर, विक्रांत पाटील, मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष ॲड.किशोर देशमुख यांनी निवड केली आहे.



हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघात प्रत्येक बूथ वर प्रवास करून पदाधिकारी बूथ प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख व बुध वरील कार्यकर्त्यांची मते जाणून घेऊन येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकाकरिता बूथसक्षम करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी तालुक्यात प्रवास करून प्रभारी पदाच्या माध्यमातून काम करण्यात येणार आहे, निवडणुकीच्या तोंडावर भारतीय जनता पार्टीने मोठी जबाबदारी देऊन हदगाव हिमायतनगर विधानसभेत भारतीय जनता पार्टीचे पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी भाजपाने कंबर कसली आहे.

**पक्ष संघटन वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करणार : भागवत देवसरकर**

भारतीय जनता पार्टीने माझी हदगाव विधानसभेच्या हिमायतनगर मंडळ प्रभारीपदी निवड करून काम करण्याची संधी दिल्याबद्दल पक्षश्रेष्ठीचा आभारी आहे. यापुढील काळात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री गिरीश महाजन, खासदार अशोकराव चव्हाण, खासदार अजित गोपछडे, माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, मराठवाडा संघटनमंत्री संजयभाऊ कौडगे, जिल्हाध्यक्ष ॲड.किशोर देशमुख मार्गदर्शनात व हदगाव-हिमायतनगर तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी समन्वय ठेवत भारतीय जनता पार्टीचे पक्ष संघटन वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे भागवत देवसरकर म्हणाले.

# अनुज अग्रवाल याची जागतिक पातळीवर चमकदार कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, ३१ ऑगस्ट -**

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेमध्ये तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन्स (EXTC)मध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी अनुज अग्रवाल, यांनी देश पातळीवर एस.जी.जी.एस. संस्थेची गुंणवत्ता सिद्ध करत गुरुजनांचे मार्गदर्शन आणि स्वतः चे कठोर परिश्रम व जिद्धीच्या जोरावर अत्यंत स्पर्धात्मक असलेल्या लिनक्स (Linux) फाऊंडेशन मेंटॉरशिप, एल.एफ.एक्स. (LFX) प्रोग्राम मधील यशाला गवसणी घालत जागतिक पातळीवर चमकदार कामगिरी केल्याबद्दल संस्थेचे संचालक डॉ.मनेश कोकरे यांनी सत्कार केला.

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड येथील तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन्स (EXTC)मध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी अनुज अग्रवाल, यांनी देश पातळीवर चमकदार कामगिरी विशेष निवड प्रक्रियेत तांत्रिक कौशल्याचा कस लाऊन.अनुज आग्रवालने या जागतिक पातळीवरील स्पर्धेत अगदी कमी अर्जदार निवडले जातात आणि बहुतेक निवडी पारंपारिकपणे जगातील प्रतिष्ठीत संस्था व आय.आय.टी. (IITs) मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्या मधून होतात. प्रतिष्ठित क्लाउड नेटिव्ह कंप्युटिंग फाउंडेशन (CNCF) प्रकल्पावर काम करत, एस.जी.जी.एस. संस्थेमध्ये तृतीय वर्षात शिक्षण घेणारा विद्यार्थी अनुज अग्रवाल हा एल.एफ.एक्स. (LFX) प्रोग्राम मेंटॉरशिप टर्म-३, २०२४ साठी निवड झालेल्या महाराष्ट्रातील फक्त २ भारतीयांपैकी एक ठरला आहे. या स्पर्धेत जगभरातून जवळ पास १०० ते १५० तर भारतातील २५ ते ३० विद्यार्थ्यांची निवड होत असते. अनुज अग्रवाल यास संस्थेचे संचालक डॉ. मनेश ब. कोकरे यांचेसह इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन्स विभागीतील प्राध्यापकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभल्यामुळे.त्याच्या या यशा बद्धल संस्थेचे संचालक डॉ. मनेश ब. कोकरे, विविध अधिष्ठाता, विभाग प्रमुख, कर्मचारी, व विद्यार्थी यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# डापरवाड कुटुंबाला दादाराव पाटील ढगे यांची आर्थिक मदत



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ३१ ऑगस्ट -**

मुदखेड तालुक्यातील बारड येथील कवळे मार्केटच्या बाजूस असलेले मजूर डापरवाड कुटुंबाचे घर दि. २९ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागल्याने घर जळून खाक झाले असुन या आगीत घरातील जीवनावश्यक वस्तूंची राख झाली असून रोजमजुरदार कुटुंब उघड्यावर आले.या घटनेची माहिती भोकर विधानसभेतील दान महर्षी सामाजिक कार्यकर्ते दादाराव पाटील ढगे यांना मिळताच दि.३० ऑगस्ट रोजी बापुराव डापरवाड कुटुंबीयांची भेट घेऊन त्या कुटुंबीयाला आधार म्हणून २१,००० हाजाराची आर्थिक मदत करण्यात आली.

हि आर्थिक मदत केल्याबद्दल डापरवाड कुटुंबीय व गावकऱ्यांच्या वतीने दादाराव पाटील ढगे यांचे आभार मानण्यात आले. यावेळी उपस्थित असलेले भुजंगराव पाटील ढगे, बालाजी पाटील नागेलीकर,ओमकार पाटील ढगे, आनंद पाटील मगरे, माधव पाटील ढगे, मुदखेड काग्रेस कमिटि तालुका अध्यक्ष प्रताप देशमुख, संदिप देशमुख,सतिष पाटील डोंगरगावकर, रामकिशन माने,गजानन लोमटे,महेश मुलंगे,प्रदिप सवरकर,लोकेश देशमुख, दिनेश आठवले,अमोल आठवले,विशाल वसुमते, काशिनाथ शिंदे, सतिश व्यवहारे यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

# वयोश्री व तिर्थदर्शन योजनांच्या शिबीराची सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३१ ऑगस्ट -**

झोपडपट्टी भागात राज्य शासनाच्या लाभकारी योजना गरीब गरजू लोकांना व खरे लाभार्थना सरकारचे सर्व लाभकारी योजना पोहचावी या संकल्पनेतून भास्कर अण्णा तुम्मा यांनी नांदेड मध्ये आज दिनांक ३० ऑगस्ट रोजी गंगाचाळ येथील मार्कंडेय मंदिर मध्ये सर्व समाजातील ज्येष्ठ नागरिकांसाठी मा.मुख्यमंत्री वयोश्री व तिर्थदर्शन योजनांच्या शिबीर घेण्यात आले.

या शिबीर मध्ये नांदेड समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद निमगरे, समाज कल्याण विभागाचे अधिकारी सुजाता पोहरे, दिगंबर पोतुलवार, विठ्ठल दुगळे, विजय पकाने, ज्योती जाधव या सर्व प्रमुख अधिकारी उपस्थितित राहून सर्व ज्येष्ठ नागरिकांना योजनेची सविस्तर माहिति सांगून मोफत फॉर्म भरून स्वीकारण्यात आले असता या शिबीर मध्ये भास्कर अण्णा मित्र मंडळाचे प्रमुख पदाधिकारी आणि मोठ्या संख्येनी जमलेल्या लाभार्थी ज्येष्ठ नागरिकांच्या खूप मोठी गर्दी होती.

भास्कर अण्णा तुम्मा यांनी शासनाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोश्री व तीर्थ दर्शन योजनांबद्दल शासनाचे प्रथम धन्यवाद मानले व इच्छुक उपस्थितांना सर्वांनी सहभाग नोंदऊन या संधिचा फायदा घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. झोपडपट्टी भागात आलेले समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद निमगरे व त्यांचे सर्व अधिकारी यांना विशेष आभार व्यक्त केले. या नंतर शिबीरा मध्ये आपले योगदान देण्यासाठी आलेले समाज कल्याणचे सर्व अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले आहे.शासनाचे योजना झोपडपट्टी भागात घेऊन येण्यासाठी परिश्रम घेऊन शिबीर आयोजन केल्याबद्दल भास्कर अण्णा तुम्मा यांच्ये जिल्हा समाज कल्याण विगागाच्या तर्फे सत्कार करण्यात आला. या नंतर नांदेड जिल्हा समाज कल्याण सहायक आयुक्त शिवानंद निमगरे यांनी समाज कल्याण विगागाच्या वतिने सर्वतोपरी ज्येष्ठनागरिकांना सहकार्य करण्याचे अभिवचण दिले. अत्यंत खुमसदार शैलीत शासनाच्या सर्व योजनांबद्धल इतंभूत माहिती दिली. शिबीर साठीचा वेळही वाढऊन दिला व सर्वांनी या योजनेचा फायदा घेण्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रम मध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या फॉर्म भरून व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते गुर्रम श्रीनिवास मल्लेशम, अविनाश जिंदम, बुर्ला कनकराज, चिप्पा शुभम, उप्परपेल्ली सत्यानंद, चिप्पा हरीश, उप्परपेल्ली बालकिशन व भास्कर अण्णा मित्र मंडळाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री केदार जगद्गुरु यांच्या श्रावणमास अनुष्ठान सोहळ्याची ४ सप्टेबर रोजी सांगता

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३१ ऑगस्ट -**

श्री हिमवत् केदार वैराग्य सिंहासनाधिश्वर केदारनाथ रावल श्री श्री श्री १००८, श्री केदार जगद्गुरु भीमाशंकरलिंग शिवाचार्य (उत्तराखंड) यांच्या ५२ व्या श्रावण मास अनुष्ठान समाप्ती सोहळा बुधवार दि. ४ सप्टेबर रोजी होणार आहे.



हा श्रावण मास अनुष्ठान समाप्ती सोहळा गुरु दशमुख आश्रम भीमाशंकरनगर गोपाळचावडी नवीन नांदेड येथे होणार आहे. त्या अनुषंगाने ५ ऑगस्टपासून सुरु झालेल्या श्रावणमास अनुष्ठान कार्यक्रमनिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांची मेजवाणी सुरु आहे. या निमित्ताने दि.४ सप्टेंबर रोजी सकाळी ८ दु.१२ यावेळात इष्टलिंग महापुजा, दु.१२ ते २ यावेळात धर्मसभा आणि मान्यवरांचा सत्कार होणार आहे. त्यानंतर दु. २ ते ६ यावेळात महाप्रसादाचा कार्यक्रम होइल. या सर्व कार्यक्रमाचा भक्तगणांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन श्री गुरुदशमुखाश्रम गोपाळचावडी भक्तमंडळी यांनी केले आहे.

# वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने खा.गोपछडे आणि खा.काळगे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३१ ऑगस्ट -**

नवनिर्वाचित लोकसभा सदस्य आणि राज्यसभा सदस्य असणाऱ्या खासदारांचा नागरी सत्काराचे आयोजन वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने दि.८ सप्टेंबर रोज रविवारी गुरूवर्यांच्या उपस्थितीत राजेंद्र हुरणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे.

वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने खा. डॉ. अजित गोपछडे आणि खा. डॉ. शिवाजी काळगे यांचाा समाजाच्यावतीने भव्य नागरी सत्काराचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यासाठी दिव्य सानिध्य म्हणून



श्री. ष.ब्र. १०८ सोमलिंग शिवाचार्य महाराज(बिचकुंदा),श्री. ष.ब्र. १०८ दिगंबर शिवाचार्य महाराज(वसमत), श्री. ष.ब्र. १०८ डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज(मुखेड),श्री. ष.ब्र. १०८ सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज(बेटमोगरा),श्री. ष.ब्र. १०८ करबसव शिवाचार्य महाराज(वसमत), श्री. ष.ब्र. १०८ शंभुलिंग शिवाचार्य महाराज(उदगीर),श्री. ष.ब्र. १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज(तमलूर), श्री. ष.ब्र. १०८ काशिनाथ शिवाचार्य महाराज(पाथरी), श्री. ष.ब्र. १०८ शिवचैतन्य शिवाचार्य महाराज(हदगाव), श्री. ष.ब्र. १०८ गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज(गिरगाव),श्री.ष.ब्र.१०८विरुपाक्ष शिवाचार्य महाराज(मांजरसुंबा),श्री. ष.ब्र. १०८ महादेव शिवाचार्य महाराज(वाई), श्री. ष.ब्र. १०८ विश्व्चैतन्य शिवाचार्य महाराज(आष्टी),श्री. ष.ब्र. १०८ महादेव शिवाचार्य महाराज, कळमनुरी, श्री. ष.ब्र. १०८ सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज(साखरखेर्डा)श्री डॉ. बसव जय चंद्र स्वामीजी,श्री शा.ब्रा.डॉ. वागीश पंडितराद्य शिवाचार्य, स्वामीजी श्री विभव विद्या शंकर स्वामीजी (कर्नाटक)आदी उपस्थित लाभणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष नांदेडभूषण राजेंद्र हुरणे तर विशेष उपस्थितीत डॉ. त्र्यंबक दापकेकर, मुख्य अभियंता इंजि. बसवराज पांढरे, उपायुक्त वस्तु व सेवाकर विभाग निलेश शेवाळकर, आयकर विभागाचे उपायुक्त प्रसाद मेनकुदळे,ओंकारेश्वर काचंनगिरे उपायुक्त सिमा कर, उपजिल्हाधिकारी प्रविण मेगशेट्टे, उपजिल्हाधिकारी सौ.सुप्रिया डांगे, (मेनकुदळे), जिल्हा शैल्य चिकित्सक डॉ.निळकंठ भोसीकर, सहाय्यक मुख्य अभियंता जलसंपदा विभाग इंजि.राजू देशमुख, लेखाधिकाीर प्रादेशिक परिवहन विभाग विनायक शिराळे, कार्यकारी अभियंता सा.बां. इंजि.प्रशांत कोरे, कार्यकारी अभियंता अमोल पाटील, तहसीलदार नेमाजी देवणे, लोहाचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. हा कार्यक्रम दि.८ सप्टेंबर रोज रविवारी सकाळी ११ वाजता लिंगैक्य गणपतराव मोरगे सभागृह भक्ती लॉन्स मालेगाव रोड नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लिशचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. ३१ ऑगस्ट-**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात इंग्रजी विभागाच्या वतीने डॉ.व्ही.पी.राव सेंटर फॉर कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लिशचे उद्घाटन झाले. इयावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रमुख पाहुणे, त्याबरोबरच संस्था सदस्य यांनी सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केले की या भाषा प्रयोगशाळेचा उपयोग करून सर्वांनी फायदा करून घ्यावा व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवावे. या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी ह्या होत्या. मुख्य अतिथी आयआयटी मुंबई येथील वरिष्ठ भाषा प्रशिक्षक आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा. बब्रुवान कोरे, तसेच श्रीमती सुलोचना कुमारी राव, श्री.संतोषकुमार, श्री.विनोदकुमार आणि त्यांच्या परिवाराने आपली उपस्थिती नोंदवली. या प्रसंगी सहसचिव डॉ.आर.एन. लखोटिया तसेच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सदस्य प्रशांत पेन्सलवार, श्रीमती ललिता पाटील, प्राचार्य डॉ. आर.के.मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी.पाटील, इंग्रजी विभागातील प्रा.एस.आर.नागोरी, प्रा.डॉ.एस.एम.सूर्यवंशी, प्रा.आर.एम.मुदुडगे, प्रा.डॉ.के.आर.गव्हाणे, प्रा.पी.व्ही. अंबेसंगे, प्रा.विलास काकनाळे, प्रा.अरविंद बिरादार, प्रा.शेख शादुल, प्रा.बालाजीप्रसाद घाळे, इंग्रजी विभागातील माजी प्राध्यापक, माजी विद्यार्थी तसेच सर्व भाषा विषयाचे प्राध्यापक तथा शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त



### महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयास क्रॉस कंट्री स्पर्धेत उपविजेतेपद

**उदगीर, दि. ३१ ऑगस्ट-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत संत जनाबाई महाविद्यालय गंगाखेड येथे आंतर महाविद्यालय क्रॉस कंट्री (पुरुष व महिला) स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या महिला खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा संघाने विद्यापीठात सर्व द्वितीय क्रमांक (उपविजेतेपद) पटकाविला आहे. विजेत्या संघामध्ये आरती जाधव, शारदा बेलुरे, वैशाली राठोड, स्नेहलता पवार, सुप्रिया पवार या खेळाडूंचा समावेश होता. तसेच आपल्या महाविद्यालयाचा खेळाडू पिराजी गित्ते यांनी ब विभागाचे प्रतिनिधित्व करून ब विभाग क्रॉस कंट्री (पुरुष) संघाला विजेतेपद पटकावून दिले आहे. त्याबद्दल विजेत्या खेळाडूंचे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी.पाटील चिघळीकर आणि डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ.आर.के.मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी.पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



### केशवराज विद्यालयात सखी सावित्री समिती अंतर्गत मुलींचे समुपदेशन

**लातूर, दि. ३१ ऑगस्ट-**

केशवराज विद्यालयात सखी सावित्री समिती अंतर्गत इयत्ता सातवीच्या मुलींचे समुपदेशन करण्यात आले. कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक कार्यक्रमाच्या अध्यक्षा अंजली निर्मळे, प्रमुख अतिथी म्हणून म्हणून डॉ. नेहा येलाले, सुप्रिया केंद्रे, सहाय्यक पोलीस अधीक्षक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम प्रमुख मीरा चामवाड यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नेहा येलाले यांनी त्यांच्या बोलण्यातून मुलींचे शारीरिक, मानसिक, आरोग्य चांगले राहिले पाहिजे त्यासाठी मुलींनी बीट, गाजर, टोमॅटो यासारखे जीवनसत्व युक्त पदार्थ खाल्ले पाहिजेत. दररोज दूध पिले पाहिजे. त्याचबरोबर मोबाईलचा वापर इतर कुठल्या कारणासाठी करण्यापेक्षा अशा गोष्टींसाठी केला पाहिजे. आईला घरकामात मदत करा. विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण घेण्यापेक्षा स्वतःचे १०० टक्के द्या. दुसऱ्या प्रमुख अतिथी श्रीमती सुप्रिया केंद्रे (सहाय्यक पोलीस अधीक्षक, शिवाजी नगर, लातूर.) यांनी आपल्या बोलण्यातून विद्यार्थिनींना गुड टच-बॅड टच याबद्दल माहिती सांगितली. मी कशी सुरक्षित राहील? याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. आईला सगळ्या गोष्टी शेअर केल्या पाहिजेत. मोबाईलचा वापर टाळण्यापेक्षा न केलेलाच योग्य राहील. तसेच पोक्सो कायद्याबद्दल विद्यार्थिनींना माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोपात श्रीमती अंजली निर्मळे यांनी आपल्या विद्यालयामध्ये दोन समित्या कार्यरत असल्याचे सांगितले. विशाखा समिती आणि सखी सावित्री समिती. शाळेचे नियम सर्व मुलींनी पालन केले पाहिजेत. आभार स्वप्ना सेलूकर यांनी केले. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेघा सूर्यवंशी यांनी सहकार्य केले. मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, पर्यवेक्षक शिवशंकर राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.



### काशीविश्वेश्वर मंदिरात शिवकथा

**लातूर, दि. ३१ ऑगस्ट-**

लातूर शहरातील विशालनगर येथील काशीविश्वेश्वर मंदिर येथे शिवकथा व परमरहस्य पारायण सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी या सोहळयास भेट दिली. शिवकथा ऐकली आणि शिवकथाकार अमृतेश्वर शिवाचार्य महाराज व डॉ. शांतवीरलींग शिवाचार्य महाराज यांचे आशीर्वाद घेतले.

## निलंग्यात 'मविआ'च्या वतीने रास्ता रोको

### राजकोट घटनेचा निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ३१ ऑगस्ट-**



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट किल्याजवळ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा कोसळल्या प्रकरणी निलंगा येथे रास्ता रोको करून निषेध व्यक्त करण्यात आले. या कामात कमिशन खाणाऱ्या व निष्कृष्ट दर्जाच्या काम मार्गी लावणाऱ्या निर्लज्ज लोकप्रतिनिधीचा व अधिकाऱ्यांचा निषेध करण्यात आला.

यावेळी बोलताना प्रदेश सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर म्हणाले की, सिंधुदुर्गातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारलेला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे उद्घाटन प्रधानमंत्री मा.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ४ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले होते. त्याठिकाणी बसविण्यात आलेला महाराजांचा पुतळा एक वर्षही पुर्ण न होता कोसळला.यावरून पुतळ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले होते हे उघड आहे.

देशाचे पंतप्रधान जेंव्हा एखाद्या स्मारकाचे तथा वास्तूचे उद्घाटन करतात तेंव्हा त्याचे काम दर्जेदारच असेल अशी जनतेला खात्री असते. परंतु सिंधुदुर्गातील मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा वर्षभरातच कोसळला. हा छत्रपती शिवरायांचा अवमान आहे.याची जबाबदारी हा पुतळा उभारणाऱ्या संस्थेबरोबर संबंधित खात्याचे मंत्री व प्रधान सचिवांची देखील आहे त्यामुळे याची एसआयटी नेमून चौकशी झाली पाहिजे. याप्रसंगी प्रदेश सचिव अभय साळुंखे म्हणाले की,देशातील व राज्यातील भ्रष्ट सरकारला उखडून टाकण्यासाठी लोकसभेच्या निवडणुकीप्रमाणे विधानसभेच्या निवडणुकीतही परिवर्तन करावे शहरातील व्यापाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल केलेल्या दुटप्पी लोकप्रतिनिधी व प्रशासनावर टीकेची झोड उडविली.

तसेच आपला शेतकरी संकटात अडकलेला आहे शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही त्यासाठी सरकारने लक्ष घालून सोयाबीनला ९०००/- भाव द्यावा व हमीभावाने खरेदी करावी अशी त्यांनी मागणी केली यावेळी शिवसेनेच्या वतीने शोभा बेंजरगे, शिवसेना ता.प्रमुख अविनाश रेशमे, राष्ट्रवादीचे ता.अध्यक्ष सुधीर मसलगे,,तालुकाध्यक्ष विजय पाटील, मा.सभापती अजित माने, मा.सेल.उपाध्यक्ष लक्ष्मण कांबळे, काँग्रेसचे प्रा. दयानंद चोपणे, उजेडचे दिलीप ढोबळे, ॲड. नारायण सोमवंशी, पंकज शेळके, शहराध्यक्ष मुजीब सौदागर, प्रदेश काँग्रेसचे ओबीसी संघटक अजित निंबाळकर, व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष अंबादास जाधव यांनी भावना व्यक्त केल्या.

यावेळी प्रमुख उपस्थितीत डॉ. सेलचे जिल्हाध्यक्ष अरविंद भातांब्रे, तालुकाध्यक्ष विजय पाटील,शिरुर अनंतपाळ तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील, माजी नगराध्यक्ष हमीद शेख,शहराध्यक्ष अजित नाईकवाडे,निलंगा वि.युवक अध्यक्ष अमोल सोनकांबळे, राष्ट्रवादीचे इस्माईल लदाफ, मा.नगरसेवक सिराज देशमुख,जिल्हाउपाध्यक्ष सुधाकर पाटील, किसान सेलचे संजय बिराजदार,निवृत्त अधिकारी व्यंकटराव शिंदे,युवा सेने तालुका प्रमुख प्रशांत वांजर वाडे,चक्रधर शेळके, सुभाष पाटील, दिनकर बिराजदार, छावाचे दास साळुंके, एफरोज शेख,बालाजी गोमसाळे,गंगाधर चव्हाण, विठ्ठल पाटील, लिंबराज जाधव, सतीश कोणिरे, युवक तालुकाध्यक्ष मदन बिरादार, माधवराव पाटील, विक्रम जाधव, ज्ञानेश्वर पिंड, परमेश्वर सूर्यवंशी उपस्थित होते.



## चाकूर तलाठी संघाचे लक्षवेधी काम बंद आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. ३१ ऑगस्ट-**

आडमांव रंजे, ता. वसमत, जि. हिंगोली येथे भरदिवसा तलाठी कार्यालयात तलाठी संतोष देवराव पवार यांचा शासकीय कामकाज करत असतांना चाकूने हल्ला करून खुन करण्यात आला आहे.त्यामुळे गुन्हेगारांना कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी दि.२९ ऑगस्ट रोजी चाकूर तलाठी संघाच्यावतीने तहसिलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली व एक दिवस काम बंद आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनास महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटना चाकूर यांनी आंदोलनास पाठिंबा देऊन एक दिवस काम बंद आंदोलन केले.या घटनेचा महाराष्ट्र राज्य तलाठी संघ शाखा लातूर अत्यंत तीव्र, संवेदनशील व दुःखद भावनेने निषेध व्यक्त केला आहे. या घटनेमुळे राज्यातील तलाठी कर्मचारी यांचे खच्चीकरण झाले असुन कर्मचारी यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल आहे. आपल्या निदर्शनास आणून देत आहे. जिल्ह्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी हे घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन आज एक दिवसीय लक्षवेधी काम बंद आंदोलन करुन त्यांच्या कुटुंबियास किमान ५० लाख रुपयांची तात्काळ मदत शासनाने त्वरीत जाहीर करावी. वारसांना अनुकंपाद्वारे तात्काळ शासकीय सेवेत समाविष्ट करून घ्यावे.मागण्या करुन एक दिवसीय काम बंद आंदोलन केले . निवेदनावर अध्यक्ष अविनाश पवार सरचिटणीस कमलाकर आरडले, प्रल्हाद पल्ले,मंडळाधिकारी सुर्यवंशी एम.पी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. हिंगोली येथे तलाठी यांच्यावर हल्ला करून खुन केल्याबद्दल चाकूर येथे महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटना यांनी आंदोलनास पाठिंबा देऊन एक दिवस काम बंद ठेवून आंदोलन केले.



## लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात 'विनादप्तर शाळा' उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि.३१ ऑगस्ट-**

येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात आनंददायी शनिवार 'विनादप्तर शाळा' हा आनंददायी उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा तसेच विद्यार्थ्यांना विना दप्तर शाळेत येण्याचा, आनंददायी वातावरणात आपल्या इच्छेनुसार काम करण्याचा अनुभव मिळावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून शासन आदेशानुसार या कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयात करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक किरण नेमट, माधव मठवाले यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

या उपक्रमात महावाचन, गणपती व बैल तयार करण्याची कार्यशाळा व कागद काम अशा तीन टप्प्यात विभागणी केली गेली. सूत्रसंचालन अभ्यासपूरक मंडळ प्रमुख विजया गोविंदवाड यांनी तर प्रास्ताविक अनिता मूळखेडे यांनी केले. विद्यार्थ्यांना महावाचनात ग्रंथ उपलब्ध करून देण्याचे काम ग्रंथपाल अक्षय शिवशट्टे यांनी केले. तर विद्यार्थ्यांना काम विभागून देण्यासाठी निलेश मांडवकर यांनी प्रयत्न केले.

## विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.३१ ऑगस्ट-**

आयोगाच्या आदेशानुसार १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्र मतदार याद्यांचा सुधारीत दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित केला होता. या पुनरिक्षण कार्यक्रमातंर्गत ३० आगस्ट, २०२४ रोजी लातूर जिल्ह्यातील सर्व २ हजार १४२ मतदान केंद्रावर अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच लातूर जिल्ह्यातील तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय येथेही मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

या यादीनुसार लातूर जिल्ह्यात २० लाख १६ हजार ९९० मतदारांचा समावेश आहे. यामध्ये १० लाख ५५ हजार २५२ पुरुष मतदार आणि ९ लाख ६१ हजार ६७६ महिला मतदार आणि ६२ इतर मतदारांचा समावेश आहे.

२३४-लातूर ग्रामीण मतदारसघांत १ लाख ७४ हजार ९२ पुरुष मतदार, १ लाख ५६ हजार १०५ महिला मतदार आणि इतर ३ असे एकूण ३ लाख ३० हजार २०० मतदारांचा समावेश आहे. २३५-लातूर शहर मतदारसघांत २ लाख ३ हजार ३७४ पुरुष मतदार, १ लाख ९० हजार ८८७ महिला मतदार आणि इतर २६ असे एकूण ३ लाख ९४ हजार २८७ मतदार, २३६-अहमदपूर मतदारसघांत १ लाख ८० हजार ५२९ पुरुष मतदार, १ लाख ६३ हजार ८७३ महिला मतदार आणि इतर १ असे एकूण ३ लाख ४४ हजार ४०३ मतदार, २३७-उदगीर मतदारसघांत १ लाख ६५ हजार ८११ पुरुष मतदार, १ लाख ५३ हजार ६० महिला मतदार आणि इतर १९ असे एकूण ३ लाख १८ हजार ८९० मतदार समाविष्ट आहेत.

२३८-निलंगा मतदारसघांत १ लाख ७२ हजार ०६५ पुरुष मतदार, १ लाख ५६ हजार १ महिला मतदार आणि इतर ९ असे एकूण ३ लाख २८ हजार ०७५ मतदार आहेत, तसेच २३९-औसा मतदारसघांत १ लाख ५९ हजार ३८१ पुरुष मतदार, १ लाख ४१ हजार ७५० महिला मतदार आणि इतर ४ असे एकूण ३ लाख १ हजार ३५ मतदार आहेत.

छायाचित्र मतदार ओळखपत्र हे मतदारांची ओळख पटविण्यासाठी असून मतदारांचे नाव मतदार यांदीत असेल, तरच त्यांना मतदानाचा हक्क बजाविता येणार आहे. त्यासाठी आपल्याकडे मतदार ओळखपत्र असले, तरीही मतदार यादीत नाव असल्याची खातरजमा करुन घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क गमावण्याची वेळ येणार नाही. नागरीकांनी आपले नाव मतदार यादीत तपासण्यासाठी https://ceo.maharashtra.gov.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा 'वोटर हेल्पलाईन' ॲपचा वापर करावा. तसेच प्रसिध्द करण्यात आलेली अंतिम मतदार यादी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व मतदान मदत केंद्र येथे वोटर हेल्प सेंटर येथे मतदार यादीत नाव नोंदणीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज स्वीकारले जातील. तसेच मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी किंवा आपल्या नोंदीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी आपणास https://voters.eci.gov.in या संकेतस्थळाला भेट देता येईल, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आवाहन केले आहे.

## हजारो लाडक्या बहिणींकडून आमदारांचे औक्षण

**तभा वृत्तसेवा ,**
**औसा, दि.३१ऑगस्ट -**



महिलांच्या सक्षमीकरणासाठी महायुती सरकारने अनेक योजना सुरू केल्या असून स्त्रीयांच्या आयुष्याची पुर्ण जबाबदारी घेतली आहे.विकासाच्या विविध योजनेसह मतदारसंघातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गटाच्या माध्यमातून अंडी संकलन उद्योग व रेशीम उद्योगाशी भगिनींना जोडण्याचा आपला प्रयत्न आहे. तसेच भगिनींना सन्मान मिळावा, तिच्या हक्काचे रक्षण व्हावे आणि तिच्या विकासासाठी सदैव पाठिशी खंबीरपणे उभा राहणार असल्याची ग्वाही आमदार अभिमन्यू पवार यांनी हजारो लाडक्या बहिणींच्या औक्षण सोहळ्यात मतदारसंघातील लाडक्या भगिणींना दिली.

भारतीय संस्कृतीतील रक्षाबंधन एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे. केवळ बंधुत्वाच्या नात्याने साजरा करीत नाहीत तर प्रेम, विश्वास आणि संरक्षणाची भावना या सणातून जागृत होते .असा दृढ विश्वास या सणातून निर्माण होतो. अशा या भावनेने मतदारसंघातील कासारशिरशी येथील हजारो महिलांनी आ. अभिमन्यू पवार यांचे औक्षण करत राखी बांधली. त्यावेळी ते लाडक्या भगिणीनी आयोजित केलेल्या सोहळ्यात बोलत होते.

आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, मतदारसंघातील भगिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीने माझी बहिण सुरक्षित या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक घरातील गॅस दुरुस्ती मोहिम राबविण्यात येत आहे. अगदी मोफत गॅस दुरुस्ती केली जात असताना गॅसच्या वापराबद्दलही आपणास मार्गदर्शन केले जात आहे. याचबरोबर पाण्यासाठी भगिनींची हेळसांड होवू नये. यासाठी प्रत्येक गावात सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांसाठी स्वतंत्र रोहित्र उपलब्ध करून देण्यात आली आहे. जेणेकरून पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येऊ नये. या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत असताना सामाजिक कार्याच्या दुष्टीने मतदारसंघातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाना आधार देण्यासाठी मोफत शिलाई मशीन वाटप करण्यात आल्या आहेत. जेणेकरून या माध्यमातून रोजगार उपलब्ध होईल. राज्य सरकारने भगिनींना अनेक योजनांच्या माध्यमातून सक्षमीकरण करण्याचे काम सुरू केले असून सुकन्या योजना, मुलीचे मोफत शिक्षण योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, संगायो व इंगायो योजनेअंतर्गत मानधनात वाढ आदीसह एसटी बसमध्ये प्रवास रक्कमेत पन्नास टक्के सुट. महिला बचत गटातील मानधनात वाढ यासह अनेक योजना सुरू केल्याचे यावेळी आ. पवार यांनी सांगितले. आपल्या मुलींना उच्च शिक्षण द्यावे, असा आग्रह आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी उपस्थित भगिनींना केला. मतदारसंघातील लामजना, कासारसिरसी व बोरफळ या शाळेतील काम या योजनेअंतर्गत पुर्ण झाले असल्याचे आ. पवार यांनी स्पष्ट केले .यावेळी हजारोच्या संख्येने महिला भगिनीं उपस्थित होत्या.




## शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात पॉवर टॉक

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ३१ ऑगस्ट-**

तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात पॉवर टॉक या पार्श्वभूमीवर सोशल स्कील्स ॲण्ड इमोशनल इंटेलेजीएन्स फॉर जॉब मार्केट या विषयावर संजयकुमार सिंघ, रीक्रुरमेंट एक्सपर्ट, रायपुर छत्तीसगड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सिरी एज्युटेक कोल्हापुर संस्थेचे सचिन कुंभोजे, विश्वजीत काशीद, आयआयएम. टेडएक्स व अतंरराष्ट्रीय वक्ते, महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, डॉ समीर शफी, डॉ. अजय फुगटे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल चे प्रमुख युवराज काटु, प्रा. किरण रोडगे इत्यादी उपस्थित होते.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची जॉब मार्केटसाठी सामाजिक कौशल्ये आणि भावनिक बुद्धिमत्ता सुधारण्यासाठी आणि आजच्या आधुनिक जगात कौशल्य ज्ञानाचे महत्व कसे आहे. तसेच व्यवसाय आणि बाजारपेठेची सखोल माहिती मिळवण्याची संधी महाविद्यालयाने मागदर्शनातून विद्यार्थ्यांना प्राप्त करुन दिले. प्रियंका उंबरे व सुषमा गजगे यांनी सूत्रसंचालन विद्यार्थीनीने केले तर प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुढाकार घेतला होता.